लोकलेखा समिती

(२०१०- २०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००२-२००३ व २००३-२००४ या वर्षाच्या विनियोजन लेख्यावरील आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी

पहिला अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक ८ डिसेंबर, २०१० रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
२०१०

लोकलेखा समिती

२०१०-२०११

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००२-२००३ व सन २००३-२००४ या वर्षाच्या विनियोजन लेख्यावरील आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी

पहिला अहवाल

लोकलेखा समिती
२०१०-२०११

समिती प्रमुख

१) श्री. गिरीष बापट , वि.स.स.

सदस्य

२) श्री.कालिदास कोळंबकर - वि.स.स.
३) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.
४) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.
५) श्री.अमित देशमुख - वि.स.स.
६) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर - वि.स.स.
७) श्री. रवि राणा - वि.स.स.
८) श्रीमती मिनाक्षी पाटील - वि.स.स
९) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.
१०) श्री.नवाब मलिक - वि.स.स.
११) श्री.विलास लांडे - वि.स.स.
१२) श्री.शिवेंद्रसिंह भोसले - वि.स.स.
१३) श्री.संजय सावकारे - वि.स.स.
*(१४) श्री.सुधीर मुनगंटीवार - वि.स.स.,(दि.२० ऑक्टोबर, २०१० रोजी पर्यंत)
(१४ अ) श्री.राम शिंदे- वि.स.स.(दि.२० ऑक्टोबर,२०१० रोजी पासून)
१५) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.
१६) श्री.नानाभाऊ पटोले - वि.स.स.
१७) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
१८) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.
१९) श्री.एकनाथ शिंदे - वि.स.स.
२०) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.
२१) श्री. सुरेशदादा देशमुख - वि.प.स.
२२) श्री.भाई जगताप - वि.प.स.
(२३) श्री. राजेंद जैन - वि.प.स.
२४) श्री. विनोद तावडे - वि.प.स.
२५) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

सदरहू समिती दिनांक) २४/२/२०१० रोजी विधानसभा व दिनांक २/३/२०१० रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री भा. ना. कांबळे, सह सचिव
३) श्रीमती मेघना तळेकर, अवर सचिव.
४) श्री. ऋतूराज कुडतरक, अवर सचिव
५) श्री.आर.आर.काठे,अवर सचिव (समिती)
६) श्री.एस.एन.सानप, कक्ष अधिकारी

*** श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी आपल्या समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर प्रा. राम शिंदे, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष ,महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

(दोन)
प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००२-२००३ व सन २००३-२००४ च्या विनियोजन लेख्यावरील आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

समितीने सन २००२-२००३ व सन २००३-२००४ या वर्षाच्या महाराष्ट्र शासनाच्या विनियोजन लेख्यांमध्ये नमूद केलेला अतिरिक्त खर्च व बचतीच्या रक्कमांचा तसेच इतर बाबींवरील खर्चाच्या नियंत्रणाबाबत विचार केला असून त्यानुसार समितीचा हा पहिला अहवाल विधानमंडळाला सादर करण्यात येत आहे.

समितीच्या बैठका दिनांक ४ मे, ५ मे व दि. १२ मे, २०१० रोजी व दि.१ जून, २ जून, ८ जून व दि. २३ जून, २०१०, रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आल्या.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकींच्या कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "एक" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने या अहवालाचे प्रारुप गुरुवार दिनांक २ डिसेंबर, २०१० रोजी संमत केले.

उक्त अहवालाच्या संदर्भात समितीने बैठकीच्या वेळी प्रधान सचिव,गृह विभाग, प्रधान सचिव महसूल विभाग, सचिव, नगरविकास विभाग, अप्पर मुख्यसचिव व प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, जलसंपदा विभाग, सचिव, राज्य उत्पादन शुल्क विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग आणि प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग तसेच संबंधित विभागांच्या प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या त्याचप्रमाणे सचिव, वित्त विभाग (ले. व को.), प्रधान महालेखाकार (ले. व प.)-१, मुंबई, महालेखाकार (ले. व प.)-२, नागपूर, यांनी ही समितीच्या बैठकींना वेळोवेळी उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि इतर संबंधित विभागांच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला जी माहिती दिली, त्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

विधान भवन,
मुंबई/नागपूर.
दिनांक : २ डिसेंबर, २०१०

गिरीष बापट,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

(तीन)

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
१)	**अतिरिक्त खर्च नियमानुकूल करणे** **(एक) अतिरिक्त खर्च २००२-२००३** **(दोन) अतिरिक्त खर्च २००३-२००४**	
	सन २००२-२००३	
२)	**गृह विभाग :** निधी उपलब्ध असतानाही खर्च न करणे	
३)	**नगरविकास विभाग :** महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम यांच्या अधिन न राहता अधिकाऱ्यांनी केलेले चुकीचे पुनर्विलोकन	
४)	**सार्वजनिक आरोग्य विभाग :** राज्यातील अनेक रुग्ण जीवनदायी योजनेच्या लाभापासून वंचित राहत असल्याबाबत	
५)	**सार्वजनिक बांधकाम विभाग :** अनुदानापेक्षा अधिक खर्च	
६)	**जलसंपदा विभाग :** महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात असलेली तफावत ही गैरवर्गीकरणामुळे झालेली आहे.	
	२००३-२००४	
७)	**ग्रामविकास विभाग :** संपूर्ण ग्रामीण योजना या शिर्षाखाली वळविण्यात आलेला निधी	
८)	**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग :** राज्याची जेवढी गरज आहे तेवढा निधी वित्त विभागाकडून सामाजिक न्याय विभागाला दिला जात नाही.	

(१) (एक) अतिरिक्त खर्च नियमानुकूल करणे
(सन २००२-२००३)

या अहवालामध्ये समितीने इतरत्र व्यक्त केलेल्या अभिप्रायास अधीन राहून खाली दर्शविण्यात आलेला जादा खर्च नियमानुकूल करण्यासाठी आवश्यक ते उपाय योजण्यात यावेत.

खालील प्रकरणामध्ये दत्तमत वा भारित अनुदान/विनियोजनाच्या रक्कमेपेक्षा महसूली लेख्यावरील खर्चाची रक्कम अधिक असल्याचे सन २००२-२००३ च्या लेख्यावरुन दिसून येते.:-

अ.क्र.	अनुदान/विनियोजनाचा क्रमांक व नाव	एकूण अनुदान/ विनियोजनापेक्षा झालेला जादा खर्च (दत्तमत)	एकूण अनुदान /विनियोजनापेक्षा झालेला जादा खर्च (भारित)
(१)	**(२)**	**(३) (रुपये)**	**(४) (रुपये)**
	सामान्य प्रशासन विभाग		
१)	ए-४ सेक्रेटरिएट-संकीर्ण सर्वसाधारण सेवा		४८,५८१
२)	ए-५ सामाजिक सेवा		१०,२०,८२४
	गृह विभाग		
३)	बी-१ पोलीस प्रशासन		२८,२३,३३२
४)	बी-३ वाहतूक प्रशासन		१२,०२३
	महसूल व वन विभाग		
५)	सी-३ व्याज प्रदाने		१६,४२,८७७
६)	सी-५ इतर सामाजिक सेवा		६,४६,७२०
७)	सी-९ नुकसान भरपाई व अभिहस्तांकने	४९७७०	
	कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग		
८)	डी-४ दुग्धव्यवसाय विभाग		१,०९,२५,३२०
	सार्वजनिक बांधकाम विभाग		
९)	एच-१ व्याज प्रदाने		३२९
१०)	एच-३ गृहनिर्माण	१७,८४,६८,२४०	
११)	एच-५ मार्ग व पूल		२,६७,३०,०००
	पाटबंधारे विभाग		
१२)	आय-१ पाटबंधारे, वीज व इतर आर्थिक सेवा	१०,८३,८८,८३,४९४	
	ग्रामविकास व जलसंधारण विभाग		
१३)	एल-१ व्याज प्रदाने		१,८२,४२,२१,६८१

१.	२.	३.	४.
	नियोजन विभाग		
१४)	ओ-१ जिल्हा प्रशासन	३,४२,१६५	
१५)	ओ-२ ग्रामीण रोजगार	३९,०५,४५,३२२	
	वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग		
१६)	एस-१ वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य	१,३७,२८,९२१	
	सहकार व वस्त्रोद्योग विभाग		
१७)	व्ही-२ कामगार व सेवायोजन	३५,९१६	
	नियोजन विभाग		
१८)	वाय-१ व्याज प्रदाने		२,१८,७०,६३९
१९)	वाय-३ लहान पाटबंधारे	४३,१८,५८७	
२०)	वाय-५ नुकसानभरपाई व अभिहस्तांकने	८,८२८	
	एकूण ए महसूली लेख्यावरील भांडवली खर्च	**११,४२,६३,८१,२४३**	**१,८८,९९,४२,३२६**

<u>बी- भांडवली लेख्यावरील खर्च</u>

	गृह विभाग		
१)	बी-१० गृहनिर्माणासाठी कर्जे	५,८१,०३,३६१	
	महसूल व वन विभाग		
२)	सी-१० इतर प्रशासनिक सेवा व इतर सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च		७४,३६,९२६
	नगरविकास विभाग		
३)	एफ-५ सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च		१,०३,८८,२२३
	वित्त विभाग		
४)	जी-८ सार्वजनिक ऋण व आंतरराज्य तडजोड		९,९०,१०,७५,५२९
	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग		
५)	एम-३ अन्नावरील भांडवली खर्च	२,१२,३६,३८,९३९	
	एकूण बी भांडवली लेख्यावरील खर्च	२,१८,१७,४२,३००	९,९१,८९,००,६७८
	एकूण (ए +बी)	**१३,६०,८१,२३,५४३**	**११,८०,८८,४३,००४**

तळटीप : - समितीने जेव्हा जादा खर्च नियमानुकूल करण्याविषयी शिफारस केलेली असते, अशा वेळी समितीने यापूर्वी केलेल्या शिफारशीनुसार (सन १९५३-५४ च्या विनियोजन लेख्यावरील अहवालांचा परिच्छेद १० पहा.) ज्यामुळे कोणताही जादा खर्च नियमानुकूल करणे आवश्यक ठरते किंवा टाळता येते अशा प्रकारचे लेख्यांवरील कोणतेही प्रस्थापित गैरवर्गीकरण हिशेबात घेणे आवश्यक आहे. म्हणून अशा प्रकारे गैरवर्गीकरणाच्या रक्कमा हिशेबात घेऊनच वर दर्शविण्यात आलेल्या रक्कमा काढण्यात आलेल्या आहेत.

(२) (दोन) अतिरिक्त खर्च नियमानुकूल करणे
(सन २००३-२००४)

या अहवालामध्ये समितीने इतरत्र व्यक्त केलेल्या अभिप्रायास अधीन राहून खाली दर्शविण्यात आलेला जादा खर्च नियमानुकूल करण्यासाठी आवश्यक ते उपाय योजण्यात यावेत.

खालील प्रकरणामध्ये दत्तमत वा भारित अनुदान/ विनियोजनाच्या रकमेपेक्षा महसूली लेख्यावरील खर्चाची रक्कम अधिक असल्याचे सन २००३-२००४ च्या लेख्यावरुन दिसून येते.:-

अ.क्र.	अनुदान/विनियोजनाचा क्रमांक व नाव	एकूण अनुदान/ विनियोजनापेक्षा झालेला जादा खर्च (दत्तमत)	एकूण अनुदान /विनियोजनापेक्षा झालेला जादा खर्च (भारित)
(१)	**(२)**	**(३) (रुपये)**	**(४) (रुपये)**
	महसूल व वन विभाग		
१)	सी-३ व्याज प्रदाने	२६७	
	कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग		
२)	डी-१ व्याज प्रदाने		१,५९,७८,७२६
३)	डी-४ दुग्धव्यवसाय विकास		९५,९०,६१०
	शालेय शिक्षण विभाग		
४)	ई-२ सर्वसाधारण शिक्षण	७९,११,६०,७६७	
	सार्वजनिक बांधकाम विभाग		
५)	एच-३ गृहनिर्माण	६,०१,३३,२९५	
६)	एच-५ मार्ग व पूल		८२,००,०००
	पाटबंधारे विभाग		
७)	आय-१ पाटबंधारे, वीज व आर्थिक सेवा	१६,७१,१५,७२५	२,८५,०००
	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग		
८)	एम-२ सेक्रेटरिएट व इतर आर्थिक सेवा	४८,६४,३६५	
	सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग		
९)	एन-४ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण		९०,९७६
	नियोजन विभाग		
१०)	ओ-२ ग्रामीण रोजगार	३,६२,२९,०२४	
११)	ओ-७ जनगणना, सर्वेक्षण व सांख्यिकी	११,४७,६०६	
	गृहनिर्माण विभाग		
१२)	क्यू-१ व्याज प्रदाने		१,४४,६४,१६५
१३)	क्यू-२ प्रशासकीय सेवा	२,५७,५७५	

१.	२.	३.	४.
	आदिवासी विकास विभाग		
१४)	टी-१ व्याज प्रदाने		४७,४९,९२२
	पर्यावरण विभाग		
१५)	यू-१ व्याज प्रदाने		१,१८,२५८
	उच्च व तंत्र शिक्षण विभाग		
१६)	डब्ल्यु-१ व्याज प्रदाने		२,२३,१३,७५१
१७)	डब्ल्यु-४ कला व संस्कृती	४,९५,४९,७३०	
	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग		
१८)	वाय-३ लहान पाटबंधारे	३६,०६,३११	
	एकूण ए महसूल लेख्यावरील भांडवली खर्च	**१,११,४०,६४,६६५**	**७,५७,९१,४०८**

बी- भांडवली लेख्यावरील खर्च			
	महसूल व वन विभाग		
१)	सी-९ इतर प्रशासनिक सेवा व सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च		४८,४८,८४८
२)	सी-१० आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च		२,८३,६१७
	नगर विकास विभाग		
३)	एफ-५ सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च		५,५६,६३,७३२
	उद्योग उर्जा व कामगार विभाग		
४)	के-९ उर्जेवरील भांडवली खर्च	८,८९,४४,२७,०००	
	सहकार व वस्त्रोद्योग विभाग		
५)	व्ही-४ सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील भांडवली खर्च		२४,९९,६२९
	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग		
६)	वाय -६ आर्थिक व सामाजिक सेवा यांवरील खर्च		३९,४७६
	एकूण बी भांडवली लेख्यावरील खर्च	**८,८९,४४,२७,०००**	**६,३३,३५,३०२**
	एकूण (ए+बी)	**१०,००,८४,९१,६६५**	**१३,९१,२६,७१०**

तळटीप : --समितीने जेव्हा जादा खर्च नियमानुकूल करण्याविषयी शिफारस केलेली असते, अशा वेळी समितीने यापूर्वी केलेल्या शिफारशीनुसार (सन १९५३-५४ च्या विनियोजन लेख्यावरील अहवालांचा परिच्छेद क्र. १० पहा.) ज्यामुळे कोणताही जादा खर्च नियमानुकूल करणे आवश्यक ठरते किंवा टाळता येते अशा प्रकारचे लेख्यांवरील कोणतेही प्रस्थापित गैरवर्गीकरण हिशेबात घेणे आवश्यक आहे. म्हणून अशा प्रकारे गैरवर्गीकरणाच्या रकमा हिशेबात घेऊनच वर दर्शविण्यात आलेल्या रकमा काढण्यात आलेल्या आहेत.

गृह विभाग

२) निधी उपलब्ध असतानाही खर्च न करणे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र. बी-१ "पोलीस प्रशासन" अंतर्गत प्रधान शीर्ष २०१४-न्यायदान, २०५५-पोलीस व २०७०-इतर प्रशासकीय सेवा याखाली रुपये ३,०७,५९.६९ लक्ष इतक्या खर्चाची बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

प्रधानशीर्ष - २०१४
अनुदान क्रमांक बी- १- पोलीस प्रशासन

१) प्रधान शीर्ष	एकूण अनुदान रुपये	प्रत्यक्ष खर्च रुपये	अधिक खर्च (+)/बचत (-) रुपये
२०१४, न्यायदान २०५५, पोलीस २०७०, इतर प्रशासनिक सेवा **दत्तमत -** मूळ.....१९,३५,५३,१५,००० पूरक ... १,४१,४६,७७,०००	२०,७६,९९,९२,०००	१७,६९,४०,२२,६१५	-३,०७,५९,६९,३८५
वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च,२००३)			१,१३,४९,१४,०००
भारित - मूळ..... ४०,५०,००० पूरक ... १,०००	४०,५१,०००	६८,७४,३३२	+२८,२३,३३२

वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम

उपरोक्त परिच्छेदाबाबत महालेखापालांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

१. मुळ तरतूदी इतका देखील खर्च झाला नाही.

२. रुपये ३,०७,५९.६९ लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता रुपये १४१४६.७७ लाख इतकी पूरक तरतूद अनावश्यक असल्याचे सिध्द झाले आणि ती लाक्षणिक मागणी करुन निर्बंधित करता येऊ शकली असती.

३. रुपये ३,०७,५९.६९ लाख इतकी अंतिम बचत असताना, रुपये ११३४९.१४ लाख इतकी रक्कम परत करणे अपेक्षित होते.

ज्ञापन : -

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले :-

उपलेखाशीर्षनिहाय अभिप्राय खालील प्रमाणे आहेत :-

अनुदान क्रमांक बी- १- पोलीस प्रशासन

शिर्ष	एकूण अनुदान रुपये	प्रत्यक्ष खर्च रुपये	अधिक खर्च (+)/बचत (-) रुपये
२) २०५५, पोलीस ००३, शिक्षण व प्रशिक्षण ००३ (००)(०१) पोलिस प्रशिक्षण शाळा मूळ.....१,०४२.३० पुनर्विनियोजन.....-१३३.६५	९०८.६५	९११.२१	+२.५६

ज्ञापन : -

महालेखापालांनी अहवालात रु.९११.२१ लाख एवढा खर्च दाखविला असला तरी प्रत्यक्षात रु.९११.७७ लाख एवढा खर्च झाला आहे. त्यामुळे प्रत्यक्षात रु.२.५६ लाख ऐवजी रु.३.१२ लाख इतका अधिक खर्च झाला आहे. महालेखापाल १, मुंबई यांनी पत्र क्रमांक डीसी-३/२०५५ पोलीस टीआर नं.२५/१७ एबी, दिनांक ७/४/२००४ च्या पत्रान्वये रु.(+) ५५,२३४/- व पत्र क्रमांक डीस ३/२०५५ पोलीस टीआर नं.६१३/३२७/ एबी, दिनांक १०/२/२००४ च्या पत्रान्वये रु. (+) १,१७०/- लाख इतक्या रकमेंच्या चुकीच्या दुरुस्तीच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. एकूण तरतुदीच्या मानाने झालेला अधिकचा खर्च अत्यल्प आहे. रजा प्रवास सवलत, प्रवास भत्ता यावरील खर्चातील वाढ यामुळे अधिक खर्च झाला आहे. मंजूर केलेल्या चुकीच्या प्रस्तावानुसार रु.९,११,७७,३७१/- इतका प्रत्यक्ष खर्च झाला आहे.

अनुदान क्रमांक बी- १- पोलीस प्रशासन

३) २०७० इतर प्रशासनिक सेवा १०६, नागरी संरक्षण १०६ (०३) (०१) राज्य नागरी संरक्षण संघटनेची अस्थापना मूळ... ४९२.१२ पूरक... ५९१.८९ पुनर्विनियोजन इ ६४.३२	१,०१९.६९	६६८.९२	-३५०.७७

ज्ञापन : -

विभागाने झालेल्या बचतीची कारणे खालील प्रमाणे दिली आहेत.

१) वेतन फरकाची देयके अधिदान व लेखा कार्यालयाने आक्षेपासह परत केल्याने बचत झाली.

२) पुस्तके खरेदी न केल्यामुळे तसेच प्रोत्साहनात्मक बक्षिसे न दिल्यामुळे बचत झाली.

३) वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती, रजा प्रवास सवलतीची देयके अधिदान व लेखा कार्यालयाकडून पारित न झाल्यामुळे बचत दिसून येत आहे.

अनुदान क्रमांक बी- १- पोलीस प्रशासन

शिर्ष		एकूण अनुदान रुपये	प्रत्यक्ष खर्च रुपये	अधिक खर्च (+)/बचत (-) रुपये
४) २०७० इतर प्रशासनिक सेवा				
१२०, राज्य/संघराज्य क्षेत्रांना द्यावयाची प्रदाने				
१२० (००) (०१) विदेशी नोंदणी अधिनियम, १९३९				
मूळ...	५१२.४५	५२१.७०	३९९.५७	-१२२.१३
पुनर्विनियोजन -	९.२५			

वित्त विभागाने सुधारित अंदाजाच्या आधारावर उल्लेखिलेल्या शीर्षाखालील रुपये २२.०८ लाखांचा अतिरिक्त निधी दिला. वर उल्लेखिलेल्या शीर्षाखालील रुपये १७३.३२ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००३)

ज्ञापन : -

वित्तीय वर्ष सन २००२-०३ मध्ये प्रस्तुत लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानात झालेल्या बचतीच्या कारणांची पुन्हा बारकाईने छाननी केली असता, प्रामुख्याने वेतन, प्रवास खर्च या उद्दिष्टाखाली बचत झाल्याचे दिसून आले आहे. बचतीचे प्रमुख कारण म्हणजे वित्तीय वर्ष सन २००२-०३ मध्ये बरीचशी पोलीस अधिकारी/ पोलीस अंमलदार यांची पदे रिक्त होती. त्यामुळे वेतनाच्या अनुदानात बरीच मोठी बचत झालेली आहे.

अनुदान क्रमांक बी- १- पोलीस प्रशासन

५) २०५५ पोलीस

११५, पोलीस दलाचे आधुनिकीकरण

११५ (००) (०२) जिल्हा पोलीस

मूळ...	१९,६२०.२९	३१,६६३.२९	१०,७००.८७	-२०,९६२.४२
पूरक...	१२,०४३.००			

मूळ तरतूदी इतका देखील खर्च झाला नाही. केंद्र सरकारच्या सहाय्याने पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी डिसेंबर, २००२ मध्ये मिळविण्यात आलेली रुपये १२०४३ लाखांची संपूर्ण पूरक तरतूद वापरण्यात न आल्यामुळे पडून राहिली आणि ती परत देखील करण्यात आली नाही.

रुपये २०९६२.४२ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००३)

ज्ञापन : -

दळण -वळण साहित्य सामग्री, वाहने व इतर साधन सामग्री खरेदी करण्यासाठी विहीत पध्दती अवलंबविण्यात येते. विहित पध्दतीनुसार कार्यवाही आर्थिक वर्षात पूर्ण न झाल्याने तसेच निविदा प्रक्रिया आर्थिक वर्षात पूर्ण न झाल्याने बचत झाली आहे.

अनुदान क्रमांक बी- १- पोलीस प्रशासन

शिर्ष	एकूण अनुदान रुपये	प्रत्यक्ष खर्च रुपये	अधिक खर्च (+)/बचत (-) रुपये लाखात
६) २०५५ पोलीस			
११५, पोलीस दलाचे आधुनिकीकरण			
११५ (००) (०१) शहर पोलीस			
मूळ ... . }	...	२,२८५.३०	+२,२८५.३०
७) ११५ (००) (०३) न्यायसहायक विज्ञान			
मूळ ...	...	९४५.५४	+९४५.५४

वर उल्लेखिलेल्या उप-शीर्षाखाली अर्थसंकल्पीय तरतुदीशिवाय करण्यात आलेल्या अधिक खर्चाची कारणे प्रतीक्षित आहेत (ऑगस्ट २००३).

१. विनियोजनामधील रुपये २८,२३,३३२ लाखांचा अधिक खर्च नियमात बसविणे आवश्यक आहे.

ज्ञापन : -

अहवालात तरतूद "निरंक" दर्शविण्यात आली असली तरी पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाकडून उपलब्ध झालेल्या रु.१५,१७,३१२८/- पैकी रु.५२४६.८२८/- एवढी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अहवालात रु.२२८५.३० लाख एवढी खर्चाची रक्कम दर्शविण्यात आली. प्रत्यक्षात रु.२४०१.१७ लाख झाला आहे. त्यामुळे या उपलेखाशीर्षाखाली रु.२२८५.३० लाख एवढा खर्च झाला नसून, रु.२८४५.६५ लाख एवढी झाली आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण करेपर्यंत आर्थिक वर्ष संपल्याने बचत झाली.

गृह विभाग मागणी क्रमांक बी.१, लेखाशीर्ष २०५५ पोलीस ११५, पोलीस दलाचे आधुनिकीरण (००) (०२) जिल्हा पोलीस, ३२ यंत्रसामुग्री व साधन सामग्री खाली सन २००२-०३ या आर्थिक वर्षात पोलीस दल आधुनिकीकरणाचा कार्यक्रम राबविण्याकरिता रु.३१६.६३ कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली होती. न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या पोलीस दल आधुनिकीकरणाचा कार्यक्रम राबविण्याकरिता (००) (०२) जिल्हा पोलीस गौण शीर्षाखाली करण्यात आलेली अर्थसंकल्पीय तरतूद महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका परिच्छेद-१६२,१६३ व १६४ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन त्याच प्रदान व उपलेखाशीर्षाखालील गौण शीर्षाकरिता पुनर्विनियोजन करुन (००) (०३) न्यायसहायक विज्ञान या गौण शीर्षाखाली १,४९,९९५/- कोटी एवढ्या गृह विभागशासन निर्णय दिनांक २६/४/२००२, ८/७/२००२ व २९/३/२००३ अन्वये उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदीतून रु.९४,५५४/-कोटी इतका खर्च भागविण्यात आलेला असून खर्च झालेला नाही. पुनर्विनियोजनाचे स्वतंत्र आदेश निर्गमित न केल्याबाबत लोकलेखा समितीला स्पष्टीकरण देण्यात येईल असेही नमूद करण्यात आले होते.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र. बी-२ "राज्य उत्पादन शुल्क" अंतर्गत प्रधान शीर्ष २०३९, राज्य उत्पादक शुल्क याखाली रुपये -१,७२,७५,८०२/- इतक्या खर्चाची बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

प्रधानशिर्ष २०३९

अनुदान क्रमांक बी- २- राज्य उत्पादन शुल्क

१) शीर्ष		एकूण अनुदान रुपये	प्रत्यक्ष खर्च रुपये	अधिक खर्च (+)/बचत (-) रुपये
प्रधान शीर्ष				
२०३९, राज्य उत्पादन शुल्क				
दत्तमत ...				
मूळ ...	२६,४१,५३,०००			
पुरक ...	३,७२,५८,०००	३०,१४,११,०००	२८,४१,३५,१९८	-१,७२,७५,८०२
वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम				१,१०,००,०००
(मार्च २००३)				

टिपा व भाष्ये -

१. रुपये १७२.७६ लाख इतकी अंतिम बचत असताना वर्षभरामध्ये फक्त रुपये ११० लाख इतका निधी परत करण्यात आला.

ज्ञापन : -

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे.

सदरचा खर्च हा न्यायालयीन आदेशानुसार होत असल्यामुळे या खर्चाचा अदांज करणे शक्य नव्हते. त्यामुळे बचत झाली आहे.

२) शीर्ष		एकूण अनुदान रुपये	प्रत्यक्ष खर्च रुपये	अधिक खर्च (+)/बचत (-) रुपये
००१, संचालन व प्रशासन				
००१, (०१) (०१) आयुक्त कार्यालय				
आस्थापना				
मूळ ...	१८०.२५			
पूरक ...	२४४.२२	४१४.४७	३६७.६३	-४६.८४
पुनर्विनियोजन ..	-१०.००			

रिक्त पदे भरण्यास विलंब झाल्यामुळे रुपये १० लाख इतकी रक्कम परत करण्यात आली. रुपये ४६.८४ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००३)

ज्ञापन : -

या विभागाला मोटार वाहने खरेदीसाठी रु.२,००.०० लक्ष अनुदान प्राप्त झाले होते. तथापि, नवीन ५३ वाहने घेण्यासाठी रु.१.६९.७३ लक्ष इतका खर्च झाल्याने या उद्दिष्टात रु.३०.२७ लाख एवढी बचत झाली आहे. तसेच उर्वरित बचत आयुक्तालयातील रिक्त पदांमुळे झालेली आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र. बी-३ वाहतूक प्रशासन अंतर्गत प्रधान शीर्ष २०४१, वाहनांवरील खर्च, ३०५५, मार्ग परिवहन व ३०५६, देशांतर्गत जलवाहतूक याखाली रुपये -२४४,८०,१८,१६३/- इतक्या खर्चाची बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

प्रधानशिर्ष २०४१
अनुदान क्रमांक बी- ३- वाहतूक प्रशासन

शिर्ष	एकूण अनुदान रुपये	प्रत्यक्ष खर्च रुपये	अधिक खर्च (+)/बचत (-) रुपये
२०४१, वाहनांवरील कर ३०५५, मार्ग परिवहन ३०५६, देशांतर्गत जलवाहतुक दत्तमत ... मूळ ... २,८८,६६,७९,००० पुरक ... १,९५,७९,०००	२,९०,६२,५८,०००	४५,८२,३९,८३७	-२४४,८०,१८,१६३
वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २००३)			१,०८,७६,०००
भारित -- मूळ ... ६,६६,५७,८९,००० पुरक ... २२,१४,०००	६,६६,८०,०३,०००	६,६६,५०,१५,०२३	+१२,०२३

महालेखापालांनी उपरोक्त परिच्छेदाबाबत खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

१. मूळ तरतुदी इतका देखील खर्च झाला नाही.

२. रुपये २४४८०.१८ लाख इतकी अंतिम बचत असताना रुपये १९५.७९ लाखांची पूरक तरतूद अत्याधिक असल्याचे सिध्द झाले.

३. रुपये २४४८०.१८ लाख इतकी अंतिम बचत असताना मार्च,२००३ मध्ये फक्त रुपये १०८.७६ लाख इतकी रक्कम परत करणे अपेक्षित होते.

४. बचत पुढील शीर्षाखाली झाली.

शीर्ष		एकूण अनुदान रुपये	प्रत्यक्ष खर्च रुपये (रुपये लाखांत)	अधिक खर्च (+)/बचत (-) रुपये
२०४१, वाहनांवरील कर				
००१, संचालन व प्रशासन				
००१, (०१) (०२) आस्थापना- परिवहन आयुक्त				
मूळ ...	२४,१५९.९८	२४,२००.३४	३६४.३१	-२३,८३६.०३
पुरक ...	८३.१२			
पुनर्विनियोजन ..	-४२.७६			

सुधारित अंदाजांमुळे मार्च, २००३ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रुपये ४२.७६ लाखांचा काढण्यात आला. रुपये २३८३६.०३ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००३).

ज्ञापन : -

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात गृह विभागाने खालील लेखाशीर्षावर खुलासा केलेला आहे.

विभागाने पाठविलेल्या लेखी ज्ञापनात असे नमूद केले आहे की, विनियोजन लेख्यात दिलेली बचत रु.(-)२३८३६.०३ नसून बचत फक्त रु.१३१७.४९ लाख आहे त्याची कारण मिमांसा पुढीलप्रमाणे आहे.

रु.२४२००.३४ लाख एकूण तरतुदी पैकी रु.२३८८३.११ लाख एवढी तरतुद शिल्लक राहिली आहे. सवलतीचे मुल्यांचे समायोजन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून शासनाला येणे प्रवासी करा सोबत होत असते. त्यासाठी शासनाकडून वर्ष २००२-०३ करिता फक्त रु.२१५.९३ कोटी देय ठरले व रु.९.२५ कोटी महामंडळाला शासनाने भाग भांडवल म्हणून दिले. अशा प्रकारे एकूण रु.२२५.१८ कोटीचे समायोजन वर्षाच्या शेवटी करण्यासाठी परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत अधिदान व लेखा कार्यालयास कळविले. त्या प्रमाणे अधिदान व लेखा कार्यालयाने त्यांच्या लेख्यात नोंद घेतली. परंतु सदर रकमा महालेखापालांच्या लेख्यात न आल्याने चुकीच्या नोंदी बाबतचे दुरुस्तीचे प्रस्ताव परिवहन आयुक्त कार्यालयाने दिनांक २९/१/२००४च्या पत्रान्वये अधिदान व लेखा अधिकारी यांचे कार्यालयात सादर केले.

सदर चुकीच्या नोंदीची दुरुस्ती लेख्यात करण्यासाठी अधिदान व लेखा कार्यालयाने त्यांचे पत्र क्र. अलेका/रालेवि/एक/२०४१/५८८, दिनांक ४/२/२००४ अन्वये महालेखापालांना कळविले.

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात अधिक माहिती घेण्याच्या दृष्टीने समितीने दि. ४ मे, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने गृह विभागाच्या सचिवांना अशी विचारणा केली की, मूळ तरतुदी इतका देखील खर्च झाला नाही. तसेच अंतिम बचत रुपये १४१४६.७७ लाख लक्षात घेता पूरक तरतूद अनावश्यक असल्याचे महालेखापालांचे म्हणणे आहे.याबाबत खुलासा करताना सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, गृह विभागाचे एकूण अनुदान रुपये २०,७६,९९,९२,००० होते. यापैकी रुपये १७,६९,४०,२२,६१५ इतका प्रत्यक्ष खर्च झालेला असून रुपये ३,०७,५९,६९,३८५ इतकी रक्कम शासनास परत करायला पाहिजे होती. परंतु प्रत्यक्ष खर्चाचा अंदाज येत नसल्यामुळे रुपये १,१३,४९,१४,००० इतकी रक्कम प्रत्यापर्तित करण्यात आली. यापैकी रुपये १९४ कोटी रक्कम सन २००२-२००३ मार्च अखेरपर्यंत परत करण्यात आली आहे. पोलीस दलाचे आधुनिकीकरणासाठी रुपये २१६ कोटी उपलब्ध झाले होते. यापैकी १०७ कोटी रुपये खर्च झाले असून रुपये २० कोटीची बचत झालेली आहे. पोलिस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाने दरवर्षी कार्यक्रम जाहीर केला होता. या कार्यक्रमाला क्रेंद्र शासनाने नोव्हेंबर, २००२ मध्ये मान्यता दिली. परंतु, शासनाचे आदेश दिनांक १४ जानेवारी, २००३ व २९ मार्च, २००३ रोजी निर्गमित झाले. त्यामुळे निविदा प्रक्रियेसाठी फारसा वेळ मिळालेला नाही. पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा कार्यक्रम सन २००१-२००२ मध्ये केंद्र शासनाने मंजूर केला होता. सन २००१-२००२ मधील रक्कम अखर्चित होती. केंद्र सरकारचे १२० कोटी रुपये होते. परंतु, त्यास उशिरा मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे डिसेंबर, २००२ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणी सादर करण्यात आली व त्याबाबतचे पुर्नविनियोजन होऊन शासन आदेश निघण्यासाठी जानेवारी महिना उजाडला. ३१६ कोटी रुपयांपैकी ३०४ कोटी रुपये प्रत्यक्षात मिळाले असून १२ कोटी रुपये केंद्रीय वित्त आयोगाकडून आलेले नाही. या ३०४ कोटी रुपयांपैकी १४०.७० कोटी रुपये खर्च केले आहेत. रुपये १६४.१६ कोटी शिल्लक राहिलेले आहेत, असेही समितीला सांगण्यात आले त्यावर समितीने अशी विचारणा केली की, पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यासाठी केंद्र शासनाने नोव्हेंबर महिन्यामध्ये मंजुरी दिली असताना दिनांक २९ मार्चला शासन निर्णय काढण्यात आला. तेव्हा सदर प्रस्ताव मंत्रालयामध्ये पाच महिने प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत, याबाबत खुलासा करताना सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, वित्तीय प्रस्तावासंबंधीची नस्ती मान्यतेसाठी वित्त विभागाकडे जाते. या प्रकरणाची सदर नस्ती मंजुरीसाठी वित्त विभागाकडे होती. त्यामुळे प्रस्तावाला मंजुरी मिळण्यासाठी विलंब लागला. समितीने पुढे अशी विचारणा केली की, अर्थसंकल्पात ५ ते १० टक्के कपात लागते. तसेच केंद्र सरकारचा निधी लगेच येत नाही व त्याला काही वेळा विलंब लागतो. त्यामुळे किती निधी येईल, याबाबतचे नियोजन आपण

अगोदरच केले पाहिजे. तसेच दिलेला निधी खर्च न करणे हे देखील उचित नाही. शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी ५ महिने वेळ लागणे हे ही योग्य नाही. त्याचप्रमाणे निधी उपलब्ध असूनही तो खर्च होत नाही हे संयुक्तीक नाही. निधी खर्च न होण्यास कोणामुळे विलंब झालेला आहे. महालेखापालांनी स्पष्टीकरण केले असले तरी देखील आपले अधिकारी महालेखापाल यांच्या कार्यालयात जाऊन खर्चमेळ करुन घेऊ शकतात. यासंबंधी यास जबाबदार कोण आहेत व त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली आहे काय, याबाबत समितीने स्पष्टीकरण मागितले असता याबाबत खुलासा करताना सचिवांनी अशी माहिती दिली की, पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी सन २००१-२००२ मध्ये सुरुवात झाली. यासाठी दरवर्षी १८४ कोटी रुपये देऊ असे केंद्र शासनातर्फे सांगण्यात आले होते. यासाठी राज्याने अर्थसंकल्पामध्ये तरतूद करावी अशी सूचना देखील त्यांनी केली होती व त्याप्रमाणे विभागाने प्रस्तावही तयार केला होता. त्यास मुख्य सचिवांची मान्यता घेतल्यानंतर तो केंद्र शासनाला सादर करण्यात येतो व नंतर त्याला केंद्र सरकार मान्यता देते. पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा कार्यक्रम दिनांक ५.८.२००० रोजी पोलीस आयूक्त, पोलीस महासंचालक यांच्या मान्यतेनंतर पाठविण्यात आला. सन २००३ पर्यंत त्याला मान्यता मिळाली. या दरम्यानच्या काळात तरतुदीच्या अधीन राहून निविदा प्रक्रिया सुरु होती. तथापि, प्रत्यक्ष निधी उपलब्ध झाल्यानंतरच निविदा प्रक्रिया सुरु करावी असा निर्णय घेण्यात आला.

सचिवांनी पुढे असेही प्रतिपादन केले की, पोलीस महासंचालक कार्यालयाचा शासन निर्णय दिनांक १४ जानेवारी २००३ रोजी निर्गमित झाला.एफएलएस संबंधातील केंद्र सरकारचे दिनांक ५ मार्च,२००३ रोजी पत्र आल्यानंतर दिनांक २९ मार्च,२००३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाच्या कामासाठी खर्च करावयाच्या निधीमध्ये केंद्र व राज्य शासनाचा ५०-५० टक्के हिस्सा असतो. केंद्र सरकारकडून या कामासाठी निधी मंजूर झाल्यानंतर व त्यासंबंधीचे आदेश निघाल्यानंतर खरेदीची प्रक्रिया सुरु होते. सदरहू खरेदी करण्याकरिता दर कराराप्रमाणे निविदा काढण्यात आल्या. यामध्ये वायब्रेटर, वायरलेस सेट इ. विशिष्ट प्रकारची उपकरणे खरेदी करण्याबाबत पोलीस महासंचालकांचे आदेश असल्यामुळे दर कराराप्रमाणे खरेदी करण्यात येते. यामध्ये बॉम्ब डिस्पोजल, हँड रायटींग एक्सपर्ट वेपनरी खरेदी करण्यात आली. त्यांची चाचणी करणारे उपकरण निर्यात दर्जाचे आहे. खरेदीची प्रक्रिया पूर्ण होण्याकरिता चार ते पाच महिन्यांचा कालावधी लागतो. ज्यावेळी खरेदीची प्रक्रिया शेवटच्या टप्प्यामध्ये असते, त्यावेळी शासनाला त्याप्रमाणे निधी मंजूर करण्यास सांगितले जाते. कधी कधी शेवटच्या टप्प्यापर्यंत सुध्दा निधीची मंजुरी मिळत नाही. दि.१४ जानेवारीला शासन निर्णय निघाल्यावर ३१६ कोटींपैकी १४० कोटी रुपये ३१ मार्च पर्यंत खर्च करण्यात आले. त्याचप्रमाणे केंद्र सरकारकडून राज्याला १२ कोटी रुपये मिळणार होते, ते आलेले नाहीत. त्यामुळे ३१६ कोटींपैकी ३०४ कोटीच रहातात. त्यापैकी १४० कोटी ४७ लाख रुपये दि.३१ मार्च पर्यंत खर्च करण्यात आले. उरलेला निधी खर्च करता आला नाही. त्यासाठी राज्य सरकारला विनंती करण्यात आली. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, अखर्चित रक्कम पुढील

वर्षासाठी वळविली काय, तसेच खरेदीची पध्दत काय आहे? त्यावर सचिवांनी अशी माहिती दिली की, पुढील वर्षी ९ कोटी ४६ लाख रुपये खर्च केले व सदर खर्च हा दर करारामध्ये ज्या बाबी अंतर्भूत असतात, त्यावर खर्च केला जातो. तसेच हे पैसे फोरेन्सिक लॅबोरेटरीसाठी खर्च केले. यामध्ये पोलीस महासंचालकांचा संबंध नाही. गृह विभागाच्या कार्यपध्दतीप्रमाणे जो पर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण होत नाही किंवा निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सुध्दा ३१ मार्चपर्यंत पुरवठा प्रक्रिया पूर्ण होत नाही, तो पर्यंत ते पैसे वापरले नाहीतर ते व्यपगत होतात. त्यामुळे ते ९ कोटी रुपये खर्च केले आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ऑगस्टमध्ये प्रस्ताव पाठविला मग विभागाने दिल्लीला पाठपुरावा केला का, त्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रयत्न केलेत काय, त्यांनी गृहमंत्र्यांची भेट घेतली काय, विभागाने अर्थसंकल्प मान्य होण्यापूर्वी या सर्व गोष्टी करावयास पाहिजेत. ज्या गोष्टीसाठी निधीची मागणी करीत आहात, त्या गोष्टींची तयारी विभागाने अगोदर करुन ठेवली पाहीजे. आपल्याकडे ३०४ कोटी रुपये उपलब्ध असतांना आपण फक्त १४० कोटी रुपये खर्च केले हे बरोबर वाटत नाही यावर सचिवांनी अशी माहिती दिली की, २४ कारागृह वाहनासाठी १४२ लाख ८० हजार रुपये खर्च करण्यात आले. यामध्ये वाहनांच्या चॅसिस घेण्यात आल्या. पूर्वी तयार वाहने घेतली जात होती परंतू त्यामध्ये वाहनांच्या गुणांकना मध्ये फरक दिसत होता. आता केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सुचनांनुसार पहिल्यांदा चॅसिस घेऊन नंतर त्यात सुधारणा करून वाहन तयार करुन घेण्यात येते, त्यामुळे पोलीसांची वाहने विशिष्ट प्रकारची असतात तशा प्रकारची वाहने दुसरीकडे नसतात. त्याचप्रमाणे श्वान पथकासाठी जी वाहने लागतात, तीही दुसरीकडे नसतात. कारागृह वाहने मोठ्या स्वरुपाची असतात. त्यांच्यासाठी टाटा कंपनीकडून चॅसिस घेतल्या जातात आणि त्यानंतर निविदा काढून अशोक ले-लँड कंपनीकडून वाहन बांधणीचे काम करुन घेण्यात येते. या कंपन्या आपल्या आवश्यकतेनुसार वाहन बांधणी करुन देतात. त्यामध्ये ढाली, लाठया, हत्यारे ठेवण्यासाठी कप्पे असतात. त्याचप्रमाणे कैद्यांसाठी खास कप्पे असतात. परंतु टाटा कंपनी फक्त ठराविक प्रकारच्या बसेस आणि विशिष्ट प्रकारच्या ॲम्ब्युलन्स गाडया तयार करुन देते, असेही प्रधान सचिवांनी साक्षीचे वेळी समितीला सांगितले. त्यावर समितीने चॅसीस कुठे व कधी घेतल्या, किती किंमतीला घेतल्या, त्याचप्रमाणे वाहन बांधणी कुठे करुन घेण्यात आले व त्यासाठी किती खर्च आला याची संपूर्ण माहिती समितीला सादर न करण्याची कारणे काय आहेत तसेच दोन दिवसामध्ये ९ कोटी रुपये खर्च केल्याचे जे नमूद केले आहे. याची निविदा प्रक्रिया अगोदरच करुन ठेवली होती काय? तसे असेल तर सर्वच कामांच्या बाबतीत अगोदर प्रक्रिया का करुन ठेवण्यात येत नाही? कारण विभागाकडे अर्थसंकल्पीय तरतुदीमधील निधी आहे, तसेच केंद्र सरकारकडून देखील पैसे आले आहेत. असे असताना विभागाला साहित्य खरेदी करण्याच्या प्रक्रियेला वेळ का लागतो? संपूर्ण प्रक्रियेचे नियोजन अगोदर पासूनच करण्याची कार्यपध्दती विभागाने अवलंबिणे आवश्यक असल्याचे समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत सचिवांनी अशी माहिती दिली की, विभागाने काटेकोर नियोजन केले असते तर विहीत

कालावधीमध्ये पैसे खर्च करता आले असते. याबाबतीत गृह विभागाने दिनांक २० मे, २००९ ला शासन निर्णय काढून खरेदीचे धोरण तयार केले असून त्या अनुषंगाने पोलीस खात्यामधील विविध खरेदीच्या बाबीकरिता पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली एक खरेदी समिती तयार करण्यात आली मार्चमध्ये मंजूर होणाऱ्या अर्थसंकल्पामधून मिळणारा अपेक्षित निधी लक्षात घेऊन त्याप्रमाणे नियोजन करुन विनिर्दिष्ठ केल्याप्रमाणे निविदा मागवून पुरवठा आदेश देण्याच्या टप्प्यापर्यंत येऊन थांबविण्यात येते, आणि निधी उपलब्ध झाल्यानंतर पुरवठा आदेश देण्यात येतात. अशाप्रकारे दिनांक २० मे, २००९ च्या शासन निर्णयानुसार धोरण ठरविण्यात आले असून त्यानुसार दिनांक ३० जूनच्या शासन निर्णयाप्रमाणे खरेदीचा कार्यक्रम ठरवून त्याप्रमाणे खरेदी करण्यात येते.

सन २००९ मध्ये किती अंदाजपत्रकीय तरतूद केली होती, व किती निधी खर्च केला तसेच त्यापूर्वी सन २००५, २००६ व २००७ मध्ये खर्च कां केले नाहीत ? एकदा अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर तो निधी विभागाकडे आला पाहिजे. त्यासाठी वेगळी मान्यता घ्यावी लागत नाही. गृहविभागाच्या कार्यपध्दतीमुळे याठिकाणी विंलब झालेला आहे. पाच ते सहा महिने झाले तरी विभागाकडून केंद्राकडे प्रस्ताव गेला नाही. त्यासाठी विभागाने काय केले अशी समितीने विचारणा केली असता याबाबत वित्त विभागाच्या सचिवांनी माहिती देताना असे सांगितले की, वित्तीय बाबी संदर्भात दोन गोष्टी उपस्थित होतात. याठिकाणी जोड देयक दिले गेले. त्याबाबतची पध्दत अशी आहे की, एकदा संक्षिप्त Abstract देयकाद्वारे कोषागारातून पैसे काढल्यानंतर एक महिन्याच्या आत कोषागारास तपशीलवार खर्चाचे देयक सादर केले पाहिजे. तसेच, एक महिन्याच्या आत खरेदीची प्रक्रिया पूर्ण केली पाहिजे. जोपर्यंत खरेदी प्रक्रिया पूर्ण होत नाही, तोपर्यंत जादा देयकाला मंजूरी मिळत नाही. त्याचप्रमाणे जर आपण पैसे खर्च करु शकलो नाहीतर केंद्र सरकार पुढील आर्थिक वर्षामध्ये तो निधी पुन्हा उपलब्ध करुन देते आणि त्या अनुषंगाने त्यामध्ये राज्य सरकारचा हिस्सा असेल तर तेवढे पैसे राज्य सरकारकडून मिळतात. वेतन फरकाची देयके अधिदान व लेखा कार्यालयाने आक्षेपासह परत केल्याने बचत झाली. पुस्तके खरेदी न केल्यामुळे, तसेच प्रोत्साहनात्मक बक्षिसे न दिल्यामुळे बचत झाली. वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती, रजा-प्रवास सवलतीची देयके अधिदान व लेखा कार्यालयाकडून पारित न झाल्यामुळे बचत दिसून येते असे म्हटले आहे, यामध्ये एकदा देयक मंजूर झाल्यानंतर ही रक्कम अखर्चित कशी दाखविली, याबाबतीत एक उदाहरण असे आहे की, एका रुग्णालयाची थकित देयके अदा न केल्यामुळे पोलीस खात्यातील कर्मचारी उपचाराकरिता आमच्या रुग्णालयामध्ये पाठवू नका असे त्या रुग्णालयाच्या प्रशासनाने सांगितले होते. असे नमूद केले आहे की ही बाब लक्षात घेता रक्कम अखर्चित राहण्याबाबत निश्चित कारण सांगून त्या गोष्टीला जे कुणी जबाबदार असतील, त्यांची नावे समितीला पाठविण्यात यावीत. समितीने अशी विचारणा केली की, आधुनिकीकरणाकरिता किती पैसे खर्च केले पाहिजेत, याकरिता काही आराखडा तयार केला होता काय, त्याकरिता ५ वर्षाच्या नियोजनाची तरतूद केली होती काय तसेच या आराखडयामध्ये कोणती शिर्षके आहेत, त्याची एक यादी समितीला

द्यावी. असे समितीने सांगितले असता त्यावर सचिवांनी अशी माहिती दिली की, पोलीस खात्याची गरज किती आहे हे पाहून पुढील १० वर्षामध्ये कोणत्या गोष्टी लागणार आहेत याचा आराखडा तयार करण्यात आला होता. आधुनिकीकरणाकरिता एकूण १० लेखाशिर्ष ठरविण्यात आले होते. त्यामध्ये मोबीलीटी, कम्युनिकेशन, वेपन्स इ. शिर्ष आहेत.

केंद्र शासनाकडून शासनाला ५ वर्षामध्ये २००० कोटी रुपये उपलब्ध होणार आहेत. त्या रकमेच्या विनियोजनासाठी ५ वर्षामध्ये आधुनिकीकरण करण्याच्या संदर्भात काही आराखडा तयार केला होता काय अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी असे सांगितले की, गृहविभागाकडे हत्यारे, मनुष्यबळ किती आहे, किती गोष्टींची आवश्यकता लागणार आहे, या करिता राज्य शासनाने तरतूद केली आहे. हे काम एका वर्षात होऊ शकणार नाही, या करिता १० वर्षामध्ये याची विभागणी करण्यात आलेली आहे. १८४ कोटी रुपयांपैकी १० टक्के खर्च हत्यारांवर केला जाणार असून १५ टक्के खर्च वाहने व इमारत बांधण्याकरिता केला जाणार आहे, अशा प्रकारे खर्चाची विभागणी करण्यात आलेली आहे. दर वर्षी या प्रमाणे निधीची मागणी केली जाते व एका उच्चाधिकार समितीपुढे या सर्व गोष्टी मांडल्या जातात. ही योजना ३१ मार्च २०१० पर्यंत होती. आता १० वर्षाची योजना संपलेली आहे. आधुनिकीकरणाची योजना चालू ठेवण्याच्या संदर्भात केंद्र शासनाने एक प्रकल्प तयार केलेला असून त्यासाठी केंद्र शासनाने १६९ कोटी रुपये मंजूर केले होते. त्या व्यतिरिक्त राज्य शासनाने हत्यारे व इतर बाबींकरिता १०३ कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. मुंबईच्या २६/११ च्या घटनेनंतर जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन दिला जाईल, असे केंद्र शासनाकडून सांगण्यात आले होते. प्रत्यक्षात मात्र त्याप्रमाणे केंद्र शासनाकडून राज्य शासनाला अतिरिक्त निधी प्राप्त झालेला नाही. सन २००९-२०१० करिता शासनाने ६२५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मात्र प्रत्यक्षात केंद्र शासनाकडून रक्कम मिळालेली नाही. तसेच १६९ कोटी रुपयांच्या योजनेला मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यापैकी ७५ टक्के रक्कम केंद्र शासन व २५ टक्के रक्कम राज्य शासन खर्च करणार आहे. ४५० कोटी रुपये मिळविण्याकरिता केंद्र शासनाकडे बराच पाठपुरावा केला होता, मात्र ती रक्कम अद्याप प्राप्त झालेली नाही, असेही सचिवांनी समितीला सांगितले.

पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे, अल्पोपहार भत्ता व साप्ताहिक सुट्टयांचा मोबदला यासाठी कमी खर्च तसेच कोषागारात देयके पारित न झाल्याने बचत झाली आहे हे लक्षात घेता ही देयके पारित न होण्याची कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता त्याबाबत माहिती देताना वित्त विभागाच्या सचिवांनी असे सांगितले की, देयके नामंजूर करताना त्यावर शेरे लिहिले जातात, त्यामुळे एखादे देयक कोणत्या कारणामुळे मंजूर होऊ शकले नाही, हे प्रशासकीय विभाग सांगू शकेल.त्यावर गृह विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की, सर्व गोष्टींची पूर्तता झाल्याशिवाय देयके मंजूर होत नाहीत.

त्यावर समितीने पोलीस कर्मचाऱ्यांना अल्पोपहार भत्ता किती दिला जातो,व त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता सचिवांनी अशी माहिती दिली की, पोलीस

कर्मचाऱ्यांना ३५ रुपये प्रतिदिन एवढा अल्पोपहार भत्ता दिला जातो. दुर्गम भागामध्ये पोलीस कर्मचाऱ्यांना काम करावे लागते. अशा वेळी ही रक्कम फारच अपुरी आहे. पूर्वी कर्मचाऱ्यांना केवळ १५ रुपये भत्ता दिला जात होता. आता ३५ रुपये करण्यात आलेला आहे.

फॉरेन्सीक लॅबमध्ये आवश्यक ती भरती करण्यात आलेली नाही. अनेक पदे रिक्त आहेत. शस्त्रास्त्रे व दारुगोळा हत्यारांच्या दुरुस्तीसाठी लागणाऱ्या साहित्याची कमी खरेदी झाल्याने बचत झालेली आहे. अशी समितीने विचारणा केली असता याबाबत सचिवांनी अशी माहिती दिली की, केंद्र शासनाचा शस्त्रास्त्रांच्या संदर्भात एक ब्युरो ऑफ पोलीस रिसर्च आहे. त्यांनी शस्त्रास्त्र खरेदीच्यासंदर्भात एक ड्राफ्ट वेपन पॉलिसी तयार केली होती. या विषयाच्या संदर्भात २००५ मध्ये एक समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल २००६ मध्ये आला होता. त्या अनुषंगाने पोलीसांकडे कोणती हत्यारे असावीत, तसेच ते कोणत्या प्रमाणात वितरीत करावेत वगैरे अनेक गोष्टी त्यामध्ये ठरविण्यात आल्या होत्या.

समितीने अशी विचारणा केली की, महालेखाकारांनी आक्षेप काढल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण देणे जरुरीचे असते, मात्र तशा प्रकारची कार्यवाही केली जात नाही. महालेखापालांनी आक्षेप काढल्यानंतर त्याची पूर्तता करणे आवश्यक आहे. महालेखापाल आपले काम चोखपणे बजावत असतात. महालेखापालांनी काढलेल्या आक्षेपांवर जे अधिकारी वेळेत उत्तरे देत नाहीत, अशा अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे असे समितीचे स्पष्ट मत आहे तसेच महालेखापालांनी काढलेल्या आक्षेपांवर उत्तरे देण्यासाठी हवालदार वगैरे सारख्या कनिष्ठ दर्जाच्या कर्मचाऱ्यांना पाठविणे योग्य नाही. याची देखील गृह विभागाने नोंद घ्यावी. असे समितीने सचिवाच्या निदर्शनास आणून दिले असता सचिवांनी अशी माहिती दिली की, त्रैमासिक खर्चमेळ करावे लागते. यासंदर्भात महालेखाकारांचा कार्यक्रम आखून दिलेला असतो. खर्चमेळ झालेले नसेल तर आम्ही पोलीस आयुक्त, पोलीस महासंचालक तसेच होमगार्ड या कार्यालयांना कळवून खर्चमेळ करावयास सांगण्यात येते. तसेच खर्चमेळ झाल्यानंतर त्याचा अहवाल देखील सादर करावयास सांगतो. तसेच वर्ष झाल्यानंतर विनियोजन लेखे समर्पित करावे लागतात. ते समर्पित झाल्यानंतर व त्या संदर्भातील चूकीच्या दुरुस्तीचे प्रस्ताव आल्यावर महालेखाकारांकडे त्याचा पाठपुरावा करावा लागतो. तसेच त्यांना विनियोजन लेख्यांची माहिती देखील द्यावी लागते. त्या अनुषंगाने विनियोजन लेखे विधानसभेत सादर झाल्यानंतर त्याबाबतची स्पष्टीकरणे लोकलेखा समितीला दिली जातात. महालेखापालाच्या कार्यालयातील आकडेवारीशी तुलना झाल्यानंतर प्रत्येक परिच्छेद महालेखाकारांकडे पाठविला जातो. कोणत्याही परिच्छेदाच्या बाबतीत महालेखापालांसोबत खर्चमेळ करण्यास तसेच चुकीच्या दुरुस्तीचा पाठपुरावा करण्याचे विभाग टाळत नाही. प्रत्येक वेळी महालेखापालांची मान्यता घेतली जाते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, रुपये १७२.७६ लाख इतकी या खात्याची अंतिम बचत असतांनाही या खात्याने शासनाकडे ११० लाख इतकाच निधी परत का केला? याबाबत सचिवांनी असे सांगितले की, सदरचा खर्च हा न्यायालयीन आदेशानुसार होत असल्यामुळे या खर्चाचा अंदाज करणे शक्य

नाही. त्यामुळे ही बचत झालेली आहे. तसेच, या विभागाला मोटार वाहने खरेदीसाठी रुपये २,००,०० लक्ष अनुदान प्राप्त झाले होते. तथापि, नवीन ५३ वाहने घेण्यासाठी रु.१,६९,७३ लक्ष इतका खर्च झाल्याने या उद्दिष्टात रु.३०.२७ लक्षांची बचत झाली आहे. तसेच, उर्वरित बचत पोलीस आयुक्तालयातील रिक्त पदांमुळे झालेली आहे. सदरची बचत ही वेतनामधील असून,पदे पदोन्नतीने रिक्त झाल्याने व ती भरण्यात न आल्याने तसेच, वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके व रजा प्रवास सवलत इत्यादी बाबत मागणी नसल्यामुळे तसेच वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके कोषागारात पारित न झाल्यामुळे बचत झालेली आहे. या खात्याची एकूण बचत झालेली आहे ती, वेतनावरील खर्चाची बचत रिक्त पदे असल्यामुळे झालेली आहे. यामध्ये जवळ जवळ ३०० ते ३५० पदांची भरती बाकी आहे. पोलीस उपनिरीक्षकांची जास्त पदे रिक्त आहेत. तसेच मोटार वाहनांची खरेदी करीत असतांना त्या वर्षी मोटार वाहनांच्या किमतींमध्ये मोठया प्रमाणावर घट झालेली होती, त्यामुळे या उद्दिष्टामध्ये ३०.२७ लक्ष रुपयांची बचत झाली आहे. एक कारण असे आहे की, कोषागारामध्ये काही देयके प्रलंबित असल्यामुळे व ती पारितच न झाल्यामुळे ही बचत पूर्णपणे शासनाकडे परत करता आलेली नाही. पोलीस उपनिरीक्षक दर्जाची ३०० ते ३२५ पदे रिक्त आहेत. ही पदे सन २००८ पर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून भरण्याचे ठरले होते. परंतु सन २००२-२००३ पासून ते सन २००९ पर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून ही पदे भरली गेली नाहीत. मग सन २००९ मध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला की, ही पदे विभागाच्या माध्यमातूनच थेट भरती करण्यात यावीत. या पदांच्या भरतीविषयीचे नियम निश्चित करुन झालेले आहेत. हे पदभरतीचे काम एका संस्थेला देण्याचे विभागाने ठरविलेले असून त्याकरिता आऊटसोर्सिंग करण्याचे देखील ठरविलेले आहे. या पदांच्या भरतीच्या प्रमाणानुसार या संवर्गातील एकूण पदांपैकी ५० टक्के पदे पदोन्नतीने भरण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली असून ती पदे पूर्ण भरली गेलेली आहेत. उर्वरित ५० टक्के पदे थेट भरतीद्वारे भ रण्याचे ठरविलेले आहे. या पदांच्या भरतीकरिता भरती नियम निश्चित करण्याकरिता याबाबत प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आला होता. व तो मान्य झाल्यामुळे **त्या पदांच्या भरतीचे काम सुरु करणार आहोत. एकूण सहा महिन्यांमध्ये या पदांच्या भरतीचे काम भरती माध्यमातून आऊटसोर्सिंग करुन पूर्ण करण्यात येणार आहे, अशी माहिती समितीला साक्षीच्या वेळी देण्यात आली.**

अभिप्राय व शिफारशी :

गृहविभागाचे एकूण अनुदान रुपये २०,७६,९९,९२००० होते यापैकी रुपये १७,६९,४०,२२,६१५ इतका प्रत्यक्ष खर्च झालेला असून रुपये ३,०७,५९,६९,३८५ एवढी रक्कम शासनाला परत करायला पाहीजे होती. परंतु प्रत्यक्ष खर्चाचा अंदाज येत नसल्यामुळे रुपये १,१३,४९,१४,००० इतकी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली. पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाने नोव्हेंबर,२००२ मध्ये मान्यता दिली. परंतु याबाबत शासनाचे आदेश दिनांक १४ जानेवारी, २००३ व दिनांक २९ मार्च, २००३ रोजी निर्गमित झाले पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाने दिलेली सन २००१-०२ मधील रक्कम १२० कोटी रुपये

खर्चीत होती. त्याला उशिरा मान्यता मिळाल्यामुळे शासन आदेश जानेवारी, २००३ मध्ये निघाला. पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाने नोव्हेंबर महिन्यात मंजूरी दिली पण त्याबाबतचा शासन निर्णय २९ मार्चला काढण्यात आला. याचाच अर्थ सदर प्रस्ताव मंत्रालयात पाच महिने प्रलंबित राहिला.त्यामुळे प्रस्तावाला मंजुरी मिळण्यासाठी विलंब झालेला आहे. **अर्थसंकल्पात पाच ते दहा टक्के कपात लागते, केंद्र शासनाचा निधी वेळेवर मिळत नाही. त्याला विलंब लागतो त्यामुळे किती निधी येईल, त्या दृष्टीने विभागाने अगोदरच नियोजन केले पाहीजे. तसेच मिळालेल्या निधीची रक्कम खर्च न करणे हे देखील संयुक्तीक नाही. शासनाचे निर्णय निर्गमित करण्यासाठी पाच महिन्याचा अवधी लागतो ही बाब तर अतिशय गंभीर आहे. निधी असून ही तो खर्च होत नाही हे समितीला योग्य वाटत नाही. निधी खर्च न होण्यास कोणामुळे विलंब झालेला आहे, याबाबत महालेखापालांनी स्पष्टीकरण केले असले तरी याबाबतीत कोण अधिकारी जबाबदार आहेत त्याची चौकशी करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

याबाबत समितीची अशी ही शिफारस आहे की, यापुढे कोणत्याही कामासाठी निधी मंजूर झाल्यानंतर खरेदी प्रक्रिया सुरु केल्यामुळे होणारा विलंब टाळण्यासाठी या बाबीचे काटेकोर नियोजन करुन त्यासंबंधातील निविदा प्रक्रिया अगोदरच करुन ठेवण्यात यावी व याबाबत विभागाने योग्य ती दक्षता घ्यावी.

गृह खात्याच्या अर्थसंकल्पातील तरतूद केलेली रक्कम खर्च होत नाही याची समितीला चिंता वाटते. अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर तो निधी विभागाकडे आला पाहिजे. त्यासाठी वेगळी मान्यता घ्यावी लागत नाही. गृह विभागाच्या कार्यपध्दतीमुळे या ठिकाणी विलंब झालेला असून पाच ते सहा महिने झाले तरी विभागाकडून केंद्राकडे प्रस्तावच गेला नाही. याबाबत विभागाने समितीला खुलासा पाठवावा. त्यामध्ये विशिष्ट कारणे सांगून त्या गोष्टीला जे कोणी जबाबदार असतील, त्यांची नावे सुध्दा समितीला देण्यात यावीत अशी समितीची शिफारस आहे.

पोलीस अधिकारी, कर्मचारी यांची रिक्त पदे, अल्पोपहार भत्ता व साप्ताहिक सुट्टयांचा मोबदला यावरील कमी खर्च तसेच त्यासंबंधातील देयके कोषागारात पारित न झाल्याने बचत झाली अशीही माहिती समितीला देण्यात आली. पोलीस कर्मचाऱ्यांना रुपये ३५ प्रति दिन एवढा अल्पोपहार भत्ता दिला जातो. दुर्गम भागात काम करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना दिली जाणारी ही रक्कम फारच तुटपुंजी आहे **पूर्वी कर्मचाऱ्यांना केवळ १५ रुपये आहार भत्ता दिला जात होता, तो आता ३५ रुपये करण्यात आलेला आहे. मात्र हल्लीच्या महागाईचा विचार करता तो देखील अपुरा आहे. तरी या अल्पोपहार भत्यात भाववाढीचा विचार करुन, योग्य ती सुधारणा करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

पोलीस विभागाच्या आधुनिकीकरणाच्या कामासाठी खर्च करावयाच्या निधीत केंद्र व राज्य शासनाचा ५०-५० टक्के हिस्सा असतो. केंद्र सरकारकडून या कामासाठी निधी मंजूर झाल्यानंतर व त्यासंबंधीचे आदेश निघाल्यानंतर खरेदीची प्रक्रिया सुरु होते, अशा प्रकारची माहिती समितीला साक्षीच्या वेळी देण्यात

आली. केंद्र शासनाकडे सन २००२-२००३ च्या पाठविण्यात आलेल्या पोलीस दलाच्या आधुनिकीकरण कार्यक्रमाला लवकर मंजुरी मिळण्याच्या दृष्टीने विभागाकडून पाठपुरावा करणे आवश्यक होते. राज्य शासनाने केंद्र शासनाकडे दिनांक ५ ऑगस्ट, २००२ रोजी प्रस्ताव पाठविला, परंतु तद्नंतर विभागाने त्याबाबत पाठपुरावा केला नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मंजुरी मिळण्यासाठी काहीही प्रयत्न केले नाहीत. विभागाने अर्थसंकल्प मान्य होण्यापूर्वीच या सर्व गोष्टी करावयास पाहीजे होत्या. ज्या बाबीसाठी निधीची मागणी केली, त्या बाबींची पूर्तता विभागाने अगोदरच करुन ठेवली पाहीजे असे समितीला वाटते. विभागाकडे ३०४ कोटी रुपये उपलब्ध असताना फक्त १४० कोटी रुपये खर्च केले हे बरोबर वाटत नाही. वाहनांच्या चॅसिस कुठे व केव्हा घेतल्या, किती किंमतीला घेतल्या, वाहन बांधणी कुठे करुन घेण्यात आली, त्याचप्रमाणे किती खर्च आला याची संपूर्ण माहिती समितीला सादर करण्यात आली नाही. तसेच दोन दिवसात ९ कोटी रुपये खर्च झाल्याचे दाखविले आहे. त्याची निविदा प्रक्रिया अगोदरच करुन ठेवली होती काय, तसे असेल तर सर्वच कामांच्या बाबतीत अगोदरच प्रक्रिया का करुन ठेवली जात नाही, **विभागाकडे अर्थसंकल्पीय तरतुदीची रक्कम आहे. तसेच केंद्राकडून निधी आला आहे असे असताना या सर्व प्रक्रियेसाठी विभागाला वेळ का लागतो, या संपूर्ण प्रक्रियेचे नियोजन अगोदर का केले जात नाही हेच समितीला समजत नाही. विभागाने ९ कोटीची बचत केल्याबद्दल समितीला समाधान वाटते, परंतु त्याच बरोबर १६० कोटी निधीची रक्कम वाचविण्यासाठी विभागाने प्रयत्न का केले नाहीत, याबाबत समितीला खुलासा प्राप्त झालेला नाही. इतर विभागामध्ये निधीची कमतरता आहे, निधी उपलब्ध असतानाही त्यांनी तो वापरला नाही यावर विभागाने काटेकोर नियोजन केले असते तर विहीत कालावधीत रक्कम खर्च करता आली असती हे गृह विभागाच्या सचिवांनी साक्षीच्या वेळी मान्य केले.**

फॉरेन्सिक लॅबोरॅटरीकडे किती नमुने प्रलंबीत आहेत याची माहिती समितीला मिळू शकली नाही. फॉरेन्सिक लॅबमध्ये आवश्यक ती भरती करण्यात आलेली नाही त्या ठिकाणी अनेक रिक्त असलेली पदे आहेत. वाढती गुन्हेगारी तसेच दहशतवाद्यांचा धोका विचारात घेता पोलीस दलाचे सुरुज्जीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे गृह विभागाने त्यांना प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग सुटका व्यवस्थेच्या बळकवीकरणासाठी करणे अत्यंत आवश्यक आहे. शस्त्रास्त्रे व दारुगोळा, हत्यारे यांच्या दुरुस्तीसाठी लागणाऱ्या साहित्याची कमी खरेदी झाल्याने बचत झालेली आहे. **परंतु दिलेला पैसा खर्च होत नाही ही बाब काही बरोबर नाही वाढती गुन्हेगारी तसेच दहशतवादयांचा धोका विचारात घेता पोलिस दलाचे सुसज्जीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे गृहविभागाने त्यांना प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग सुरक्षा व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी करणे अत्यंत आवश्यक आहे. अशी समितीची अपेक्षा आहे.**

महालेखापालांनी आक्षेप घेतल्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी त्याबाबत लवकरात लवकर खुलासा करणे जरुरीचे असते, मात्र तशा प्रकारची कार्यवाही केली जात नाही. असे समितीच्या निदर्शनास आले आहे. महालेखापालांनी आक्षेप घेतल्यावर त्यांची पूर्तता करणे आवश्यक आहे. **महालेखापाल आपले काम**

चोखपणे बजावत असतात. तेव्हा त्यांनी काढलेल्या आक्षेपावर जे अधिकारी वेळेत खुलासा देत नाहीत, अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. तसेच या आक्षेपावर उत्तरे देण्यासाठी हवालदारासारख्या कनिष्ठ दर्जाच्या कर्मचाऱ्यांना पाठविणे योग्य नाही याची देखील गृह विभागाने यापुढे नोंद घ्यावी अशी ही समितीची शिफारस आहे.

पोलीस आयुक्तकार्यालयातील लयातील रिक्त पदे, तसेच पदोन्नतीमुळे रिक्त झालेली पदे भरण्यात न आल्याने वेतनावरील खर्चाची बचत झाली असल्याचे समितीला दिसून आले आहे जवळ जवळ ३००-३५० पदे रिक्त असून त्यात पोलीस उपनिरीक्षकांची जास्त पदे रिक्त आहेत. या पदांची भरती प्रक्रिया चालू असल्याचे समितीला सांगण्यात आले **तरी रिक्त पदांची भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करुन ही पदे भरण्यात यावीत व त्याबाबतचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

नगरविकास विभाग

३) महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम यांच्या अधिन न राहता अधिकाऱ्यांनी केलेले चुकीचे पुनर्विनियोजन:

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र. एफ-४ "नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा" अंतर्गत प्रधानशीर्ष ३६०४ " स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे यावर" रुपये १५०.०२ इतक्या खर्चाची बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे :-

प्रधान लेखाशिर्ष ३६०४

अनुदान क्रमांक एफ-४-स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे

(रुपये लाखात)

अ. क्र.	मुख्य लेखाशिर्ष/ उपशिर्ष	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
	३६०४ स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. १०१ जमीन महसूल १०१ (०१) (०१) नगरपालिका मूळ ३५१.९२	३५१.९२	२०१.९०	-१५०.०२

ज्ञापन : -

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या प्रयोजनासाठी ३,५१.९२ लाख इतकी मूळ तरतुद होती. त्यामधून रु.१४०.७७ लाख इतकी रक्कम शासन निर्णयाद्वारे काढून घेण्यात आल्यामुळे अंतिम तरतुद रुपये २११.१५ लाख होती. अंतिम तरतुदीइतकाच खर्च झाल्यामुळे या लेखाशिर्षाखाली अधिकचा खर्च वा बचत नाही.

अनुदान क्रमांक एफ-४"स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे"

(रुपये लाखात)

अ. क्र.	मुख्य लेखाशिर्ष/ उपशिर्ष	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
	३६०४ स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. १०१ जमीन महसूल १०१ (०१) (०२) महानगरपालिका मूळ ५१६.४६ पुनर्विनियोजन -१.८९	५१४.५७	८७६.८८	+३६२.३१

ज्ञापन : -

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपलेखाशिर्षाखाली मूळ तरतूद रु.५१६.४६ लाख होती. जमिन महसूल (नगरपालिका) या गौण लेखाशिर्षाखाली रुपये १४०.७६ लाख व मुद्रांक शुल्क या लेखाशिर्षाखाली रुपये २२१.५४ लाख अशी एकूण ३६२.३० एवढी रक्कम पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध झाल्याने अंतिम तरतूद रुपये ८७८.७६ लाख इतकी झाली असून रुपये १.८८लाख इतक्या रकमेची बचत झाली आहे. सदर बचतीची रक्कम प्रत्यार्पित करण्यात आलेली आहे.

साक्ष :

यासंदर्भात समितीने दिनांक ४ मे,२०१० रोजी नगरविकास विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, तरतुदी इतकाच खर्च झाल्याची बाब लेखापरीक्षणाच्या वेळी महालेखापालांच्या निदर्शनास आणण्यात आली होती काय, याबाबत सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, मूळ तरतूद ३५१.९२ लाख इतकी दाखविण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष खर्च २०१.९० इतका दाखविण्यात आलेला आहे. वस्तुस्थिती अशी नमूद केलेली आहे की, ३५१.९२ लाख इतकी मूळ तरतूद होती व १४०.७७ लाख इतकी रक्कम शासन निर्णयान्वये काढून घेण्यात आली. महानगरपालिकांना जमीन महसूल अनुदान देण्यात आले. प्रत्यक्षात तरतूद रु. २११.१५ लाख होती. ही संपूर्ण रक्कम खर्च झालेली आहे. रु.१५०.०२ लाख बचत दाखविलेली आहे. याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, **समायोजन झालेले नव्हते तसेच ही बाब त्यावेळी महालेखापालांच्या नजरेस आणून दिली नाही. यावरुन समितीच्या असे निदर्शनास आलेले आहे की, महालेखापालांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन अनेक विभागाकडून वेळच्या वेळी केले जात नाही. जेव्हा समितीपुढे साक्ष असते, त्यावेळी दोन तीन दिवस आधी त्याबाबतीत पूर्तता करण्याचा प्रयत्न केला**

जाताना दिसतो. तेव्हा नगरविकास खात्याने वेळच्या वेळी पूर्तता करावा अशी समितीची सूचना आहे. समितीने अशी विचारणा केली की, पूर्तता करण्यासंबंधीची जबाबदारी निश्चित केलेली आहे काय, याबाबत सचिवांनी असा खुलासा केला की, संचालक, नगरपालिका प्रशासन यांच्याकडे निधी सुपूर्द केला जातो व त्यांच्या कार्यालयाकडूनच पुढील आदेश होतात. आर्थिक वर्ष संपल्या बरोबर जेवढे आदेश काढण्यात येतात त्या सर्व आदेशांच्या प्रती घेऊन महालेखापालांच्या कार्यालयात जाऊन त्याबाबतीत पूर्तता करावी अशा सूचना दिलेल्या आहेत.

नगर विकास विभागाच्या सन २००२-२००३ च्या विनियोजन लेखे अहवालावर आता मे, २०१०मध्ये चर्चा करीत आहोत. त्यावेळी लेख्यांच्या संदर्भातील त्रुटींची पूर्तता करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर असेल ते आता त्याच जागेवर असतीलच असे नाही. **महालेखापालांनी काढलेल्या त्रुटींची पूर्तता वेळीच होणे आवश्यक आहे आणि त्यासाठी प्रचलित कार्यपध्दतीमध्ये बदल करुन त्याबाबतची पूर्तता करण्याची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.**

"क" वर्ग नगरपालिकांमध्ये पुरेसा तांत्रिक कर्मचारी वर्ग नसल्यामुळे विकासकामे प्रलंबित राहतात. नगराचा विकास अपेक्षित असेल तर मुख्याधिकारी तसेच तांत्रिक अधिका-यांची पदे भरणे आवश्यक आहे. अशी समितीने विचारणा केली असता, सचिवांनी असे प्रतिपादन केले की, नगरपालिकातील अतिरिक्त कर्मचारी दुस-या नगरपालिकेमध्ये सामावून घेण्याच्या संदर्भात शासनाने ६ संवर्ग निर्माण केलेले आहेत. त्यामध्ये लेखापाल, नगर रचना या संवर्गाचा देखील समावेश आहे. नगर पालिकेतील अतिरिक्त कर्मचारी अर्हतेनुसार अन्य नगरपालिकेमध्ये समावून घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. पूर्वी अशा प्रकारे बदल्या करता येत नव्हत्या. परंतु नियमामध्ये दुरुस्ती केल्यामुळे आता राज्यस्तरावर अशा प्रकारे बदल्या करता येणे शक्य झाले आहे. या प्रक्रियेनंतर देखील ज्या काही जागा रिक्त राहतील त्या शासनस्तरावरुन भरल्या जाणार आहेत. या प्रक्रियेमुळे तांत्रिकदृष्ट्या सक्षम कर्मचारी नियुक्त करता येतील. तसेच महानगरपालिकेच्या संदर्भात सचिवांनी पुढे असे प्रतिपादन केले की,महानगरपालिकेतील मंजूर पदे भरण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिकेला आहेत. महानगरपालिकेमध्ये एखादे नवीन पद निर्माण करायचे असेल तर त्यासाठी शासनाची मान्यता घ्यावी लागते. राज्यात २३ महानगरपालिका आहेत, ज्या वेगाने महानगरपालिकांची संख्या वाढत आहे, त्या गतीने कर्मचा-यांची संख्या देखील वाढायला पाहिजे. पदे रिक्त राहिली तर लोकांना सेवा देता येत नाहीत असे समितीने विचारले असता. या संदर्भात सचिवांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, महानगरपालिकांच्या आस्थापनाचा खर्च ३५ टक्के असावा अशी अट आहे. परंतु अनेक महानगरपालिकांद्वारे या अटीची पूर्तता होत नसल्यामुळे नवीन पदे निर्माण करता येत नाहीत. नवीन पदांची मागणी करीत असताना महानगरपालिकांनी ३५ टक्के आस्थापना खर्चाच्या अटीची देखील पूर्तता केली पाहिजे.

स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाई व अभिहस्तांकित रकमा देणे यासंबंधी विभागीय सचिवांनी माहिती द्यावी अशी समितीने विचारणा केली असता त्याबाबत यावर सचिवांनी अशी माहिती दिली की, सदर उप लेखाशीर्षाखाली मूळ तरतूद रूपये ५१६.४६ लाख होती. जमिन महसूल (नगरपालिका) या गौण लेखाशीर्षाखाली रूपये १४०.७६ लाख व मुद्रांक शुल्क या लेखा शीर्षाखाली रूपये २२१.५४ लाख अशी एकूण ३६२.३० एवढी रक्कम पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध झाल्याने अंतिम तरतूद रूपये ८७८.७६ लाख इतकी झाली, त्यापैकी रूपये ८७६.८८ लाख एवढा खर्च झाला असून रूपये १.८८ लाख इतक्या रकमेची बचत झालेली असून बचतीची रक्कम प्रत्यार्पित करण्यात आलेली आहे. तथापि, पुनर्विनियोजनाची नोंद महालेखापाल यांच्या कार्यालयाकडे नसल्यामुळे बचत जास्त दिसत आहे. पुनर्विनियोजन कळवायला पाहिजे होते ते कळविलेले नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, पुनर्विनियोजन केले आहे पण त्यासंबंधाची माहिती महालेखापाल यांच्याकडे दिलेली नाही त्याबाबत सचिवांनी असे प्रतिपादन केले की, याबाबतचे आदेश आम्ही महालेखापालांकडे पाठविले आहेत. त्यावर महालेखापालांनी असे मत व्यक्त केले की, त्या आदेशात आम्ही काही अडचणी दर्शविलेल्या आहेत व आम्हाला सुधारीत आदेश हवे आहेत पुर्नविनियोजन रक्कमा हया अनुदानापेक्षा जादा असू शकत नाही. यातील अडचणी आम्हाला माहिती आहेत. आम्ही सुधारीत पत्र निर्गमित करीत आहोत.

सभागृह अनुदानाच्या मागण्या मंजूर करते. पण विभागातील अधिकारी परस्पर निर्णय घेतात हे चुकीचे आहे असे मत समितीने व्यक्त केले असता वित्त सचिवांनी असे नमूद केले की, ३-४ प्रकारचे पुनर्विनियोजन असते. मुख्य लेखाशीर्षामधील तरतूद त्याच्या उपशीर्षामध्ये वापरता येते. परंतु, दुसऱ्या मुख्यलेखाशीर्षामध्ये तो निधी वापरता येत नाही. त्याचे पुनर्विनियोजन करता येत नाही. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, **विभाग एका शीर्षामधील अुनदान दुसऱ्या शीर्षासाठी परस्पर वापरत असेल तर ते चुकीचे आहे. केवळ नियमाच्या मर्यादित राहून विभागांना असा बदल करता येऊ शकतो. म्हणून या प्रकरणात ज्या अधिकाऱ्यांनी चुकीचे पुनर्विनियोजन केलेले आहे. त्या संबंधीत अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी.** कारण एकाच अनुदानाच्या (विनियोजनाच्या मर्यादित) प्रधान, उप प्रधान, गौण किंवा दुय्यम शीर्षातून तशाच दुसऱ्या शीर्षाकडे **निधीचे पुनर्विनियोजन करण्यास महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिकेतील अटीच्या अधिन राहून परवानगी देण्याची तरतूद आहे. तसेच एका अनुदानातून (Demand) दुसऱ्या अनुदानाकडे म्हणजेच एका मागणीकडून दुसऱ्या मागणीकडे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार नाही. असे महालेखापाल व वित्त विभागाच्या टिप्पणीवरुन दिसून येत आहे. याप्रकरणी निश्चित नियमात काय तरतूद आहे व नगरविकास विभागाने केलेली कार्यवाही योग्य आहे की अयोग्य याबाबत समितीला निर्णय घेता यावा याकरिता महालेखापाल, वित्त विभाग व नगरविकास विभाग यांना समितीकडून आठ दिवसात सविस्तर टिप्पणी सादर करण्यास सांगण्यात आले होते. तरीही नगरविकास विभागाकडून सदर प्रकरणी टिपण्णी समितीस सादर केलेली नाही.**

अभिप्राय व शिफारशी :

लोकलेखा समितीपुढे आलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, सन २००२-२००३ मध्ये अनुदान क्रमांक एफ-४, प्रमुख लेखाशीर्ष "३६०४ स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे." या अंतर्गत "क" वर्ग नगरपालिकांमध्ये पुरेसे तांत्रिक कर्मचारी नसल्यामुळे शहरातील विकास कामे प्रलंबित राहतात. नगराचा विकास अपेक्षित असेल तर मुख्याधिकारी तसेच तांत्रिक अधिका-यांची पदे भरणे आवश्यक आहे, असे समितीला वाटते. एका नगरपालिकेतील अतिरिक्त कर्मचारी दुस-या नगरपालिकेमध्ये सामावून घेण्याच्या संदर्भात शासनाने ६ संवर्ग निर्माण केलेले आहेत. त्यामध्ये लेखापाल, नगर रचना या संवर्गाचा देखील समावेश आहे. नगर पालिकेतील अतिरिक्त कर्मचारी अर्हतेनुसार अन्य नगरपालिकेमध्ये समावून घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. पूर्वी अशा प्रकारे बदल्या करता येत नव्हत्या. परंतु नियमामध्ये दुरुस्ती केल्यामुळे आता राज्यस्तरावर अशा प्रकारे बदल्या करता येणे शक्य झाले आहे. या प्रक्रियेनंतर देखील ज्या काही जागा रिक्त राहतील त्या शासनस्तरावरुन भरल्या जाणार आहेत. या प्रक्रियेमुळे तांत्रिकदृष्ट्या सक्षम कर्मचारी नियुक्त करता येतील. अशी माहिती समितीला देण्यात आली.

महानगरपालिकेतील मंजूर पदे भरण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिकेला आहेत. महानगरपालिकेमध्ये एखादे नवीन पद निर्माण करायचे असेल तर त्यासाठी शासनाची मान्यता घ्यावी लागते. राज्यात २३ महानगरपालिका आहेत. ज्या वेगाने महानगरपालिकांची संख्या वाढत आहे, त्या गतीने कर्मचाऱ्यांची संख्या देखील वाढायला पाहिजे. पदे रिक्त राहिली तर लोकांना सेवा देता येत नाहीत. महानगरपालिकांचा आस्थापना खर्च ३५% असावा अशी अट आहे. परंतु अनेक महानगरपालिका या अटींची पूर्तता करीत नसल्यामुळे नवीन पदे निर्माण करता येत नाहीत. असे समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले. **यासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, शासनाने नियमात दुरुस्ती करुन राज्यस्तरावरील "क" वर्ग नगरपालिकेतील अतिरिक्त कर्मचारी वर्ग अन्य "क" वर्ग नगरपालिकेत वळविणे किंवा बदल्या करुन "क" वर्ग नगरपालिकेतील तांत्रिक व अन्य पदे भरण्यासाठी जे सहा संवर्ग निर्माण केले आहेत, त्याच धर्तीवर महानगरपालिकेच्या नियमात दुरुस्ती करुन तसेच महानगरपालिकेच्या ३५ टक्के आस्थापना खर्चाच्या अटीच्या मर्यादेत राहून महानगरपालिकेतील रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत अशी समिती शिफारस करीत आहे.**

समितीच्या असेही निदर्शनास आले की, सभागृह अनुदानाच्या मागण्या मंजूर करते. पण विभागातील अधिकारी परस्पर निर्णय घेतात हे चुकीचे आहे. याबाबत वित्त सचिवांनी असे नमूद केले की, ३-४ प्रकारचे पुनर्विनियोजन असते. मुख्य लेखाशीर्षामधील तरतूद त्याच्या उपशीर्षामध्ये वापरता येते. परंतु, दुसऱ्या मुख्यलेखाशीर्षामध्ये तो निधी वापरता येत नाही. त्याचे पुनर्विनियोजन करता येत नाही. तसेच **विभाग एका शीर्षामधील अनुदान दुसऱ्या शीर्षासाठी परस्पर वापरत असेल तर ते चुकीचे आहे. केवळ नियमाच्या**

मर्यादेत राहून विभागांना असा बदल करता येऊ शकतो. म्हणून या प्रकरणात ज्या अधिकाऱ्यांनी चुकीचे पुनर्विनियोजन केलेले आहे, त्या संबंधीत अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी. अशी समितीची शिफारस आहे. याबाबत महालेखापाल व वित्त विभाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, एकाच अनुदानाच्या (विनियोजनाच्या मर्यादित) प्रधान, उप प्रधान, गौण किंवा दुय्यम शीर्षातून तशाच दुसऱ्या शीर्षाकडे निधीचे पुनर्विनियोजन करण्यास महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिकेतील अटींच्या अधिन राहून परवानगी देण्याची तरतूद आहे. तसेच एका अनुदानातून (Demand) दुसऱ्या अनुदानाकडे म्हणजेच एका मागणीकडून दुसऱ्या मागणीकडे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार नाहीत.

याप्रकरणी साक्षीच्यावेळी महालेखापाल, वित्त विभाग व नगरविकास विभाग यांना सविस्तर टिपण्णी समितीला आठ दिवसात सादर करण्याबाबत सांगण्यात आले होते. तथापि, **नगरविकास विभागाकडून सन २००२-०३ यावर्षाच्या पुनर्विनियोजनाच्या संदर्भात कोणतीही टिप्पणी समितीला सादर करण्यात आलेली नाही ही खेदाची बाब असून, त्याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. नगरविकास विभागाच्या ज्या अधिकाऱ्यांनी सन २००२-०३ या वर्षात चुकीचे पुनर्विनियोजन केलेले आहे, त्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी व त्याबाबतची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

सार्वजनिक आरोग्य विभाग

४) राज्यातील अनेक रुग्ण जीवनदायी योजनेच्या लाभापासून वंचीत राहत असल्याबाबत :

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००२-२००३ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र.आर-०१ "वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य" अंतर्गत प्रधानाशीर्ष **"२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य"** याखाली खर्चाची बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

मुख्य लेखाशिर्ष -२२१०
अनुदान क्रमांक आर-१-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

अ. क्र.	मुख्य लेखाशिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	जादा (+) बचत (-)
१	२	३	४	५
१)	२२१० वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य नागरी आरोग्य सेवा व विषम चिकित्सा ११० रुग्णालये व दवाखाने राज्य योजनांतर्गत योजना ११०-७ (०६)(२४) जीवनदायी योजना आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लोकांना वैद्यकीय मदत (२२१० १३११) मूळ ६००.०० पुनर्विनोयोजित (-) १५०.०० 	७५०.००	७९२.५४	(+) ४२.५४

ज्ञापन :

या योजनेत, आर्थिकदृष्टया कमी उत्पन्न असलेल्या लोकांन मधील हृदय शस्त्रक्रिया, रक्त वाहिन्या शस्त्रक्रियेसाठीच्या रुग्णांवर उपचार केला जातो.

या योजनेअंतर्गत रु. ७५०.०० लक्ष इतके अंतिम सुधारीत अनुदान प्राप्त झाले होते.बाबनिहाय खर्च व कमी/जास्त खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे:-

बाब	अंतिम सु.अनुदान	खर्च	कमी/जास्त
संकीर्ण	६५०	७०५.२८	+ ५५.२८
साधन सामुग्री	१००	८७.२६	- १२.७४
एकूण	७५०	७९२.५४	+ ४२.५४

या वर्षात अतितात्काळ शस्त्रक्रियेच्या उपचारासाठी जास्त प्रमाणात रुग्ण दाखल झाल्याने व जास्त अर्ज प्राप्त झाल्याने तातडीने हृदय शस्त्रक्रिया करणे क्रमप्राप्त झाले. त्यामुळे प्रत्यक्ष झालेल्या खर्चात वाढ झाली आहे. तरी अतिरीक्त खर्च नियमित व्हावा. यंत्रसामुग्री खरेदी निविदा प्रक्रिया वेळेत न झाल्यामुळे त्या खर्चात बचत झाली आहे. स्पष्टीकरणास मा.महालेखापाल यांनी त्यांचे पत्र क्र. AAW/UOR/AppA/CS/2002-03/R-1/ PHD/ 2210/286 dated 13-11-07 अन्वये मान्यता दिली आहे.

अनुदान क्रमांक आर-१-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

. क्र. १	मुख्य लेखाशिर्ष २	एकुण अनुदान ३	प्रत्यक्ष खर्च ४	जादा (+) बचत (-) ५
३५	०६ सार्वजनिक आरोग्य १०१ रोग प्रतिबंध व नियंत्रण १०१(१)(१०) कुष्ठरोग नियंत्रण पथके व रुग्णालये (२२१० ०६६५) मुळ ३३०१.५५ पुर्नविनियोजित (+) ४३७.६५	३७३९.२०	३४३९.९२	(-) २९९.२८

ज्ञापन :

१) कुष्ठरोग नियंत्रणासाठी पथके व रुग्णालये (२२१० ०६६५) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाचे मुख्यालयाचे स्तरावर आस्थापना अनुदानासाठी व इतर बाबीसाठी या योजनेतून अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. सदर अनुदान या कार्यालयाच्या सर्व अधिनस्त कार्यालयांना वितरीत केले जाते.

उदिष्टे - राज्यस्तरावर कुष्ठरोग कार्यक्रमाचे प्रशासनिक नियंत्रण, प्रशिक्षण देणे, राज्यस्तरांवर औषध खरेदी व वितरण.

या लेखाशीर्षातंर्गत रु.३७३९.२० लक्ष अंतिम सुधारित अनुदान मंजूर असून प्रत्यक्ष खर्च रु.३४३९.९२ लक्ष एवढा आहे. बचत रु.२९९.२८ लक्ष इतकी आहे.

कुष्ठरोगतंत्रज्ञ व अवैद्यकीय सहाय्यकांची ११८ पदे रिक्त असल्याने कमी खर्च झालेला आहे कुष्ठरोग शोध व उपचार मोहिमेअंतर्गत कर्मचाऱ्यांचे दौऱ्यांत वाढ झाल्यामुळे प्रवास खर्च अधिक झालेला आहे. सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) सातारा, भंडारा, रायगड, नागपूर, रत्नागिरी, उस्मानाबाद, चंद्रपूर, वाशिम या कार्यालयांची देयके कोषागाराने स्विकारली नाहीत. त्यामुळे पेट्रोल, तेल, वंगण या बाबीखाली रु.३.४० लाखाची बचत झालेली आहे. इतर खर्च या बाबीखाली कोषागाराने देयके न स्विकारल्याने बचत झाली आहे. जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील तात्पुरता आंतररुग्ण कक्ष इतर कुष्ठ वसाहती यांचेकडे आहार या बाबीखाली जास्त खर्च झालेला आहे.

स्पष्टीकरणास मा.महालेखापाल यांनी त्यांचे पत्र क्र.AAW/UOR/APPA/CS/2002-03/R-1/PHD/ 2210/ 286 dated 13.11.07 अन्वये मान्यता दिली आहे.

साक्ष :

याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांची दिनांक १२ मे,२०१० रोजी साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २००२-२००३ या वर्षात ह्रदय शस्त्रक्रियेसाठी किती अर्ज आले होते व त्यापैकी तातडीने शस्त्रक्रिया केलेली प्रकरणे किती आहेत, त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी जीवनदायी योजनेच्या शस्त्रक्रिया झाल्या असून त्यांना निधी मिळालेला नाही त्यामुळे ते नवीन शस्त्रक्रिया करीत नाहीत. तसेच रुग्णालय इमारतीचे बांधकाम न झाल्यामुळे निधी खर्च होऊ शकलेला नाही. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन पाठपुरावा करण्यात आला आहे काय, यावर विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांसोबत बैठक घेण्यात आली असून कामे लवकर करण्याच्या सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्य हे प्रगतिशील राज्य आहे, मात्र आपल्या शेजारी असणाऱ्या आंध्र व कर्नाटक राज्याने जीवनदायी योजनेसाठी खर्च केलेली रक्कम पाहिल्यास आपल्या लक्षात येईल की, आपले राज्य खूपच मागे आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये जीवनदायी योजना सुरु होऊन आता १२ वर्षे झाली आहेत. तसेच कर्नाटक व आंध्र प्रदेश या राज्यामध्ये देखील ही योजना सुरु होऊन साधरणपणे १२ वर्षे झालेली आहेत. या राज्यांमधील जीवनदायी योजना राबवण्याची प्रगती पाहता आपल्या राज्यात सुरु असलेल्या जीवनदायी योजनेमध्ये बरीच सुधारणा हेाण्याची आवश्यकता आहे.

याबाबत सचिवांनी पुढे अशी माहिती दिली की, आंध्र प्रदेश राज्याने ही योजना राबविली आहे. त्याच धर्तीवर आपल्या राज्यात देखील जीवनदायी योजना राबविली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात ६ जिल्हयांमध्ये ही योजना राबविली जाणार आहे. राजीव गांधी जीवनदायी योजना या वर्षापासून सुरु केली जाणार आहे. पूर्वीच्या योजनेमध्ये बऱ्याच त्रुटी होत्या, त्यामध्ये आता सुधारणा केली जाणार आहे.या योजनेकरिता शासनाने २५० कोटी रुपये निश्चित केले आहेत ही योजना योग्य पद्धतीने राबविण्याकरिता एक ट्रस्ट स्थापन केला जाणार असून एका विमा संस्थेबरोबर करार केला जाणार आहे. विमा संस्थेकडून पैसे भरले जातील, त्यामध्ये निपक्ष करार केलेले आहे. रुग्णालय, संस्था व ट्रस्ट यांमध्ये हा करार केला आहे. रुग्णालयात किती खाटा असाव्यात, डॉक्टर्स किती असावेत, यंत्रसामुग्री कशा प्रकारची असावी, या संदर्भात काही गोष्टी ठरवून दिलेल्या आहेत. ट्रस्ट व इन्श्यूरन्स एजन्सीकडून रुग्णालयाशी करार केले जाणार आहेत. या योजनेतील लाभधारकांना ट्रस्ट कडून एक कार्ड देण्यात येईल. रुग्णालयामध्ये इन्शूरन्स एजन्सीचा एक व्यक्ती असणार आहे. त्याला आरोग्य मित्र असे म्हटले जाईल. त्याच्याकडे कार्ड घेऊन गेल्यावर तो रुग्णांना आवश्यक असणारी माहिती देईल. म्हणजेच नांदेड, औरंगाबाद येथे ४ रुग्णालये असतील, तर त्यापैकी कोणत्या रुग्णालयात ह्दयरोग, किडनीच्या रुग्णांवर उपचार करण्याकरिता खास यंत्रसामुग्री आहे, स्वतंत्र यंत्रणा आहे, किंवा कोणत्या रुग्णालयामध्ये जागा उपलब्ध आहेत, या सर्व बाबींची माहिती तेथे दिली जाईल. अशा प्रकारे रुग्णांना ना देय उपचार दिली जाणार आहेत.

आंध्र प्रदेश मधील जीवनदायी योजना व महाराष्ट्र शासनाची जीवनदायी योजना यामध्ये काय फरक आहे, अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, आंध्र प्रदेशमध्ये शहरी भागात ६५ हजार रुपये व ग्रामीण भागात ६० हजार रुपये अशी उत्पन्नाची मर्यादा ठेवली आहे. महाराष्ट्र राज्यात ही उत्पन्नाची मर्यादा २० हजार रुपये इतकी आहे. ही उत्पन्नाची मर्यादा वाढवली पाहिजे. सर्वसाधारण व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न देखील ३६ हजार रुपये असते, आपल्या राज्यात २० हजार रुपये उत्पन्नाची मर्यादा असल्यामुळे, अनेक रुग्णांना या योजेनचा लाभ मिळत नाही. त्यामुळे शासनाने ही मर्यादा वाढविण्याकरिता आवश्यक ती उपाययोजना करावी.

कुष्ठरोगतंत्रज्ञ व अवैद्यकीय सहाय्यकांची ११८ पदे केव्हापासून रिक्त आहेत, तसेच या रिक्त पदांबाबतची सद्य:स्थिती काय आहे, अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी अशी माहिती दिली की, या योजनेतील काही पदे कमी करण्यासाठी केंद्र शासनाने आदेश दिलेले आहेत. ही केंद्र शासनाची योजना आहे. त्याप्रमाणे त्यांनी पदे कमी करण्यासाठी आदेश दिले आहेत. मागील ४ ते ५ वर्षापूर्वीच्या आकडेवारीवरुन असे दिसून येत होते की, कुष्ठरोगाचा प्रभाव कमी झालेला आहे. या रोगाचे रुग्ण कमी झाल्यामुळे, पदे कमी करण्याचा निर्णय केंद्रशासनाने घेतला आहे. मात्र कुष्ठरोग्यांच्या रुग्णांची संख्या ज्या प्रमाणात कमी होणे आवश्यक होते, त्या प्रमाणात कमी झालेली नाही. यावर समितीने असे सुचविले की, केंद्र शासन आपणास मदत करीत नसेल तर राज्य शासनाने या करिता काम केले पाहिजे. शासनाने या कामाकरिता लोकांची भरती करावी तसेच अशासकिय संस्थांना या कामाकरिता विनंती करावी, असे समितीला वाटते. कुष्ठरोगाकरिता शासन सध्या किती निधी देत आहे, राज्यात सध्या किती कुष्ठरोगाचे रुग्ण आढळून आलेले आहेत, कुष्ठरोग्यांकरिता राज्यात बरेच आश्रम आहेत. पुणे, अमरावती, चंद्रपूर येथे आश्रम आहेत. डॉ.बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांकरिता अतिशय चांगले काम केले आहे. या कामाकरिता राज्य शासनाने अनुदान दिले पाहिजे. कुष्ठरोगाचे निर्मूलन करणे ही राज्य शासनाची जबाबदारी आहे. जर केंद्र शासन कुष्ठरोगाचे निर्मूलन कराण्याचा कार्यक्रम पुढे चालू ठेवत नसेल तर त्या कार्यक्रमाकरीता निधी देवून तो पुढे चालू ठेवणे ही राज्य शासनाची सुध्दा जबाबदारी आहे या कार्यक्रमावर राज्य शासनाने लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे असे समितीने मत व्यक्त केले.

अभिप्राय व शिफारशी :

समितीपुढे आलेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, आंध्रप्रदेश मधील जीवनदायी योजना व महाराष्ट्र शासनाची जीवनदायी योजना यामध्ये असलेल्या फरकाबाबत समितीने माहिती घेतली असता आंध्रप्रदेशमध्ये शहरी भागात ६५ हजार रुपये व ग्रामीण भागात ६० हजार रुपये अशी उत्पन्नाची मर्यादा ठरविण्यात आलेली आहे. **महाराष्ट्र राज्यात ही उत्पन्नाची मर्यादा फक्त वीस हजार रुपये इतकी आहे. सद्य:स्थितीचा विचार करता ही उत्पन्नाची मर्यादा वाढवली पाहिजे असे समितीचे मत आहे. सर्वसाधारण व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न देखील ३६ हजार रुपये असते. त्यामुळे आपल्या राज्यात अनेक लाभार्थी**

रुग्ण या योजनेअंतर्गत लाभ मिळण्यापासून वंचित राहत आहेत. सबब, महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणारी जीवनदायी योजना व त्या सारख्या अन्य योजनांचा लाभ जास्तीत जास्त सर्वसामान्य गरीब रुग्णांना मिळावा याकरिता राज्य शासनाने निश्चित केलेली दारिद्रय रेषेखाली असलेल्या व्यक्तींची वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये २०,०००/- यामध्ये वाढ करुन, ती आंध्रप्रदेश राज्याच्या उत्पन्न मर्यादेएवढी करण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

कुष्ठरोग नियंत्रणासाठीच्या योजनेतील पथके व रुग्णालये यामधील पदे कमी करण्यासाठी केंद्र शासनाने आदेश दिले असल्याचे समितीला सांगण्यात आले. मागील ४ ते ५ वर्षापूर्वीच्या आकडेवारीवरुन असे दिसून येते की, कुष्ठरोगाचा प्रभाव कमी झालेला आहे. या रोगाचे रुग्ण कमी झाल्यामुळे, पदे कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला मात्र कुष्ठरोग्यांच्या रुग्णांची संख्या ज्या प्रमाणात कमी होणे आवश्यक होते, त्या प्रमाणात ती कमी झालेली नाही असे ही समितीच्या निदर्शनास आले आहे. कुष्ठरोगनियंत्रणाकरिता शासन सध्या किती निधी देते, या राज्यात किती कुष्ठरोगाचे रुग्ण आढळून आलेले आहेत, याचे सर्वेक्षण करण्यात यावे. कुष्ठरोग निवारण्याच्या कामात राज्यात काही संस्था चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. त्यामुळे या कामाकरिता त्यांना राज्य शासनाने अनुदान दिले पाहिजे. **राज्यात कुष्ठरोगाचा प्रभाव ज्या प्रमाणात कमी होणे आवश्यक होते, त्या प्रमाणात तो झालेला नसल्यामुळे या योजनेसाठी केंद्र शासनाकडून मदत मिळत नसली तरी राज्य शासनाने या योजनेकरीता पुरेसा कर्मचारी वर्ग नियुक्त करावा तसेच कुष्ठरोग निवारणाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता पुरेसा निधी उपलब्ध करुन द्यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

सार्वजनिक बांधकाम विभाग

५) अनुदानापेक्षा अधिक खर्च :-

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र.एच-३ गृहनिर्माण अंतर्गत प्रधानशीर्ष २२१६, गृहनिर्माण याखाली रूपये १७,८५.३६ लक्ष इतका खर्च अधिक झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

मुख्य लेखाशीर्ष २२१६
अनुदान एच-३-गृहनिर्माण

१)अनुदान क्रमांक-एच-३ (अधिक)
लेखाशीर्ष २२१६ गृहनिर्माण

दत्तमत

(रूपये)

	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक + बचत -
मूळ १,१४,६८,२०,०००	१,१४,६८,२०,०००	१,३२,५३,५५,७५२	१७,८५,३५,७५२
पूरक			

वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २००३) २,३५,५९,०००

उपरोक्त परिच्छेदाबाबत महालेखापालांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत

१. रूपये १७,८५.३६ लक्ष इतका अधिक खर्च नियमात बसविणे आवश्यक आहे.

२. रुपये १७,८५.३६ लाखाचा अधिक खर्च लक्षात घेता वर्षअखेरपर्यंत रूपये २३५.५९ लाखाचा परत करण्यात आलेला निधी निष्फळ ठरल्याचे सिध्द झाले आहे.

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी दर्शविलेला खर्च हा २२१६-गृहनिर्माण या प्रमुख लेखाशीर्षाखालील अनेक उपशीर्षाखाली झालेला एकत्रित असा अधिक खर्च असून तो एकूण अनुदानाच्या तुलनेत अल्प आहे. याबाबतचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

महालेखापालांनी आपल्या अभिप्रायात जे भाष्य केले आहे, त्यास अनुसरून असे नमूद करण्यात येते की, आठमाही सुधारित अंदाज अंतिम करताना वित्त विभागाने या लेखाशिर्षाखाली रू.११,२३२.५९ लक्ष (रू.११४६८.२० लक्ष - रू. २३५.५९ लक्ष) एवढे अनुदान सिमीत केले असल्यानें रू. २३५.५९ लक्ष एवढा निधी प्रत्यार्पित करणे क्रमप्राप्त ठरले आहे.

२) अनुदान क्र. एच-३ (अधिक)

प्रमुख लेखाशीर्ष - २२१६, गृहनिर्माण
८०, सर्वसाधारण
०५२, यंत्रसामुग्री व साधन सामुग्री
(००)(०१)२०५९ - मधून यथाप्रमाण
लेख्यांतर्गत हस्तांतरण
४९ लेख्यांतर्गत हस्तांतरण

(रूपये लाखांत)

		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+) बचत (-)
मूळ	३२९.३३	१८६.५६	६८७.८४	+५०१.२८
पुरक	-१४२.७७			

वरील उपशीर्षाखालील रूपये ५०१.२८ लाखांचा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता मार्च, २००३ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे काढण्यात आलेला रूपये १४२.७७ लाखांचा निधी अनावश्यक असल्याचे सिध्द झाले, त्याबाबतची कारणे प्रतिक्षीत आहेत. (ऑगस्ट, २००३).

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

लेखापरीक्षा विभागाने दर्शविलेली स्थिती मान्य करण्यात येत आहे.

मुंबई अर्थसंकल्प नियम पुस्तिकेतील परिच्छेद ७२ मध्ये २०५९ - सार्वजनिक बांधकामे या लेखाशीर्षाखाली आस्थापना तसेच हत्यारे व सयंत्रे खर्च आंतरखाते बदलाद्वारे इतर भांडवली व महसुली शिर्षाकडे वर्ग करण्याची पध्दती विहीत केली आहे की, जेणेकरुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या विविध कामावरील प्रयोजनासाठीच्या खर्चाचे योग्य निर्धारण करता येते. यानुसार परिगणना करण्यासाठी खालील सूत्र अवलंबिण्यात येते.

अ) २०५९, सार्वजनिक बांधकामे (एच-९) यंत्रसामुग्री व साधनसामुग्री या उपलेखाशीर्षाखालील एकूण तरतूद.

वजा

१. स्थानिक क्षेत्रासाठी वजा केलेली तरतूद

२. राज्य रस्ते निधीकडे खर्ची टाकण्यात आलेला हत्यारे व सयंत्रे खर्च

३. अन्य शासकीय / स्थानिक संस्था/ खाजगी संस्थांच्या कामाबद्दल व

४. ००५९ सार्वजनिक बांधकामे या शीर्षाखाली येणाऱ्या जमा रक्कमा

ब) हस्तांतर करावयाचा निव्वळ हत्यारे व सयंत्रे खर्च - (वजा)

क) भांडवली शीर्षावर टक्केवारी खर्च (हत्यारे व सयंत्रे खर्च)

ड) एकूण ("ब" व "क") महसुली शिर्षाखालील कामावर आकारावयाचा व करावयाचा एकूण हत्यारे व सयंत्रे खर्च तद्नंतर उपरोक्त आकडेवारीच्या आधारे खालीलप्रमाणे गुणक परिगणीत करण्यात येतो.

वरील "ड" नुसार एकुण हत्यारे व सयंत्रे खर्च

महसुली विभागातील सर्व प्रमुख लेखाशिर्षाखालील मूळ = गुणक "क्यू"
बांधकामावरील एकूण खर्च

(प्रमुख लेखाशिर्ष २२१७ व २४०६) वगळून
यावरुन संबंधीत लेखाशिर्षाकडे हस्तांतरित करावयाची रक्कम खालीलप्रमाणे परिगणीत करण्यात येते.

१. २२१६- गृहनिर्माण या शिर्षाखाली X क्यू = २२१६ गृहनिर्माण खालील आंतरलेखा
तरतूद (स्थानिक क्षेत्र वगळून) - हस्तांतरण

वरील (१) व (२) नुसार संबधीत लेखाशीर्षाकडे (म्हणजे २२१६,-गृहनिर्माण व ३०५४, रस्ते व पूल या शिर्षाकडे) खर्च हस्तांतर केल्यानंतर २०५९ -"सार्वजनिक बांधकामे" या खालील उर्वरित खर्च त्याच शिर्षाखाली राहतो.

हे सूत्र या उपलेखा शीर्षाखालील "एकूण अनुदान" व "खर्च" ह्या दोन्ही बाबीखालील आकडेवारी निश्चित करण्यासाठी सामायिक आहे. पहिली बाब पुर्वानुमानावर निश्चित करण्यात येते, तर दुसरी बाब वर्ष अखेरीस प्रत्यक्ष आकडेवारीवर निश्चित करण्यात येते. त्यामुळे या दोन्ही टप्प्यांवरील आकडेवारी, तसेच ज्या गुणकाच्या आधारे संबंधीत शीर्षाकडे हस्तांतर करावयाची रक्कम ठरविली जाते, तो गुणकही नेहमीच सारखा नसतो आणि हया गुणकामध्ये जराशी जरी तफावत झाली तरी ती परिणामतः मोठी बचत किंवा अधिक्य होण्यास प्रकरणपरत्वे कारणीभूत ठरते व हेच कारण प्रस्तुत प्रकरणी झालेल्या अधिक्याबाबत देण्यात येत आहे.तसेच फरकाबाबतची कारणे सर्वसाधारणतः विनियोजन लेख्यामधील संबंधीत शीर्षाखालील अधिक्य बाबीवर दिलेल्या स्पष्टीकरणानुसार आहेत.

प्रसंगतः हया लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात आलेला खर्च काल्पनिक आहे. आस्थापना, हत्यारे व सयंत्रे यावरील खर्च प्रथमतः "२०५९ - सार्वजनिक बांधकामे" या शिर्षाखाली नोंदविला जातो तद्नंतर तो संबंधीत उपलेखाशीर्षाकडे आंतरलेखा हस्तांतरण केला जातो. जेणेकरुन महसुली शीर्षाखालील कामावर झालेला प्रत्यक्ष खर्च दिसून यावा. उपरोक्त परिस्थतीत अधिक खर्च नियमीत करण्यात यावा असे नमूद केले आहे.

३) अनुदान क्र. एच-३ (अधिक)
प्रमुख लेखाशीर्ष - २२१६, गृहनिर्माण
८० - सर्वसाधारण
००१, संचालन व प्रशासन
(२०५९ - कडून यथाप्रमाणे आंतरलेखा हस्तांतरण)

(रूपये लाखांत)

		एकुण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+) बचत (-)
मूळ	२४७८.१७			
पूरक		३३४८.६५	४७१०.८४	+१३६२.१९
पुनर्विनियोजन	८७०.४८			

रुपये १३६२.१९ लाखांचा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, मार्च २००३ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे वाढवण्यात आलेला रुपये ८७०.४८ लाखांचा निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले. अधिक खर्चाची कारणे प्रतिक्षीत आहेत, (ऑगस्ट, २००३)

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या अभिप्रायात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

लेखापरिक्षा विभागाने दर्शविलेली स्थिती मान्य करण्यात येत आहे.

मुंबई अर्थसंकल्प नियम पुस्तिकेतील परिच्छेद - ७२ मध्ये २०५९ - सार्वजनिक बांधकाम या लेखाशीर्षाखाली आस्थापना, तसेच हत्यारे व सयंत्रे खर्च आतंरखाते बदलाद्वारे इतर भांडवली व महसुली शीर्षाकडे वर्ग करण्याची पध्दती विहीत केली आहे, जेणेकरुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या विविध कामावरील आस्थापना व सयंत्रांवरील खर्चाचे वरील प्रमाणात योग्य निर्धारण करता यावे. यानुसार परिगणना करण्यासाठी खालील सूत्र अवलंबविण्यात येते.

अ) २०५९ - सार्वजनिक बांधकामे (एक) संचालन व प्रशासन व मुख्य लेखाशीर्षाखालील एकूण तरतूद वजा

१. स्थानिक क्षेत्रासाठी केलेली तरतूद

२. रूपातंरित आस्थापनेसाठी केलेली तरतूद

३. राज्य रस्ते निधीकडे खर्ची टाकण्यात आलेला आस्थापना खर्च

४. अन्य शासकीय/स्थानिक संस्था/खाजगी संस्थांसाठी केलेल्या कामाबद्दल ०५९ - सार्वजनिक बांधकाम शिर्षाखाली येणाऱ्या जमा रकमा

ब. हस्तातंरण करावयाचा निव्वळ आस्थापना खर्च

क. भांडवली शिर्षावरील टक्केवारी खर्च (आस्थापना खर्च)

ड. महसुली शिर्षाखाली कामावर आकारावयाचा व हस्तांतर करावयाचा निव्वळ आस्थापना खर्च (ब-क)

तद्नंतर उपरोक्त आकडेवारीच्या आधारे खालीलप्रमाणे परिगणीत करण्यात येतोः-

वरील "ड" नुसार एकूण आस्थापना खर्च

महसुली विभागातील सर्व प्रमुख लेखाशीर्षाखालील = गुणक "क्यू"

मूळ बांधकामावरील एकूण खर्च

(प्रमुख लेखाशीर्ष) २२१७ व २२५२ वगळून)

१. २२१६- गृहनिर्माण या शीर्षाखाली X क्यू = २२१६ गृहनिर्माण खालील आंतरलेखा हस्तांतरण तरतूद (स्थानिक क्षेत्र वेगळून)
२. ३०५४- मार्ग व पूल या शीर्षाखाली X क्यू = ३०५४ रस्ते व पूल या खालील आंतर लेखा तरतूद (स्थानिक क्षेत्र वगळून) हस्तांतरण

वरील (१) व (२) नुसार संबधीत लेखाशीर्षाकडे (म्हणजे २२१६-गृहनिर्माण व ३०५४ रस्ते व पूल या शीर्षाकडे) खर्च हस्तांतर केल्यानंतर २०५९ - सार्वजनिक बांधकामे या खालील उर्वरित खर्च त्याच शीर्षाखाली राहतो.

हे सूत्र या लेखाशीर्षाखालील "एकूण अनुदान" व "खर्च" ह्या दोन्ही बाबीखालील आकडेवारी निश्चित करण्यासाठी सामायिक आहे. पहिली बाब पुर्वानुमानावर निश्चित करण्यात येते, तर दुसरी बाब वर्ष अखेरीस प्रत्यक्ष आकडेवारीवर निश्चित करण्यात येते. त्यामुळे या दोन्ही टप्प्यांवरील आकडेवारी तसेच ज्या गुणकाच्या आधारे संबंधीत शीर्षाकडे हस्तांतर करावयाची रक्कम ठरविली जाते, तो गुणकही नेहमीच सारखा नसतो आणि हया गुणकामध्ये जराशी जरी तफावत आल्यास ती परिणामतः बचत किंवा अधिक्य/होण्यास प्रकरणपरत्वे कारणीभूत ठरते व हेच कारण प्रस्तुत प्रकरणी झालेल्या बचती बाबत देण्यात येत आहे. तसेच फरकाबाबतची कारणे सर्वसाधारणतः विनियोजन लेख्यामधील संबंधीत शीर्षाखालील अधिक्य/बचत बाबीवर दिलेल्या स्पष्टीकरणानुसार आहेत.

प्रसंगतः हया लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात आलेला खर्च काल्पनिक आहे. आस्थापना आणि हत्यारे व सयंत्रे यावरील खर्च प्रथमतः "२०५९ - सार्वजनिक बांधकामे" या शिर्षाखाली नोंदविला जातो व तद्नंतर तो संबंधीत उपलेखाशीर्षाकडे आंतरखाते बदल केला जातो. जेणेकरुन महसूली शीर्षाखालील कामावर झालेला प्रत्यक्ष खर्च दिसून यावा. सबब उपरोक्त परिस्थिती विचारात घेता अधिक खर्च नियमीत करण्यात यावा, असे नमूद केले आहे

मुख्य लेखाशीर्ष-३०५४

अनुदान क्रमांक -एच-५ (बचत)- मार्ग व पूल -

अनुदान क्रमांक -एच-५ (बचत)

लेखाशीर्ष-३०५४, मार्ग व पूल -
०३ राज्य महामार्ग -
१०१ पूल -
(एक) राज्य क्षेत्रातील दळणवळण साधनांचे परिरक्षण दुरुस्ती करणे -

दत्तमत्त-		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च (रुपये लाखांत)	अधिक्य + बचत -
मूळ	७७,१४८.८०			
पूरक	.....	५५,२३८.३०	५५,८३६.२४	+५९७.९४
पुनर्विनियोजन	-२१,९१०.५०			

रुपये ५९७.९४ लाख इतका अधिक खर्च लक्षात घेता, वर नमूद करण्यात आलेल्या उपशीर्षाखाली मार्च, २००३ मध्ये प्रत्यार्पण/पुनर्विनियोजन याद्वारे काढण्यात आलेला रुपये २१,९१०.५० लाखांचा निधी अत्याधिक असल्याचे सिध्द झाले. अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००३)

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे.

महालेखापालांनी दर्शविलेल्या स्थितीबाबत असे निदर्शनास आणण्यात येते की, दर्शविलेला अधिक खर्च हा राज्यातील अनेक क्षेत्रीय कार्यालयांच्या विविध कामांवरील एकत्रित असा अधिक खर्च आहे.

वर विषद केलेली परिस्थिती विचारात घेता अधिक खर्च कृपया नियमीत करण्यात यावा.

महालेखापालांनी आपल्या अभिप्रायात जे भाष्य केले आहे, त्यास अनुसरुन असे नमूद करण्यात येते की, वित्त विभागाने आठमाही सुधारित अंदाजामध्ये रु.५५,२३८.३० लक्ष एवढे अंदाज अंतिम केले असल्याने रु.२१,९१०.५० लक्ष एवढा निधी परत करणे क्रमप्राप्त ठरले आहे.

५)	शीर्ष		एकूण अनुदान रुपये	प्रत्यक्ष खर्च (रुपये लाखांत)	अधिक खर्च (+) बचत (-)
	०४, जिल्हा व इतर मार्ग ०१०,किमान गरजा कार्यक्रम स्थानिक क्षेत्र (००)(०२) विशेष घटक योजना (राज्य मार्ग निधी				
	मूळ.....	१४०.४८			
	पूरक ...	१७१.७४	२,७८३.०१	१,६०८.४२	-१,१७४.५९
	पुनर्विनियोजन	२,४७०.७९			

अनुदान क्रमांक-एच-५ (बचत)

लेखाशीर्ष-३०५४, मार्ग व पूल-
०५, आंतरराज्यीय किंवा आर्थिकदृष्ट्या महत्वाचे मार्ग-
३७, प्रमुख बांधकामे
१०१, रस्त्यांची बांधकामे-

(रूपये लाखांत)

		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक्य + बचत -
मूळ	१५०.००			
पूरक		१७५.००	१७४.९३	-०.०७
पुनर्विनियोजन	२५.००			

रूपये ११७४.६६ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता बांधकामासाठी प्रत्यक्ष आवश्यक खर्च भागविण्यासाठी पुनर्विनियोजनाद्वारे वरील उपशीर्षाखाली मार्च, २००३ मध्ये रुपये २४९५.७९ लाखाच्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली व ती अत्याधिक असल्याचे सिध्द झाले. बचतीची कारणे प्रतिक्षीत आहेत. (ऑगस्ट २००३)

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे.

महालेखापालांनी आपल्या अभिप्रायात दर्शविलेल्या स्थितीबाबत नमूद करण्यात येते की,

महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार शासन जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदाने, सप्रयोजन अनुदाने व योजनांतर्गत अनुदाने मंजूर करते.

स्थानिक क्षेत्राच्या बाबतीत ज्या वेळेस ग्रामविकास व जलसंधारण विभागाने मंजूर केलेल्या अर्थोपाय अग्रिमाशी जिल्हा परिषदांना मंजूर केलेली अनुदाने समायोजित केली जातात, त्याच वेळेस शासकीय लेख्यात खर्च झाला आहे असे समजण्यात येते. सन २००२-२००३ या अहवाल वर्षात लेखाशीर्ष ३०५४-मार्ग व पूल याखाली अर्थोपाय अग्रीमाशी एकूण रु.२५७०.६९ लाख योजनांतर्गत अनुदान समायोजित केले होते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रुपयें लाखात)

अ.क्र.	ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे ज्ञापन क्र. व दिनांक	समायोजि अनुदान
१.	क्र.समायो २००२/प्र.क्र.२९७६/वित्त-२/२३, दिनांक २०.११.२००२	३.९२
२.	क्र.समायो २००३/हस्तांतर/प्र.क्र.३०१४/वित्त-२/२३, दिनांक ६.२.२००३	२८.६१
३.	क्र.समायो २००३/हस्तांतर /प्र.क्र.३०३७/वित्त-२/२३, दिनांक २६.३.२००३	६.७८

४.	क्र.एडीजे २००३/हस्तांतर/प्र.क्र.३०५४/२३, दिनांक १७.५.२००३	७३१.५२
५.	क्र.समायो २००३/हस्तांतर/प्र.क्र.३०६७/वित्त-२/२३, दिनांक १७.६.२००३	४४४.९१
६.	क्र.समायो २००३/हस्तांतर/प्र.क्र.३०९१/वित्त-२/२३, दिनांक १९.९.२००३	१३५४.९५
	एकूण	**२५७०.६९**

याबाबत असे दिसून येते की, ग्रामविकास व जलसंधारण विभागाने अर्थोपाय अग्रिमाद्वारे समायोजित केलेला खर्च रु.२५७०.६९लक्ष एवढा असून या लेखाशीर्षाखाली रु.२१२ ३२ (२७८३.०१-२५७०.६९) लक्ष एवढी बचत झाली आहे. ही बचत ग्रामविकास व जलसंधारण विभागाने कमी अनुदान समायोजि केल्याने झाली आहे.

महालेखपालांनी जे भाष्य केले, त्यास अनुसरून असे नमूद करण्यात येते की, उपरोक्त दर्शविलेली स्थिती ही बचत बाब क्र. एस-१८ व एस-१९ या लेखाशीर्षाची एकत्रित स्थिती आहे.

तपशील	बचत बाब क्र. एस-१८ विशेष घटक योजना (स्थानिक क्षेत्र)	बचत बाब क्र. एस-१९ आंतर राज्यीय महत्वाचे मार्ग	एकूण
मूळ अनुदान	१४०.४८	१५०.००	२९०.४८
पूरक अनुदान	१७१.७४	०.००	१७१.७४
पुनर्विनियोजन	२४७०.७९	२५.००	२४९५.७९
एकूण अनुदान	२७८३.०१	१७५.००	२९५८.०१
एकूण खर्च	१६०८.४२	१७४.९३	१७८३.३५
अधिक्य / बचत	-११७४.५९	-०.०७	-११७४.६६

वरील विवरणपत्रानुसार एकूण रु २४९५.७९ लक्ष या पुनर्विनियोजनाच्या रक्कमेपैकी रुपये २४७०.७९ लक्ष ही रक्कम ३०५४ मार्ग व पूल विशेष घटक योजना बचत बाब क्र. एस-१८ या **स्थानिक क्षेत्राची असून स्थानिक क्षेत्राच्या बाबतीत ज्यावेळेस ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून मंजूर केलेल्या अर्थोपाय अग्रिमाशी जिल्हा परिषदांना मंजूर केलेली अनुदाने समायोजित करण्यात येतात, तेव्हा शासकीय लेख्याखाली खर्च झाला असे समजण्यात येते.** सन २००२-०३ मध्ये विशेष घटक योजना या उपशीर्षाखाली ग्रामविकास व जलसंधारण विभागाने रु.२५७०.६९ लक्ष एवढे अनुदान समायोजित केले आहे. ते विचारात घेतले, तर वरील "विशेष घटक योजना व आंतरराज्यीय महत्वाचे मार्ग" या दोन्ही लेखाशीर्षाचा एकूण खर्च रु २७४५.६२ लक्ष (२५७०.६९ +१७४.९३) एवढा होतो. मंजूर अनुदानाच्या तुलनेत रु.२१२.३९ लक्ष (२९५८.०१-२७४५.६२) एवढी बचत होते. ग्रामविकास विभागाने कमी अनुदान समायोजित केले असल्याने ही बचत झाली आहे.

साक्ष

उपरोक्त परिच्छेदांच्या संदर्भात समितीने दिनांक १ जून, २०१० रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली, त्या वेळी विभागीय सचिवांनी असे विषद केले की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ३१ मार्च अखेरच्या खर्चाची माहिती एप्रिलच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवडयात महालेखापालांकडे पाठविण्यात येते. खर्चाचा ताळमेळ मे महिन्याच्या तिसऱ्या आठवडयात करण्यात येतो. पुरवणी खर्चमेळ जून महिन्यात होतो. सार्वजनिक बांधकाम विभागात ८६७ कार्यालयामार्फत खर्च करण्यात येतो. यापैकी काही कार्यालयांनी जरी ही माहिती वेळेत दिली नाही अथवा चुकीची दिली तरी खर्चमेळ करण्यात अडचणी येतात.

आंतरलेखा हस्तांतरण किंवा पुस्तकी समायोजनाच्या लेखाशीर्षाखाली महालेखाकार यांचेकडे जो खर्च नोंदविला जातो, तो त्या समायोजनाच्या संबंधित लेखाशीर्षाखाली केलेल्या प्रत्यक्ष खर्चावर आधारीत असतो. ही कार्यवाही आर्थिक वर्ष संपल्यानंतर करण्यात येत असल्याने वस्तुस्थितीदर्शक असते. परंतु खर्चाच्या अदांजावर आधारित पुस्तकी समायोजनेसाठी रक्कम निश्चित करण्याची प्रक्रिया त्या वर्षाच्या जानेवारी महिन्यातच पूर्ण करणे आवश्यक ठरते. कारण त्यानंतर समायोजनाचा अधिकचा खर्च पुरवणी मागणीद्वारे वाढवून घेणे शक्य होत नाही. विभागाने खर्चावर जास्तीत जास्त नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातूनही जो काही अधिकचा खर्च झाला आहे, त्यातील बहुतांश खर्च हा पुस्तकी समायोजनाचा खर्च आहे. जो प्रत्यक्षात खर्च झालेला नाही. ज्या अधिकाऱ्यांनी कमी/अधिक खर्च केल्याचे आढळून आले आहे, त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार सन २००२-०३ मध्ये एकूण १२ अधिकाऱ्यांवर कारवाई सुरु करण्यात आली, त्यापैकी एका अधिकाऱ्याची वेतनवाढ दोन वर्षासाठी रोखली असून दुसऱ्या अधिकाऱ्याची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखण्यात आली, तर दोघांविरुध्द ठपका ठेवण्यात आला आहे. तसेच एका अधिकाऱ्याला ताकीद देण्यात आली आहे व दोघांना दोषमुक्त करण्यात आले, एक अधिकारी सेवानिवृत्त झालेला आहे तर तीन प्रकरणे प्रलंबित आहेत असेही सचिवांनी साक्षीचे वेळी समितीच्या निदर्शनास आणले.

यावर समितीने अशी विचारणा केली की, रुपये १७,८५,३५,७५२ लाख इतका अधिक खर्च किती उपशीर्षाखाली एकत्रित करण्यात आला आहे व सदर उपशीर्ष कोणते? अधिक खर्च एकूण अनुदानाच्या तुलनेत अल्प असला तरी या खर्चाची रक्कम मोठी आहे. याबाबत विभागीय सचिवांनी माहिती दिली की, महालेखापालांनी दर्शविलेला खर्च हा २२१६- गृहनिर्माण या प्रमुख लेखाशीर्षाखालील अनेक उपशीर्षाखाली झालेला एकत्रित असा अधिक खर्च असून तो एकूण अनुदानाच्या तुलनेत अल्प आहे. महालेखापालांनी जे भाष्य केले आहे, त्यास अनुसरुन असे नमूद करण्यात येते की, आठमाही सुधारित अंदाज अंतिम करताना वित्त विभागाने या लेखाशीर्षाखाली रु. ११,२३२.५९ लक्ष (रु.११,४६८.२० लक्ष - रु. २३५.५९ लक्ष) एवढे अनुदान सीमीत केले असल्याने रु. २३५.५९ लक्ष एवढा निधी प्रत्यार्पित करण्यात आलेला आहे. विनियोजन

लेख्यामध्ये रुपये १४२.७७ लाखाचा निधी अनावश्यक असल्याचे सिध्द झाले आहे सार्वजनिक बांधकाम, यंत्रसामुग्री व साधन सामुग्री या लेखाशीर्षाच्या एकूण तरतुदीमधून वजाबाकी करुन गुणांक काढलेला आहे. त्याच्या आकडेवारीमुळे आणि पुस्तकी समायोजनेमुळे हे आकडे दिसत आहेत.

रुपये १३६२.१९ लाखांचा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता मार्च, २००३ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे वाढविण्यात आलेला रुपये ८७०.४८ लाखांचा निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले आहे. याबाबत स्पष्टीकरणात असे म्हटले आहे की,"लेखापरीक्षा विभागाने दर्शविलेली स्थिती मान्य करण्यात येत आहे. मुंबई अर्थसंकल्प नियम पुस्तिकेतील परिच्छेद-७२ मध्ये २०५९ - सार्वजनिक बांधकाम या लेखाशीर्षाखाली आस्थापना, तसेच हत्यारे व सयंत्रे खर्च आंतर खाते बदलाद्वारे इतर भांडवली व महसुली शीर्षाकडे वर्ग करण्याची पध्दती विहित केली आहे. जेणेकरुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या विविध कामावरील आस्थापना व सयंत्रावरील खर्चाचे वरील प्रमाणात योग्य निर्धारण करता यावे. **यानुसार परिगणना करण्यासाठी खालील सूत्र अवलंबविण्यात येते**.

अ) २०५९ - सार्वजनिक बांधकामे (एक) संचालन व प्रशासन या मुख्य लेखाशीर्षाखालील एकूण तरतूद

वजा

१) स्थानिक क्षेत्रासाठी वजा केलेली तरतूद,

२) रुपांतरित आस्थापनेसाठी केलेली तरतूद,

३) राज्य रस्ते निधीकडे खर्ची टाकण्यात आलेला आस्थापना खर्च

४) अन्य शासकीय स्थानिक संस्था खाजगी संस्थांसाठी केलेल्या कामाबद्दल ०५९- सार्वजनिक बांधकाम या शीर्षाखाली येणाऱ्या जमा रक्कमा.

ब) हस्तांतरण करावयाचा निव्वळ आस्थापना खर्च

क) भांडवली शीर्षावरील टक्केवारी खर्च

ड) महसुली शीर्षाखाली कामावर आकारावयाचा व हस्तांतर करावयाचा निव्वळ आस्थापना खर्च

तद्नंतर उपरोक्त आकडेवारीच्या आधारे गुणक परिगणित करण्यात येतो. हा गुणांक गृहीत धरुन खर्च व लेखा हस्तांतरण यांचा ताळमेळ दर्शविला असल्याने हा खर्च जास्त झाल्याचे दिसते. वस्तुस्थितीमध्ये ज्या विभागाने खर्च जास्त केलेला आहे, त्या विभागातील श्री.के.टी.पाटील, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक, श्री. जे.व्ही. लिखार, विभागीय लेखापाल, श्री.व्ही.के.पाटील, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगांव, श्री. एम.एस.लव्हारी, विभागीय लेखापाल यांच्यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम (रस्ते) यांनी कारवाई केली आहे.

रुपये १७,८५.३६ लाखाचा अधिक खर्च लक्षात घेता, वर्षअखेरपर्यंत रुपये २३५.५९ लाखाचा परत करण्यात आलेला निधी निष्फळ ठरल्याचे सिध्द झाले आहे. यासंबंधी समितीने साक्षीचे वेळी विचारणा केली

असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की, सन २००२-०३ या वर्षामध्ये कपातीची टक्केवारी (अ) वेतन, भत्ते, मजुरी, निवृत्ती वेतन, नैसर्गिक आपत्ती, व्याज इत्यादी व्यतिरिक्त सर्व उद्दिष्टांखालील "योजनेत्तर" तरतुदीसाठी ४० टक्के आणि परिरक्षण व प्रवास खर्च या उद्दिष्टाखाली ५० टक्के (ब) राज्य योजनांतर्गत तरतुदीसाठी ५० टक्के. अशा प्रकारे वित्त विभागाच्या आदेशाप्रमाणे कपात झालेली आहे. प्रथमत: निधी देण्यात आला व त्यानंतर त्यामध्ये कपात सुचविल्यामुळे हा फरक आलेला आहे.

याबाबत महालेखापालांनी असे मत व्यक्त केले की, सुधारित अंदाजपत्रक जानेवारी/फेब्रुवारीमध्ये मान्य करण्यात येते. प्रत्यक्षात एकूण किती खर्च झालेला आहे आणि पुढच्या दोन महिन्यात किती खर्च अपेक्षित आहे याचा डिसेंबर महिन्यात आढावा घेण्यात येतो. त्यावरुन सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात येते. यामध्ये असे दिसते की, सुधारित अंदाजपत्रकामध्ये निधी कमी झाल्यामुळे बचत झालेली आहे. सन २००२-०३ मध्ये राज्याची आर्थिक परिस्थिती तेवढी चांगली नव्हती. त्यामुळे जर समजा उदाहरणार्थ १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असेल तर राज्याकडे किती साधनसंपत्ती आहे, बाकीच्या विभागांची मागणी किती आहे, याचा विचार करुन विभागाचे सुधारीत अंदाज ठरविले जातात आणि बाकीचा निधी परत जमा करावा लागतो. या प्रकरणांमध्ये सुधारीत अंदाजापेक्षा जास्त खर्च झालेला आहे आणि रु.१७,८५.३६ लाखाचा अधिकचा खर्च झालेला आहे असे सांगण्यात येते, ते याचेच कारण आहे.

संबंधित अधिका-याविरुध्द कारवाई करण्यात येत असल्याचे साक्षीच्या वेळी सचिवांनी सांगितले, परंतु त्या कारवाई बाबतची सद्य:स्थिती काय आहे, अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी असे प्रतिपादन केले की, श्री.व्ही.के.पाटील, कार्यकारी अभियंता यांच्यावर ठपका ठेवण्याचे आदेश २००७ साली देण्यात आले होते. श्री.के.टी.पाटील, कार्यकारी अभियंता यांनी दिलेला खुलासा समाधानकारक आढळून आल्यामुळे त्यांना दोषमुक्त करण्यात आलेले आहे. श्री.लिखार व श्री.लव्हारी हे लेखापाल होते, त्यांच्या सेवा महालेखापाल यांच्या अधिनस्त असल्यामुळे त्यांच्या विरुध्द महालेखापालाकडून कार्यवाही अपेक्षित आहे, त्यावर समितीने अशी विचारणा केली की, विभागीय चौकशी आपल्या खात्यामार्फत करण्यात येत असते की, महालेखापाल यांच्याकडून केली जाते, याबाबत विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, सार्वजनिक बांधकाम विभाग दोषारोपपत्र दाखल करीत असते. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने विभागीय चौकशी अधिकारी नेमला जातो. त्या चौकशी अधिका-याकडून चौकशी केली जाते आणि त्या चौकशीत जे काही आढळून येते त्यानुसार दोषींना दोषमुक्त करावयाचे की, शिक्षा करावयाची या सबंधीचा प्रस्ताव चौकशी अधिकारी तयार करतात. त्यानंतर अंतिम कार्यवाही केली जाते. सार्वजनिक बांधकाम विभागातील लेखापाल हे महालेखापाल कार्यालयाकडून आलेले असल्यामुळे त्यांच्यावर महालेखापालांनी शिस्तभंगाची कारवाई करावयाची असते.

२२१६-गृहनिर्माण व ३०५४- मार्ग व पूल तसेच २०५९-सार्वजनिक बांधकामे या लेखाशीर्षाची समितीला माहिती देताना सचिवांनी असा खुलासा केला की, २२१६ -गृहनिर्माण आणि २०५९- सार्वजनिक बांधकामे ही दोन वेगवगळी लेखाशीर्षे असून शासकीय निवासी इमारतीचे परिरक्षण व दुरुस्तीच्या कामावरील खर्च या लेखाशीर्षाखाली करण्यात येतो. त्याचबरोबर ३०५४ रस्ते व पूल या लेखाशीर्षाखाली रस्त्याची देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात येतात. विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणामध्ये उल्लेख केल्यानुसार या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात आलेला खर्च काल्पनिक आहे. आस्थापना, हत्यारे व संयत्रे यावरील खर्च प्रथमत: **"२०५९ सार्वजनिक बांधकामे"** या शीर्षाखाली नोंदविला जातो व त्यानंतर तो संबंधित उपलेखाशीर्षाकडे आंतरलेखा हस्तांतरण केला जातो. जेणेकरुन महसूली शीर्षाखालील कामावर झालेला प्रत्यक्ष खर्च दिसून येत आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, ३०५४ मार्ग व पूल या लेखाशीर्षाखाली किती खर्च करण्यात आला होता, त्यातून किती कामे घेण्यात आली होती, या कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध आहे काय, याबाबत सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, ३०५४ मार्ग व पूल या लेखाशीर्षाखाली रस्त्यातील खड्डे भरण्यासाठी खर्च केला जातो. खड्डे भरण्याच्या कामाला क्षेत्रीय अधिका-यांकडून मान्यता देण्यात येते व इतर कामांना शासन स्तरावर मान्यता देण्यात येते. वित्त विभागाकडून जेवढा निधी या कामासाठी देण्यात आला तेवढा निधी विभागाने वितरीत केलेला आहे. संपूर्ण राज्यामध्ये २ लाख ३५ हजार किलोमिटर्स लाबीचे रस्ते आहेत त्यासाठी विभागाने ६ हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे, परंतु त्यापैकी फक्त १२०० ते १५०० कोटी रुपये दिले जातात. रस्त्यांचा दर्जा चांगला ठेवायचा असेल तर दर पाच वर्षानंतर रस्त्याचे नुतनीकरण केले गेले पाहिजे. परंतु या कामासाठी जो निधी मिळत आहे, त्याचा विचार करता ज्या प्रमाणात रस्त्याचे नुतनीकरण व्हावयास पाहिजे त्याप्रमाणात करणे शक्य होत नाही ही वस्तुस्थिती आहे, **रस्ता व्यवस्थापन यंत्रणा (Road Management System) नव्याने स्थापन करण्यात येत असून त्या अनुषंगाने जिल्हयात एकूण किती किलोमिटर्स लांबीचे रस्ते आहेत, त्या रस्त्याची दर किलोमिटर अंतरावर अवस्था कशी आहे हे पाहून रस्त्याचे "चांगले" "खराब" व "अतिशय खराब"असे वर्गीकरण करुन रस्त्याच्या दुरुस्तीसाठी कमी साधने उपलब्ध असल्यामुळे** ज्या ठिकाणी खरोखरच गरज असेल त्या ठिकाणी त्या पैशाचा वापर केला जाणार आहे. लोकप्रतिनिधी आणि सर्व सामान्य जनता यांच्या दृष्टीने रस्ते हा अत्यंत जिव्हाळयाचा विषय आहे. रहदारीसाठी व दळणवळणासाठी रस्ते जर चांगले असतील तर विकासाला चालना मिळते. तसेच प्रवास करणा-या प्रवाशांना प्रवास करतांना समाधान मिळते परंतु आम्ही ज्या रक्कमेची मागणी केलेली आहे, त्या रकमेच्या १/३ रक्कम किंवा १/५ एवढीच रक्कम मंजूर केली जाते, त्यामुळे ही रक्कम वाढवून मिळावी. तसेच ३०५४- या शीर्षाखाली काही जिल्ह्यांमध्ये जास्त निधी येतो, तर काही जिल्ह्यांमध्ये कमी निधी येतो, एखाद्या जिल्ह्याला १० लाख रुपये मिळतात, तर दुसऱ्या जिल्ह्याला २ कोटी रुपये मिळतात. त्यामुळे ही विषमता दूर करुन निधीचे समान

वाटप झाले पाहिजे.तसेच ३०५४- या शीर्षाखाली शासनाने अधिकतम निधी उपलब्ध करुन द्यावा असे समितीने साक्षीचे वेळी सूचित केले.

राज्यातील कोणत्या क्षेत्रीय कार्यालयाच्या कामावर अधिक खर्च झाला व त्या अधिक खर्चाची कारणे महालेखापालांना का कळविण्यात आली नाहीत, अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी असे सांगितले की, यामध्ये राज्य महामार्गाचा लेखाशीर्ष होता. यामध्ये ५५२ कोटी ३८ लाख रुपये एवढे अनुदान उपलब्ध होते व खर्च ५५८ कोटी ३६ लाख रुपये झालेला आहे. यामध्ये ५९७ लाख एवढा अधिक खर्च झालेला दिसतो. यामध्ये वित्त विभागाने आठमाही सुधारित अंदाजपत्रकामध्ये ५५२ कोटी ३८ लाख रुपये एवढा खर्च अंतिम केल्यामुळे विभागाला २१९ कोटी १० लाख रुपये एवढा निधी शासनाकडे परत करावा लागला. त्यामुळे याच्याशी संबधीत असलेल्या उस्मानाबाद, बीड, परभणी या विभागातील संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच याच संदर्भात रूपये ११७४.६६ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता बांधकामासाठी प्रत्यक्षात येणारा आवश्यक खर्च भागविण्यासाठी पुनर्विनियोजनाद्वारे वरील उपशीर्षाखाली मार्च, २००३ मध्ये रुपये ३४९५.७९ लाखाच्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली ती अत्याधिक असल्याचे सिध्द झाले आहे. तसेच बचतीची कारणे महालेखापालांना का कळविण्यात आली नाहीत, अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, यामध्ये लेखाशीर्ष ३०५४ खाली दोन वेगवेगळ्या बाबींवर हा निधी खर्च पडलेला आहे. विशेष घटक योजना, तसेच आंतर राज्यीय महत्वाचे रस्ते याबाबींवर हा खर्च झालेला आहे. २७८३ लक्ष रुपये अनुदान उपलब्ध होते. त्यापैकी १६०८ लाख रुपये खर्च झालेला आहे. यामध्ये ११७४ लाख रुपये कमी खर्च झालेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग जो निधी देतो, त्यापेक्षा ग्रामविकास विभागाने कमी निधी दिला तर पूर्ण रकमेचे समायोजन होत नाही. यामध्ये मंजूर अनुदानापेक्षा २ कोटी १२ लाख रुपये कमी खर्च झालेला दिसतो. असेही समितीला सांगण्यात आले. ग्रामविकास विभागाने कमी अनुदान समायोजित करण्याची कारणे काय आहेत या समितीने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ग्रामविकास विभागाचे उपसचिव यांनी समितीला अशी माहिती दिली की, २७८३ लाखापैकी २५७० लाख रुपये रक्कमेचे समायोजन झालेले आहे व अद्याप २ कोटी १२ लाख रुपयांचे समायोजन राहिलेले आहे. संबंधित विभागाचे जे १७ अधीक्षक अभियंते आहेत, त्यापैकी ९ अधीक्षक अभियंत्यांनी आमच्याकडे अपूर्ण माहिती पाठविली होती व काही अधीक्षक अभियंत्यांनी माहितीच पाठविली नव्हती. त्यामुळे तेवढ्या रकमेचे समायोजन राहिलेले होते. याप्रकरणी सद्यःस्थिती काय आहे, या समितीने विचारलेल्या प्रश्नावर माहिती देताना ग्रामविकास विभागाच्या उपसचिवांनी पुढे असा खुलासा केला की, सद्यःस्थिती तशीच असून अद्यापही काही अधीक्षक अभियंत्यांनी विभागाकडे माहिती पाठविलेली नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांनी माहिती दिलेली नाही. यामध्ये कमी खर्च होण्याला ग्रामविकास विभाग जबाबदार आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंते जबाबदार

आहेत याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून समितीला मिळाली पाहिजे. अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे ग्रामीण पातळीवर खर्च कमी झाला असेल तर या ठिकाणी समितीला त्याची नोंद घ्यावी लागेल. असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, जिल्हा परिषदेच्या यंत्रणेमार्फत या खर्चावर नियंत्रण ठेवण्यात येते. जिल्हापरिषदेकडून सर्व माहिती अधीक्षक अभियंता यांच्याकडे पाठविण्यात येते व त्यानंतर त्यांच्याकडून ती माहिती ग्रामविकास विभागाला कळविण्यात येते. जिल्हापरिषदेकडून दोन प्रकारचा खर्च करण्यात येतो. जिल्हापरिषदेकडून समायोजन होण्यासही विलंब लागतो. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सात वर्षाचा कालावधी लोटून गेला तरीही निधीचे समायोजन झाले नसून संबंधितांवर अद्यापपावेतो कारवाई करण्यात आली नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. त्यामुळे ज्यांनी या प्रकरणी विलंब केला त्यांच्यावर विभागाकडून कारवाई होणे आवश्यक असल्याचे समितीने सूचित केले.

अभिप्राय व शिफारशी

समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरुन अनुदान क्र एच.३, लेखाशिर्ष-२२१६ गृहनिर्माण या अंतर्गत रु.१७८५.३६ लाखाचा अधिक खर्च लक्षात घेता वर्षअखेरपर्यंत रु.२३५.५९ लाखाचा शासनाला परत करण्यात आलेला निधी निष्फळ ठरल्याचे महालेखापालांनी आपल्या भाष्यात नमूद केलेले असले तरी विभागाने दिलेली लेखी माहिती व साक्षीच्या वेळेला दिलेली माहिती यावरुन वित्तीय वर्ष २००२-०३ मध्ये आठमाही सुधारित अंदाज अंतिम करताना वित्त विभागाने या लेखाशीर्षाखाली रु.११२३२.५९ लक्ष एवढे अनुदान सिमीत केले असल्याने रु..२३५.५९ लक्ष एवढा निधी प्रत्यार्पित करण्यात आल्याचे विभागाने प्रतिपादन केले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागात खर्चाचे योग्य निर्धारण करता यावे, या दृष्टीने परिगणना करण्यासाठी खालीलप्रमाणे सूत्र अवलंबविण्यात येते.

अ) २०५९ - सार्वजनिक बांधकामे (एक) संचालन व प्रशासन या मुख्य लेखाशीर्षाखालील एकूण तरतूद वजा

१) स्थानिक क्षेत्रासाठी वजा केलेली तरतूद,

२) रुपांतरित आस्थापनेसाठी केलेली तरतूद,

३) राज्य रस्ते निधीकडे खर्ची टाकण्यात आलेला आस्थापना खर्च

४) अन्य शासकीय स्थानिक संस्था खाजगी संस्थांसाठी केलेल्या कामाबद्दल ०५९- "सार्वजनिक बांधकामे" या शीर्षाखाली येणाऱ्या जमा रक्कमा.

ब) हस्तांतरण करावयाचा निव्वळ आस्थापना खर्च

क) भांडवली शीर्षावारील टक्केवारी खर्च

ड) महसुली शीर्षाखाली कामावर आकारावयाचा व हस्तांतर करावयाचा निव्वळ आस्थापना खर्च

तद्नंतर उपरोक्त आकडेवारीच्या आधारे गुणक परिगणित करण्यात येतो. हा गुणांक गृहीत धरुन खर्च व लेखा हस्तांतरण यांचा ताळमेळ दाखविण्यात आलेला आहे. त्यामुळे हा खर्च जास्त झालेला आहे असे विभागाने नमूद केले असून ज्या विभागाने खर्च जास्त केलेला आहे, त्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द सचिव, सार्वजनिक बांधकाम (रस्ते) यांनी कारवाई केली आहे.अधिक खर्च एकूण अनुदानाच्या तुलनेत अल्प असला तरी अधिक खर्चाची रक्कम मोठी आहे.

रु.१७,८५.३६ लाखाचा अधिकचा झालेला खर्च लक्षात घेता विभागीय सचिवांनी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई केली आहे असे मोघम स्वरुपाचे उत्तर समितीपुढे साक्षीच्या वेळी देण्यात आले. परंतु त्या कारवाईच्या सद्य:स्थिती बाबत माहिती देताना असे सांगितले की, श्री.व्ही.के.पाटील, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगांव यांच्यावर ठपका ठेवण्याचे आदेश २००७ साली देण्यात आले होते. श्री.के.टी.पाटील,कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक, यांनी दिलेला खुलासा समाधानकारक आढळून आल्यामुळे त्यांना दोषमुक्त करण्यात आलेले आहे. श्री.लिखार व श्री.लव्हारी हे लेखापाल होते त्यांच्या सेवा महालेखापाल यांच्या अधिनीस्त असल्यामुळे त्यांच्या विरुध्द महालेखापालांकडून कारवाई होणे अपेक्षित असल्याचे समितीला सांगण्यात आले. **सबब समितीला दिलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, श्री.व्ही.के.पाटील, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगाव तसेच श्री.के.टी.पाटील, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांच्यावर पाच वर्ष उशीराने कारवाई केली असल्याने समिती त्याबाबत तीव्र नापंसती व्यक्त करते. तसेच श्री.लिखार व श्री लव्हारी, लेखापाल यांची सेवा सार्वजनिक बांधकाम विभागाने महालेखापाल कार्यालयाकडून उसनवारी तत्वावर घेतली असली तरी ते दोषी आढळल्याने त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यक असून त्यादृष्टीने महालेखापाल कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात आल्याचे दिसत नाही. महालेखापालांनी संबंधीत कर्मचाऱ्यांवर केलेल्या कारवाईची माहिती प्राप्त करुन घेऊन ती समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे**.

अनुदान क्र. एच-५ लेखाशीर्ष ३०५४ - "मार्ग व पूल" या अंतर्गत रस्त्यांची देखभाल व दुरुस्तींची कामे करण्यात येतात. सन २००२-०३ मध्ये महालेखापालांनी रुपये ५९७.९४ लक्ष खर्च अधिक झाल्याचे दाखविले आहे. यासंदर्भात विभागाने स्पष्टीकरणामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात आलेला खर्च काल्पनिक आहे. आस्थापना, हत्यारे व संयत्रे यावरील खर्च प्रथमत: "२०५९ सार्वजनिक बांधकामे" या शीर्षाखाली नोंदविला जातो व त्यानंतर तो संबंधित उपलेखाशीर्षाकडे आंतरलेखा हस्तांतरण केला जातो. जेणेकरुन महसूली शीर्षाखालील कामावर झालेला प्रत्यक्ष खर्च दिसून येत आहे.संपूर्ण राज्यामध्ये २ लाख ३५ हजार किलोमिटर्स लांबीचे रस्ते आहेत, त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ६ हजार कोटी रुपयांची मागणी करण्यात आली. परंतु रस्त्यांच्या कामासाठी केवळ १२०० ते १५०० कोटी रुपये एवढे अनुदाने दिले जाते. रस्त्यांचा दर्जा चांगला ठेवायचा असल्यास दर पाच वर्षानंतर त्या

रस्त्याचे नुतनीकरण केले गेले पाहिजे. परंतु या कामासाठी जो निधी मिळत आहे, त्याचा विचार करता ज्या प्रमाणात रस्त्याचे नुतनीकरण व्हावयास पाहिजे त्याप्रमाणात ते करणे शक्य होत नाही. **राज्याची आर्थिक व औद्योगिक प्रगती राज्यातील दळणवळणाच्या साधनांवर अवलंबून असते. रस्ते हे या प्रक्रियेमधील महत्वाचा घटक असल्याने विकास व औद्योगिक कामांना गती मिळण्यासाठी राज्यातील रस्त्यांची वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती होणे आवश्यक आहे. रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी ३०५४ या लेखाशीर्षाखाली मंजूर होणारा निधी फारच अपुरा असून त्याचप्रमाणे योग्य त्या प्रमाणात वाढ करण्यात यावी व त्याचे वाटप राज्यातील सर्व जिल्हयांना समान तत्वावर करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

प्रस्तुत प्रकरणी अनुदान क्र . एच-५ प्रमुख लेखाशीर्ष ३०५४ अंतर्गत "मार्ग व पूल" या लेखाशीर्षा खाली सन २००२-०३ मध्ये विशेष घटक योजना या उपशीर्षाखाली ग्रामविकास व जलसंधारण विभागाने रु.२७०.६९ लक्ष एवढे अनुदान समायोजित केले आहे. ते विचारात घेतले तर विशेष घटक योजना व आंतरराज्यीय महत्वाचे मार्ग या लेखाशीर्षाखाली एकूण खर्च रुपये २७४५.६२ लक्ष (२५७०.६९+१७४.९३) एवढा होतो. मंजूर अनुदानाच्या तुलनेत रु.२१२.३९ लक्ष (२९५८.०१-२७४५.६२) एवढी बचत होते. ही बचत ग्रामविकास विभागाने कमी अनुदान रक्कम समायोजित केली असल्याने झाली असल्याचे विभागाने ज्ञापनातील स्पष्टीकरणात नमूद केले आहे. २७८३ लाखापैकी २५७० लाख रुपयांचे समायोजन झालेले आहे आणि २ कोटी १२ लाख रुपयांचे समायोजन राहिलेले आहे अशी माहिती ग्रामविकास विभागाकडून समितीला देण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १७ अधीक्षक अभियंत्यांपैकी ९ अधीक्षक अभियंत्यांनी अपूर्ण माहिती पाठविली होती व काही अधीक्षक अभियंत्यांनी तर माहितीही पाठविलीच नव्हती. त्यामुळे तेवढ्या रक्कमेचे समायोजन राहिलेले आहे. व सद्यःस्थितीत या प्रकरणी काहीच बदल झाला नसल्याचे समितीला सांगण्यात आले याठिकाणी सात वर्षाचा कालावधी पूर्ण होवूनही समायोजन झाले नाही ही बाब खूपच गंभीर स्वरुपाची आहे. असे समितीला वाटते. **ज्या १७ अधिक्षक अभियंत्यांनी समायोजन करण्यासाठी माहिती पाठविली नाही, तसेच ज्या अधीक्षक अभियंत्यांनी माहिती अर्धवट वा अपूर्ण स्वरुपात पाठविली आहे, त्या अधिकाऱ्यांची शासनाने सत्वर चौकशी करावी व चौकशीत दोषी आढळून येणाऱ्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करुन, केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला ३ महिन्यात पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून दिल्या जाणाऱ्या अनुदानाचे समायोजन व ताळमेळ करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्याकडे सोपविण्यात आलेले आहे. हे विचारात घेता सदर अधीक्षक अभियंत्यांनी जिल्हापरिषदेचे कार्यकारी अभियंता यांचेकडून बांधकामासाठी प्राप्त झालेले अनुदान व प्रत्यक्षात झालेल्या खर्चाबाबतचा तिमाही अहवाल प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही केल्यास आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत जिल्हा परिषदांना दिलेल्या अनुदानाचा विनियोग कमी अथवा जास्त झाला आहे किंवा कसे याचे स्पष्ट चित्र दृष्टीपथात येईल असे समितीला वाटते.

त्या दृष्टीने शासनाने या संदर्भात सर्व संबंधितांना परिपत्रकाद्वारे विशिष्ट स्वरुपाची कार्यपध्दती निश्चित करुन द्यावी व त्याचे योग्य ते पालन होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

राज्यातील रस्त्याच्या नुतनीकरणाच्या संदर्भात रस्ता व्यवस्थापन यंत्रणा गठीत करण्यात येत असल्याचे समितीला साक्षीचे वेळी सांगण्यात आले. त्यानुसार प्रस्तावित रस्ता व्यवस्थापन यंत्रणा त्वरीत गठीत करावी व या यंत्रणेमार्फत राज्यातील सर्व जिल्हयातील रस्त्यांच्या कामाची सविस्तर पहाणी करुन दुरुस्त करावयाच्या रस्त्यांच्या कामाचे योग्य ते नियोजन करुन अशा रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने शासनाने वार्षिक अंदाज पत्रकात भरीव तरतूद करावी तसेच त्यासंदर्भात करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती समितीला ३ महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

जलसंपदा विभाग

६) महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात असलेली तफावत ही गैरवर्गीकरणामुळे झालेली आहे :

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००२-२००३ या वर्षाच्या विनियोजन लेख्याची छाननी करीत असताना अनुदान क्र. "आय-१" पाटबंधारे, वीज, वा इतर आर्थिक सेवा अंतर्गत प्रधानशीर्ष २७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे याखाली २०३.८१ लक्ष बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढील प्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

प्रधानशीर्ष २७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे
अनुदान क्र. आय-१

महालेखापालांचे अभिप्राय				
२				
शीर्ष	एकुण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)	
	(रूपये लाखात)			
२७०१, मोठे व मध्यम पाटबंधारे ८०, सर्वसाधारण (००१) संचालन व प्रशासन (०५) इतर शीर्षाकडून हस्तांतरित करण्यात आलेला खर्च				
मूळ	२५३.२२	३२९.३०	१२५.४९	-२०३.८१
पुनर्विनियोजन	७६.०८			
८०, सर्वसाधारण (००२) आधारसामग्री गोळा करणे (०२) यंत्रसामग्री व साधनसामग्री मूळ				
मूळ	१०६.३१	१४४.०४	८५.२५	-५८.७९
पुनर्विनियोजन	३७.७३			

८०, सर्वसाधारण
(०५२) यंत्रसामग्री व साधनसामग्री
(०३) (०१) इतर शीर्षांकडून हस्तांतरित केलेला हत्यारे व संयंत्रे यांवरील खर्च

मूळ	७४.२८	९६.६०	३३.७६	-६२.८४
पुनर्विनियोजन	२२.३२			

वरील उपशीर्षाखाली मूळ तरतुदीपेक्षा कमी खर्च झाला. रूपये ३२५.४४ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता, पुनर्विनियोजनाद्वारे रूपये १३६.१३ लाख इतक्या निधीचे करण्यात आलेले आवर्धन अनावश्यक असल्याचे सिध्द झाले. त्याबाबतची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २००३)

ज्ञापन:

रूपये २०३.८१ लक्षची बचत ही महालेखापालांनी मोठे व मध्यम पाटबंधारे वरील परिरक्षण व दुरुस्तीच्या प्रत्यक्ष खर्चाच्या आधारावर इतर आकाराचे समायोजन केल्यामुळे झाली आहे.

तथापि विभागामार्फत मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पावरील परिरक्षण व दुरुस्तीसाठी करण्यात आलेल्या एकूण तरतुदीच्या आधारावर अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये २४.२५% नुसार ईटीपीसाठी तरतूद केली जाते. याउलट महालेखापालांकडून प्रत्यक्ष खर्चाच्या आधारावर परिगणना केली जाते. परिणामी फरक दिसून येतो.

रूपये १४४.०४ लक्षच्या तरतुदीपोटी विभागाने रुपये १४३.३७ लक्ष इतका खर्च केला आहे. परिणामी रुपये ०.६७ लक्ष बचत दिसून येते. सदर बचत नगण्य आहे.

महालेखापाल यांनी उपशिर्षाखाली रुपये ८५.२५ लक्ष इतका खर्च नोंदविला आहे. त्यामुळे विभागाच्या खर्चामध्ये व महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात रुपये ५८.१२ लक्ष इतकी तफावत दिसून येते. (रुपये १४३.३७ (-) रुपये ८५.२५ = रुपये ५८.१२)३

याबाबत नमूद करण्यात येते की, रुपये ५८.१२ लक्ष इतक्या खर्चाची नोंद महालेखापालांनी चुकीने (८०)(००२) आधार सामग्री गोळा करणे (०४) प्रमुख बांधकामे (योजनांतर्गत) या उपशिर्षाखाली केली आहे.

आवश्यक चुकीची दुरुस्ती नोंद प्रस्ताव शासन पत्र क्र.अेपीअे-२७०१/२००२-०३/(४७/०३)/लेखा, दिनांक २५/३/२००४ अन्वये प्रस्तावित करण्यात आला आहे..

रुपये ६२.८४ लक्षची बचत ही महालेखापालांनी मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पावरील परीरक्षण व दुरुस्तीवरील प्रत्यक्ष खर्चाच्या आधारावर इतर आकाराचे समायोजन केल्यामुळे झाली आहे.

तथापि, पाटबंधारे विभागामार्फत मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पावरील परीरक्षण व दुरुस्तीसाठी करण्यात आलेल्या एकूण तरतूदीच्या आधारावर अर्थसंकल्पिय अंदाजामध्ये २४.२५% नुसार इतर

आकारसाठी तरतूद केली जाते. या उलट महालेखापालांकडून प्रत्यक्ष खर्चाच्या आधारावर परीगणना केली जाते. परिणामी फरक दिसून येतो.

प्रधानशीर्ष २७०५ लाभक्षेत्र विकास
अनुदान क्र. आय-१

महालेखापालांचे अभिप्राय			
२			
प्रधान शीर्ष २७०५ - लाभक्षेत्र विकास	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
	(रु. लाखात)		
(०४) अधिक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ,ठाणे (०४) (०२) भूविकासाची कामे - आस्थापना			
पुनर्विनियोजन --- १५.००	१५.००	---	१५.००
(०५) अधिक्षक अभियंता, कोकण पाटबंधारे मंडळ, रत्नागिरी (०५) (०२) भूविकासाची कामे - आस्थापना			
पुनर्विनियोजन --- १५.००	१५.००	---	१५.००

भूविकासासाठी अगोदरच पार पाडलेल्या बांधकामाच्या रकमा प्रदान करण्यासाठी मार्च, २००३ मध्ये वरील उपशीर्षाखाली पुनर्विनियोजित करण्यात आलेला रुपये ३० लाखांचा निधी वापरण्यात आला नाही. अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००३).

ज्ञापन :

सदर उपशीर्षाखाली कोणतेही अनुदान उपलब्ध करण्यात आले नव्हते व विभागाने कोणताही खर्च केलेला नाही.

महालेखापालांनी उपशीर्ष "(०४)(०१) - युरोपियन आर्थिक समुदाय" या उपशीर्षाशी संबंधीत अनुदान रु.१५.०० लाख या उपशीर्षाखाली दर्शविले आहे.

सदर उपशीर्षाखाली कोणतेही अनुदान उपलब्ध करण्यात आले नव्हते व विभागाने कोणताही खर्च केलेला नाही.

महालेखापालांनी "(०५)(०१) -युरोपियन आर्थिक समुदाय" या उपशीर्षाशी संबंधीत अनुदान रु.१५.०० लाख या उपशीर्षाखाली दर्शविले आहे.

साक्ष :

यासंदर्भात समितीने दिनांक २ जून, २०१० रोजी जलसंपदा विभागांच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने जलसंपदा विभागा मध्ये लेखा परिक्षण आणि लेखा यामध्ये अनियमितता होत असून त्यामुळे खर्च कमी-जास्त होत आहे. परंतु विभागाकडून याबाबतीत कोणतीच कारवाई होत असल्याचे दिसत नाही. यासंबंधात आतापर्यंत कोणावर कारवाई करण्यात आली आहे काय, अशी विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, ज्ञापनातील आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क बाबत जो मुद्दा आहे त्याबाबत असे नमूद करण्यात येते की, आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क तपशीलवार लावले जातात. आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क लावल्यामुळे हा फरक दिसून येत आहे. म्हणजेच प्रत्येक लेखाशीर्षामध्ये तरतूद केली जाते. त्यावर प्रत्यक्ष खर्चावर आधारित २४.२५ टक्के आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क लावले जातात. जेव्हा विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद होते त्यावर टक्केवारीनुसार २४.२५ टक्के आस्थापना, हत्यारे व संयम शुल्क लावले जातात आणि महालेखाकार यांच्याकडून प्रत्यक्ष खर्चावर आधारित आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क लावले जातात त्यामुळे हा फरक दिसतो जेव्हा बजेट तयार केले जाते, तेव्हा प्रत्यक्षात किती खर्च होणार आहे, हे माहीत नसते. कारण अर्थसंकल्पीय तरतूद कमी जास्त होवू शकते. पूरक मागण्यांमध्येही तरतूद कमी जास्त होवू शकते. त्यामुळे ही बाब कशी चांगल्याप्रकारे करता येवू शकेल, याबाबत महालेखापाल आणि विभाग यांच्यामध्ये पत्रव्यवहार सुरु आहे. त्यामध्ये विभागाने आपली भूमिका मांडलेली आहे.

विभागीय सचिवांनी पुढे असाही खुलासा केला की, As per provisions contained in the Maharashtra Budget manual Establishment, tools and plant charges have to be calculated on actual expenditure whereas it was noticed that the department has made provision on the basis of orginal budget only and not considering the expenditure for the purpose of appropriation account hence there is variation between A.G.'s figures and Department's Figures you are requested to issue instructions to provide Establishment, tools and plant charges figures on the actuals. आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क बाबत वर्षानुवर्षे जी पध्दत आहे तिच पुढे सुरु आहे. त्यामुळे हा फरक दिसून येत आहे.

प्रत्यक्षात तरतुदीवर आधारीत आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क लावले पाहिजेत की, प्रत्यक्ष खर्च होईल, त्यावर लावले पाहिजेत, अशी विचारणा समितीने महालेखापालांना केली असता त्यांनी अशी माहिती दिली की, तफावत कायम रहाणार आहे. कारण अंदाजपत्रकात तरतूद केलेली असते. दोन- तीन वर्षाचे खर्च लक्षात घेवून आणि महालेखापाल ३१ मार्च पर्यन्त जो खर्च झालेला आहे, त्यावर आधारित आस्थापना, हत्यारे व संयम शुल्क लावतात. त्यामुळे ही तफावत राहणार आहे.

यावर समितीने सूचित केले की, त्यामध्ये तफावत राहिली तरी सुध्दा याबाबतीत जर वेळेवर खुलासा झाला, तर पुढील प्रश्न निर्माण होणार नाही. जादा खर्च झाला तर त्याचे प्रमाणक असते. ते त्या त्या वेळेला महालेखापाल यांना दाखविले पाहिजे. तसेच जागा जास्त भरल्या तर तो प्रशासकीय खर्च आहे. ही बाब महालेखापाल यांच्या निदर्शनास आणून दिली जात नाही. विभागास जो खर्च करावयाचा आहे व प्रत्यक्षात जो खर्च केलेला आहे त्यासंबंधातील तपशील महालेखापाल यांना दाखविले पाहिजेत. तसे त्या-त्या वेळेस होत नाही हे खेदजनक आहे असे सचिवांच्या निदर्शनास आणून दिले.

आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क २४.२५ टक्के कसे होतात यासंदर्भात खुलासा करण्यास समितीने सचिवांना सांगितले असता सचिवांनी असे प्रतिपादन केले की, सार्वजनिक बांधकाम नियमावलीच्या परिशिष्ट ७ मध्ये आस्थापना, हत्यारे व संयंत्रे यासाठी कशाप्रकारे तरतूद करावी याची कार्यपध्दती विषद केली आहे. सर्वसाधारणपणे आस्थापना, सामाजिक आस्थापना व विशेष आस्थापना अशा दोन प्रकारात असतात. विभागामार्फत बांधकामासाठी प्राप्त होणाऱ्या निधीच्या २४.२५ टक्के इतकी तरतूद इतर आकारासाठी करण्यात येते. आस्थापनेवरील खर्च १८%, हत्यारांचे व संयंत्रे यावरील खर्च ५.५०%, सचिवालयीन खर्च ०.५०% निवृत्ती वेतनावरील खर्च ०.२५ टक्के असा २४.२५ टक्के खर्च आहे. महालेखापाल कार्यालयाकडून बांधकामावर झालेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या २४.२५ टक्के या प्रमाणे सदर उपशीर्षाखाली खर्च नोंदविला जातो. त्यामुळे विभागाच्या व महालेखापालाच्या इतर आकार परिगणित करण्याच्या पध्दतीत फरक असल्यामुळे महालेखापाल कार्यालयाने नोंदविलेला इतर खर्च व विभागाने प्रत्यक्षात केलेली तरतूद यात तफावत दिसून येते.

याच संदर्भात महालेखापालांनी असे मत व्यक्त केले की, हे सर्व पुस्तकी समायोजन आहे, परंतु खर्चाची टक्केवारी कमी होणे आवश्यक आहे जास्तीचे पैसे घेऊन ठेवणे हे काही बरोबर नाही. आता ठेकेदारी किंवा बांधा व वापरा तत्वावरच बहुतेक कामे होतात. त्यामुळे आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क कमी होणे आवश्यक आहे. हा खर्च २४ टक्कयाच्या खाली आणणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचा खर्च ७-८ टक्के असताना जलसंपदा विभागाचा खर्च २४.२५ टक्के असणे बरोबर नाही. नोव्हेंबर २००५ पासून निवृत्ती वेतन योजना बंद केलेली असल्यामुळे सन २००५ पासून जे कर्मचारी सेवेत रुजू झालेले आहेत त्यांना निवृत्ती वेतन देण्यात येत नाही. त्यामुळे यासाठीचा खर्च देखील कमी झालेला आहे. आता हा खर्च नव्याने वाढणार नाही. या विभागाकडे जवळपास २५ हजार कर्मचारी आहेत, त्यामुळे हा खर्च कमी होणे आवश्यक आहे, असे समितीने मतप्रदर्शन केले असता विभागीय सचिवांनी असे प्रतिपादन केले की, या संदर्भातील प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला आहे. **त्यावर समितीने असे सूचित केले की,** आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क **खर्चाची टक्केवारी २४.२५ टक्कयापेक्षा कशी कमी करता येईल याबाबत विभागाने अभ्यास करणे आवश्यक आहे.**

महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात रु.४०.३३ लाख इतकी तफावत असून ती प्रामुख्याने गैरवर्गीकरणामुळे झाली आहे. त्यामुळे सदर गैरवर्गीकरण कोणी केले आहे, अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ही तफावत प्राधिकरण, नागपूर यांच्या भूविकास कामाच्या आस्थापनेवरील आहे. महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात रु.३६.३६ लाख इतकी तफावत आहे. सदर तफावतीचा शोध विहित कालावधीत लागू शकला नाही. नियंत्रण अधिकाऱ्याकडून यासंदर्भात कारवाई करण्यात आलेली आहे. यावर महालेखापालांनी असे सांगितले की, उशिरा तरतूद दाखविलेली आहे. प्रत्यक्ष खर्च झालेला नाही. हा खर्च दुसऱ्या शीर्षाखाली करण्यात आलेला आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, ज्या ठिकाणी खर्च करावयास पाहिजे होता त्या ठिकाणी खर्च करण्यात आलेला नाही. यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, एकूण अनुदान रु१५ लाखाच्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्चही रु १५ लाख इतका झाला आहे. त्यामुळे अर्थसंकल्पीय अनुदानापेक्षा कोणताही अधिक खर्च अथवा बचत झालेली नाही. महालेखापालांनी या उपशीर्षाखाली एकूण अनुदान "निरंक" दर्शविले आहे. या उपशीर्षाशी संबंधित एकूण अनुदान रु.१५ लाख महालेखापालांनी (०५) (०२) भूविकास कामे आस्थापना या उपशीर्षावर दर्शविले आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, हा खर्च प्रत्यक्षात कोठे करावयाचा होता, हा खर्च दुसऱ्याच ठिक्राणी केलेला आहे असे महालेखापालांनी म्हटलेले आहे. याबाबत विभागाचा खुलासा काय आहे अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी अशी माहिती दिली की, अनुदान १५ लक्ष असून प्रत्यक्ष खर्च १५ लक्ष झालेला आहे. यासंदर्भातील चुकीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव पाठविण्यात आलेली आहे. त्यावर महालेखापालांनी असे सांगितले की, चुकीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव उशिरा प्राप्त झाल्यामुळे ती परत पाठविलेली आहे. परंतु यासंदर्भात विभागाच्या नस्तीमध्ये नोंद केलेली आहे. त्याबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, गैरवर्गीकरणाचे प्रकार बरेच दिसून आलेले आहेत. त्यामुळे असे प्रकार घडणे बरोबर नाही. तसेच बऱ्याच ठिकाणी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चातील व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चातील तफावत ही प्रामुख्याने गैरवर्गीकरणामुळे झाल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

अभिप्राय व शिफारशी :

समितीपुढे आलेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून आले की, जलसंपदा विभागाच्या प्रधानशीर्ष २७०१, मोठे व मध्यम पाटबंधारे अंतर्गत रूपये २०३.८१ लाखाची बचत ही महालेखापालांनी मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील परिरक्षण व दुरुस्तीच्या प्रत्यक्ष खर्चाच्या आधारावर इतर आकाराचे समायोजन केल्यामुळे झाली आहे. तथापि विभागामार्फत मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पावरील परिरक्षण व दुरुस्तीसाठी करण्यात आलेल्या एकूण तरतुदीच्या आधारावर अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये २४.२५% नुसार आस्थापना,

हत्यारे व संयत्रे शुल्कासाठी तरतूद केली जाते. याउलट महालेखापालांकडून प्रत्यक्ष खर्चाच्या आधारावर परिगणना केली जाते. परिणामी खर्चामध्ये फरक दिसून येत असल्याचे विभागाने नमूद केले आहे.

जेव्हा विभागाच्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद होते, त्यावर टक्केवारीनुसार २४.२५ टक्के आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क लावले जातात आणि महालेखाकार यांच्याकडून प्रत्यक्ष खर्चावर आधारित आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क लावले जातात त्यामुळे खर्चामध्ये फरक दिसतो. जेव्हा अदांजपत्रक तयार केले जाते, तेव्हा प्रत्यक्षात किती खर्च होणार आहे हे माहीत नसते. कारण अदांजपत्रकीय तरतूद कमी जास्त होवू शकते. पूरक मागण्यांमध्येही तरतूद कमी जास्त होवू शकते. त्यामुळे ही बाब कशी चांगल्याप्रकारे करता येवू शकेल याबाबत महालेखापाल आणि विभाग यांनी पत्रव्यवहार करुन किंवा चर्चेच्या माध्यमातून निर्णय घेऊन ही बाब निकाली काढणे आवश्यक आहे तसेच जलसंपदा विभागाची कामे आता ठेकेदारी किंवा बांधा, वापरा व हस्तांतरण (BOT) तत्वावरच होतात त्यामुळे आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क कमी होणे आवश्यक आहे.

आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क लावण्यात जरी तफावत राहिली तरी सुध्दा उपरोक्त प्रकरणी जर वेळेवर खुलासा झाला तर पुढील प्रश्न निर्माण होणार नाही. जो खर्च झाला, त्याच्या बाबी महालेखापालांच्या निदर्शनास आणून दिल्या पाहिजेत, काही जागा भरल्या, तर तो प्रशासकीय खर्च असतो ही बाब महालेखापालांच्या निदर्शनास आणून दिली जात नाही विभागाला जो खर्च करावयाचा आहे व प्रत्यक्षात जो खर्च केलेला आहे.त्या संबंधातील तपशील महालेखापालांना दाखविले पाहिजेत तो त्या-त्या वेळेस होत नाही ही खेदाची बाब आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचा खर्च ७-८ टक्के असताना जलसंपदा विभागाचा खर्च २४.२५% असणे बरोबर वाटत नाही. नोव्हेंबर, २००५ पासून निवृत्ती वेतन योजना बंद केल्यामुळे त्यापोटी येणारा खर्च देखील कमी झालेला आहे. आता हा खर्च नव्याने वाढणार नाही. **या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्काची टक्केवारी २४.२५ टक्क्यापेक्षा कमी करता येईल, यादृष्टीने विभागाने अभ्यास करणे आवश्यक असल्याचे समितीला वाटते. इतर विभागाच्या तुलनेत जलसंपदा विभागाचे आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क जास्त आहेत. सबब, जलसंपदा विभागाचे सद्य:स्थितीमध्ये असलेले २४.२५% आस्थापना, हत्यारे व संयत्रे शुल्क कमी करण्याच्या दृष्टीने विभागाने आवश्यक ती उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

समितीला असेही दिसून आले की, पाटबंधारे विभागाच्या लेखाशीर्ष २७०५ "लाभक्षेत्र विकास" अंतर्गत महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात रु.४०.३३ लाख इतकी तफावत असून ती प्रामुख्याने गैरवर्गीकरणामुळे झाली आहे. सदर तफावतीचा शोध विहीत कालावधीत लागू शकला

नाही. नियंत्रण अधिकाऱ्याकडून यासंदर्भात कारवाई करण्यात आलेली आहे असे मोघम स्वरुपाचे उत्तर विभागाने दिलेले आहे

गैरवर्गिकरणाचे प्रकार बरेच दिसून आलेले आहेत व असे प्रकार घडणे बरोबर नाही. सन २००२-२००३ यावर्षात बऱ्याच ठिकाणी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चातील व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चातील तफावत ही गैरवर्गीकरणामुळे झाल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे. गैरवर्गीकरण झाल्यामुळे विभागाचा नोंदविलेला खर्च हा कमी जास्त प्रमाणात दिसून येतो ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. **याला जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

ग्रामविकास विभाग

७) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना या शीर्षाकडे वळविण्यात आलेला निधी :

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००३-०४ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असतांना अनुदान क्रमांक एल-३ ग्रामविकास कार्यक्रम अंतर्गत प्रधानशीर्ष २५०५ "ग्रामीण रोजगार" खालील सन २००३-०४ वर्षाकरीता केंद्र सरकारने दिलेल्या अनुदानाच्या प्रमाणात राज्याच्या हिश्याचे नियतवाटप केल्यानंतर रुपये ९३६.१३ लाखाचा उर्वरित निधी, हा केंद्रसरकारकडून मिळालेल्या रकमेच्या आधारावर राज्याला द्यावयाच्या हिश्यासाठी पुनर्विनियोजनाव्दारे ०१ राष्ट्रीय कार्यक्रम ७०२ (०१) (११) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना या शिर्षाकडे वळविण्यात आला, असे महालेखाकारांनी भाष्य केल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे :-

प्रधानशिर्ष - २५०५
अनुदान क्रमांक एल-३ ग्रामविकास कार्यक्रम

लेखाशिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च (रुपये लाखात)	अधिक खर्च (+) बचत (-)
प्रधानशिर्ष २५०५-ग्रामीण रोजगार, ६० इतर कार्यक्रम ००० रोजगार हमी योजना (०१)(०१) इंदिरा आवास योजना-सर्वसाधारण-योजनांतर्गत (२५०५ ०५ ६८) मूळ .. ५५,१७.८९ पुनर्विनियोजन .. -९,३६.१३	४५,८१.७६	४५,८१.७६	--

टिपा व भाष्ये :-

सन २००३-०४ या वर्षाकरीता केंद्र सरकारने दिलेल्या अनुदानाच्या प्रमाणात राज्याच्या हिश्याचे नियतवाटप केल्यानंतर रुपये ९३६.१३ लाखाचा उर्वरित निधी, हा केंद्र सरकारकडून मिळालेल्या रकमेच्या आधारावर राज्याला द्यावयाच्या हिश्यासाठी पुनर्विनियोजनाव्दारे ०१ राष्ट्रीय कार्यक्रम ७०२ (०१) (११) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना या शीर्षाकडे वळविण्यात आला.

ज्ञापन :

(२५०५ ०५६८) सन २००३-०४ या वित्तीय वर्षात या लेखाशिर्ष संकेतांकाखाली रुपये ५,५१७.८९ लाख मूळ अनुदान प्राप्त झाले. ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शा.नि.क्र.जग्रासयो/२००४/ प्र.क्र.२१/ जल-१५, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ३१.५.२००४ अन्वये संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेकडे पुनर्विनियोजनाव्दारे रु.(-) ९३६.१३ लाख वर्ग केल्याने अंतिम अनुदान रु.४,५८१.७६ लाख प्राप्त झाले.

मंजूर अनुदान व महालेखापाल यांनी नोंदविलेला खर्च यात तफावत नाही, असे स्पष्टीकरण ग्रामविकास विभागाने दिले आहे.

साक्ष :

या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने लोकलेखा समितीने दिनांक ५ मे, २०१० रोजी ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली, या साक्षीच्या वेळी समितीने विभागीय सचिवांना अशी विचारणा केली की, संपूर्ण ग्रामीण रोजगार कार्यक्रम या योजनेअंतर्गत गावा गावात रोजगारनिर्मिती करण्यात येत असून यापूर्वी रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांनी कामे केलेली आहेत. त्या मोबदल्यात त्यांना धान्याची कुपन्स देण्यात आली होती, परंतु त्या कुपन्सवर अजूनही त्यांना धान्य मिळालेले नाही, याबाबतची वस्तुस्थिती काय आहे, याबाबत विभागीय सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, मजुरांना अगोदरची मजूरी वितरीत करण्यात आली आहे व त्याचा हिशोब केला गेलेला नाही. बिनहिशोबी खर्च झालेला असल्यामुळे, त्यांचे पगार हे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत करावयाचे होते. काही जिल्ह्यात ते करण्यात आले. केंद्र सरकारने काही ठिकाणी लक्ष्य ठरवून दिले होते, परंतु त्याप्रमाणात तेथे धान्य मिळाले नाही. ज्या ज्या ठिकाणची देयके प्रलंबित असतील त्या ठिकाणच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ५० टक्क्यांपर्यंत कार्यवाही पूर्ण झालेली आहे. ज्या जिल्हा परिषदांनी आपल्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च केलेला आहे त्यास त्या जिल्हा परिषदा जबाबदार आहेत. परंतु अशा प्रकारणांबाबत संबंधित जिल्हा परिषदांना सूचना दिलेल्या आहेत. त्यावेळी केंद्र शासनाकडून या योजनेंतर्गत धान्य कमी प्राप्त झाले असल्यामुळे त्यांना धान्य पुरविता आले नाही. त्याबाबतचा पाठपुरावा केंद्र सरकारकडे सुरु असून अद्यापपर्यंत केंद्रसरकारकडून काहीही उत्तर आले नाही. यावर मजुरांनी संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामे केलेली आहेत. या योजनेवर काम करणाऱ्या मजुरांना मागिल ३-४ वर्षापासून अद्याप ५ लाख क्विंटल धान्याचे वाटप करण्यात आलेले नाही. या मुद्यांवर विभागीय सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, यासाठी तीन प्रवर्ग केलेले असून त्यानुसार मजुरांना धान्याचे वाटप करण्याचे काम सुरु आहे.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे ९ कोटी रुपये वळविण्यात आले आहेत, ही रक्कम कशासाठी खर्च केलेली आहे, अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, आपल्या राज्यातील १२ जिल्हयांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना फेब्रुवारी, २००६ मध्ये सुरु

झाली. त्यानंतर एप्रिल, २००७ मध्ये ६ जिल्हयांमध्ये आणि एप्रिल, २००८ मध्ये उर्वरित १५ जिल्हयांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु झाली. केंद्र शासनाचे असे आदेश होते की, ज्या जिल्हयामध्ये ज्या दिवशी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु होईल, त्या दिवसापासून त्या जिल्हयामध्ये रोजगार हमी योजना बंद होणार आहे. त्या दिवसापर्यंत झालेल्या कामाचे देयक तयार करुन उर्वरित निधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये वर्ग करावा. त्याप्रमाणे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये निधी वर्ग करण्यात आलेला आहे. काही ठिकाणी देयके प्रलंबित होती. शासनाने मागील वर्षी यासंदर्भात आदेश काढलेले आहेत. जिल्हाधिका-यांनी निधीचे वाटप करावयाचे होते. आतापर्यंत ५० टक्क्यापेक्षा जास्त काम झालेले आहे. दुसरी बाब अशी होती की, केंद्र शासनाने जे लक्ष्य ठरवून दिलेले होते त्यापेक्षा जास्त निधी काही जिल्हयांमध्ये खर्च झालेला आहे. संबंधित जिल्हा परिषदांना त्यांनीच त्यांचे प्रदान करावे. अशा सूचना देण्यात आल्या होत्या. काही ठिकाणी धान्य कमी प्राप्त झाले होते, त्यामुळे देयके प्रलंबित राहिलेली आहेत. केंद्र शासनाने तो निधी राज्य शासनाला द्यावा यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे, असेही समितीला साक्षीच्या वेळी सांगण्यात आले.

मजुरांना धान्याचे वाटप करावयाचे राहिलेले आहे, ते वाटप केव्हा केले जाणार आहे? अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी असे प्रतिपादन केले की, जिल्हापरिषदेला जवळ जवळ १२ कोटी रुपये वाटप करावयाचे आहेत. जिल्हापरिषदेने जास्त खर्च केलेला आहे. केंद्र शासनाने लक्ष्य ठरवून दिलेले होते, त्याप्रमाणे त्यांनी आराखडा तयार करावयास पाहिजे होता. परंतु त्यांनी तसे न करता जास्त खर्च केलेला आहे. ही जिल्हापरिषदेची जबाबदारी होती. यासंदर्भात संबंधित अधिका-यांकडे अधिक माहिती मागितली असता प्रत्येक वेळी वेगवेगळी आकडेवारी दिली जाते. माहितीच्या अधिकारामध्ये माहिती मागितली तरी तिथे सुध्दा वेगळी आकडेवारी दिली जाते.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत किती खर्च जास्त झालेला आहे व एकूण किती धान्य वाटप करावयाचे राहिलेले आहे? ज्या मजुरांना धान्य वाटप करावयाचे आहे त्या मजुरांना धान्य मिळाले पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले असता यावर सचिवांनी असे प्रतिपादन केले की, रोजगार हमी योजना बंद झालेली असल्यामुळे पैसे दिले जाणार नाहीत. अशी शासनाची भूमिका नसून ज्या दिवशी संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजना बंद झाली, त्या दिवसापर्यंत जे काम झालेले आहे, त्या कामाचे देयक प्रलंबित असेल तर ते प्रथम पूर्ण करावे आणि नंतर राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मध्ये निधी वर्ग करावा. त्याप्रमाणे काही जिल्हयांनी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मध्ये निधी वर्ग केलेला आहे. संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजना बंद झाली असून आता राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु झाली असली तर ही योजना महाराष्ट्र राज्यात प्रभावी होऊ शकलेली नाही. या योजनेच्या अटी व शर्ती जाचक असल्यामुळे या योजनेचा लाभ पाहिजे त्या प्रमाणात लोकांना होत नाही. संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून खेड्या-पाड्यामध्ये चांगली कामे होत होती. ही योजना पुन्हा सुरु करण्यात येणार आहे काय, अशी

समितीने विचारणा केली असता सचिवांनी असा खुलासा केला की, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु झाल्यामुळे ही योजना आता बंद झालेली आहे.

अभिप्राय व शिफारशी :- महालेखापालांचे अभिप्राय व त्या अनुषंगाने विभागाने दिलेली माहिती व साक्षीच्या वेळी प्रत्यक्षात समितीला उपलब्ध झालेली माहिती याचा साकल्याने विचार करता असे दिसून येते की, मजुरांनी संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामे केलेली आहेत. या योजनेवर काम करणाऱ्या मजुरांना मागिल ३-४ वर्षापासून लाखो क्विंटल धान्याचे वाटप केलेले नाही. ही बाब अतिशय गंभीर आहे तथापि आता शासनाने यासाठी तीन प्रवर्ग केलेले असून मजुरांना धान्याचे वाटप करण्याचे काम सुरु केले आहे. अशी माहिती समितीला देण्यात आली. केंद्र शासनाने जे लक्ष्य ठरवून दिलेले होते, त्यापेक्षा जास्त निधी काही जिल्हयांमध्ये खर्च झालेला आहे. त्याचे प्रदान जिल्हापरिषदेने करावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. **ज्या जिल्ह्यांना धान्य कमी प्राप्त झाले होते व त्याची देयके प्रलंबित राहिलेली आहेत, अशा जिल्ह्यांची प्रलंबित देयके अदा करण्याकरिता तसेच राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ज्या अधिक वर्षासाठी निधी प्राप्त झाला, त्या वर्षाची कामे पूर्ण करण्याकरिता राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे वाढीव निधीची मागणी करण्यात यावी व यासाठी केंद्र शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

राज्यातील १२ जिल्हयांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना फेब्रुवारी, २००६ मध्ये सुरु झाली. त्यानंतर एप्रिल, २००७ मध्ये ६ जिल्हयांमध्ये आणि एप्रिल, २००८ मध्ये उर्वरित १५ जिल्हयांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु झाली. केंद्र शासनाच्या आदेशानुसार ज्या जिल्हयामध्ये ज्या दिवशी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु झाली, त्या दिवसापासून त्या जिल्हयामध्ये रोजगार हमी योजना बंद झाली आहे. **आता संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजना बंद झाली असून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु झाली आहे परंतु ही योजना महाराष्ट्र राज्यात प्रभावी होऊ शकलेली नाही. कारण या योजनेच्या अटी व शर्ती जाचक असल्यामुळे योजनेचा लाभ पाहिजे त्या प्रमाणात लोकांना मिळत नाही. संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राज्याच्या ग्रामीण भागात विकासाची चांगली कामे होत होती असे समितीचे ठाम मत आहे. सबब राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु ठेवून राज्य शासनाने खेड्यापाड्यामध्ये बेरोजगारांना रोजगार सुलभतेने व तातडीने मिळण्यासाठी संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजना पुन्हा सुरु करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी अशी समितीची आग्रही शिफारस आहे.**

.....

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग

८) राज्याची जेवढी गरज आहे तेवढा निधी वित्त विभागाकडून सामाजिक न्याय विभागाला दिला जात नाही :

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००३-०४ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असतांना अनुदान क्रमांक एन-४ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण अंतर्गत प्रधानशीर्ष २२२५ "अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय यांचे कल्याण" खाली महालेखाकारांनी पुढील भाष्य केल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे :-

मुख्य लेखाशिर्ष -२२२५
अनुदान क्रमांक एन -४ "अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण"

		एकूण अनुदान (रुपये लाखांत)	प्रत्यक्ष खर्च (रुपये लाखांत)	अधिक्य (+) बचत (-) रुपये
	२२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ०३ -मागासवर्गीयांचे कल्याण, २७७ - शिक्षण, केंद्र पुरस्कृत योजना (०२) (१७) इतर मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण फी व परिक्षा फी चे प्रदान, मूळ : ५००.०० पूरक : ६६००.०० पुनविर्नियोजन : (-) ५३४६.४७	१७५३.५३	१११६.९१	(-) ६३६.६२

सदर उपलेखाशिर्षाबाबत कमी/अधिक खर्चाची कारणे लोकलेखा समितीस देण्यात आली

ज्ञापन :

या योजनेखाली रु. ६३६.६२ लाख एवढी बचत झाली आहे. सदरील योजना दि.६.१०.२००३ च्या शासन निर्णय अन्वये नव्याने सुरु केली. योजनेची प्रसिध्दी व परिपत्रके काढून अपेक्षित प्रस्ताव महाविद्यालयाकडून प्राप्त न झाल्यामुळे बचत झालेली असून, ती कृपया क्षमापित करण्यात यावी.

अनुदान क्रमांक एन -४ "अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण"

		एकूण अनुदान (रुपये लाखांत)	प्रत्यक्ष खर्च (रुपये लाखांत)	अधिक्य (+) बचत (-)(रुपये)
	२२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, (०२) - समाजकल्याण, १०४ - वृध्द विकलांग व निराश्रित व्यक्तींचे कल्याण (०८) (०२) भूमिहीन वृध्द मजूरांना वित्तीय सहाय्य मूळ : १,४१,७४.६०	१४१७४.६०	९७१६.३१	(-)४४५८.२९

सदर उपलेखाशिर्षाबाबत कमी/अधिक खर्चाची कारणे लोकलेखा समितीस देण्यात आली.

ज्ञापन :

१) शासन निर्णय दि.१९-४-२००१ अन्वये योजनेच्या निकषात बदल झाल्यामुळे केवळ ६० ते ६५ वर्ष वयोगटातील फक्त निराधार महिलांचा समावेश योजनेत असल्याने पुरुष लाभार्थी कमी झाले.

२) ६५ वर्ष पूर्ण झालेले लाभार्थी श्रावणबाळ सेवा योजनेमध्ये वर्ग झाल्याने लाभार्थी कमी झाले.

३) कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे पात्र लाभार्थी कमी झाले.

४) काही लाभार्थी मयत व स्थलांतरीत झाल्यामुळे कमी झाले.

वरील कारणामुळे खर्चात बचत झाली आहे.

अनुदान क्रमांक एन -४ "अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण"

		एकूण अनुदान (रुपये)	प्रत्यक्ष खर्च (रुपये)	अधिक्य (+) बचत (-) (रुपये)
	२२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, (०२) - समाजकल्याण, १०४ - वृध्द विकलांग व निराश्रित व्यक्तींचे कल्याण (०८) (०६) राष्ट्रीय वार्धक्य निवृत्तीवेतन योजना व राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना अंमलबजावणीसाठी प्रशासकीय खर्च पूरक : ८०१.८० लाख	८०१.८०	८४७.६५	(+) ४५.८५

वर नमूद केलेल्या शीर्षाखालील रु.२७९५.७३ लाखाच्या अंतिम आर्थिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नव्हती.

ज्ञापन :

लाभार्थी संख्येत वाढ झाल्यामुळे, बँकेत खाते उघडणे, मनि ऑर्डरचा खर्च याबाबीकरिता जास्त खर्च झाला आहे.

साक्ष:

यासंदर्भात माहिती घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक २३ जून, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. त्यावेळी समितीने सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांना अशी विचारणा केली की, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता शासनाच्या कोण कोणत्या योजना आहेत, या योजनांची प्रसिद्धी कशा प्रकारे करण्यात आली होती, तसेच महाविद्यालयाकडून किती प्रस्ताव प्राप्त झाले, त्याची समितीला माहिती द्यावी. खुलासा करताना सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीला असे सांगितले केले की, संपूर्ण राज्याचा विचार करता मागासवर्ग व इतर मागासवर्गाकरिता समाज कल्याण विभागामार्फत १५७ योजना राबविण्यात येतात. सन २०१०-२०११ यावर्षी सामाजिक न्याय विभागाने अनुसूचित जाती, विमुक्त जाती व

भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांच्या कल्याणासाठी शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना व संबंधित विभागाने त्या योजनाबाबत दिलेली माहिती, त्या विभागांकडून संकलित करुन पुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. योजनेचे स्वरुप, लाभार्थी कोण आहे, त्याकरिता अर्ज कसे करावे याची सविस्तर माहिती त्या पुस्तिकेत दिलेली आहे. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या संदर्भात शाळेतील किंवा महाविद्यालयामधील मुख्याध्यापक/प्राचार्य, प्राध्यापक/ शिक्षक यांच्या मार्फत प्रचार केला जातो. शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी जिल्हा समाज कल्याण अधिकारी सर्व संबंधितांना शासनाच्या योजनांची माहिती देतात. तसेच या योजनांमध्ये बदल झाला असल्यास त्या संदर्भात शासन निर्णयाची माहिती देण्यात येते व सदर शासन निर्णय सूचना फलकावर लावला जातो.

काही महाविद्यालयांमध्ये मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम २ -२ वर्षे होऊन देखील दिली जात नाही. तसेच सूचना फलकावर माहिती लावल्यानंतर मुले अर्ज करतात. परंतु जेवढया विद्यार्थ्यांनी अर्ज केले असतील, तेवढया विद्यार्थ्यांचे शुल्क महाविद्यालय भरत नसून महाविद्यालय आपल्याकडून शुल्काच्या रक्कमेची प्रतिपूर्ती करते. अनेक महाविद्यालयांमध्ये अशी थकित देयके आहेत. शिष्यवृत्तीकरिता विद्यार्थी अर्ज करतात, मात्र त्यानंतर प्रत्यक्षात त्यांना ही शिष्यवृत्तीची रक्कम मिळाली आहे की नाही, याकडे लक्ष दिले जात नाही. अनेकदा शाळा, महाविद्यालये यांच्याकडे निधी प्राप्त होऊन देखील विद्यार्थ्याकडे तो निधी वर्ग केला जात नाही. तसेच काही शाळा/महाविद्यालये या मध्ये तर विद्यार्थ्यांकडून सहया घेतल्या जातात, मात्र त्यांना पैसे दिले जात नाहीत. फीच्या रक्कमेची प्रतिपूर्ती न झाल्यामुळे विद्यार्थी संघटना आंदोलने करतात व यामुळे विद्यार्थ्यामध्ये असंतोषाची भावना निर्माण होते. त्यामुळे काही वेळेला त्या ठिकाणी काही अप्रिय घटना घडतात असे समितीने मत व्यक्त केले असता सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी अनेक वर्षापासून ही वस्तुस्थिती असल्याचे साक्षीचे वेळी मांन्य केले. अनेकदा महाविद्यालयांकडे शुल्काची प्रतिपूर्ती केली जाते, मात्र अनेक महाविद्यालयांमध्ये अजूनही शुल्काच्या रक्कमेची प्रतिपूर्ती केली गेलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. यामागची दोन मुख्य कारणे आहेत. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या फी करिता साधारण योजने अंतर्गत तरतूद केली जाते. काही वेळा आवश्यकतेपेक्षा कमी रक्कमेची तरतूद केली जाते. अनुसूचित जाती मधील विद्यार्थ्यांकरिता मात्र पुरेशा रक्कमेची तरतूद केली जाते, त्यामुळे त्यांची थकबाकी अतिशय कमी असते. थकबाकी शिल्लक राहिलीच असेल तर त्यामागे काही व्यवस्थापकीय कारणे आहेत. मात्र शासनाकडून निधी कमी मिळाला अशी परिस्थिती नाही. या वर्षापासून म्हणजे सन २०१० -२०११ या शिष्यवृत्तीच्या बाबतीत नवीन पध्दत अवलंबिण्यात आली असून त्यानुसार विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये ती रक्कम थेट जमा केली जाणार आहे. त्यासाठी संगणक सॉफ्टवेअर तयार करण्यात आले असून विद्यार्थ्यांच्या नावाने बँकेत शून्य जमा (झीरो बॅलन्स) खाते उघडण्यात येणार आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की,पूर्वी शिष्यवृत्ती महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांना दिली जात होती, ती आता नवीन पद्धतीप्रमाणे महाविद्यालयांमधून देण्यात येऊ नये, अशा प्रकारचा शासन आदेश निघाला आहे काय, तसेच शासनाकडून इतर मागासवर्गाच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या फीची प्रतिपूर्ती केली जाते. मात्र मागिल काही वर्षात ही शुल्काची रक्कम देण्यास बराच विलंब लागला होता. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात वर्गाबाहेर उभे केले गेले असल्याच्या घटना घडल्यानंतर सामाजिक न्याय विभागाकडून असे आदेश प्राप्त झाले की, कोणालाही अशा प्रकारे निधी दिला जाणार नाही. त्यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, फी च्या रक्कमेची प्रतिपूर्ती शिक्षण विभागाच्या नियमां प्रमाणे केली जाते. प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ४ रुपयांपासून ८ रुपयांपर्यंत रक्कमेची प्रतिपूर्ती केली जाते. ही रक्कम अतिशय कमी असून त्याला काहीच अर्थ उरत नाही. गेल्या २ ते ३ वर्षापासून अशा २ ते ३ घटना घडल्या आहेत. काही अधिकाऱ्यांनी शासन निर्णयाचे चुकीचे अर्थ लावून १०० टक्के फीच्या प्रतिपूर्तीचे आदेश काढले नाहीत. त्यामुळे त्यामध्ये काही सुधारणा करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने आदेश निर्गमित केले होते. सद्यःस्थितीत, शासन निर्णयाप्रमाणे फी च्या रक्कमेची प्रतिपूर्ती केली जाते.

अनेक उच्च माध्यमिक शिक्षण संस्था व खाजगी विना अनुदानित शाळांनी विद्यार्थ्यांच्या फीची रक्कम भरलीच नाही. तर काही ठिकाणी केवळ ५ रुपये, १० रुपये अशी किरकोळ रक्कमेची प्रतिपूर्ती केली जाते. अनेक खाजगी शाळांची फी ४०,००० ते ५०,००० हजार रुपये पर्यंत आहे. त्यामुळे अनेक हुशार विद्यार्थ्यांना चांगल्या खाजगी शाळेमध्ये शिक्षण घेण्याची इच्छा असूनही त्यांना अशा शाळांमधून शिक्षण घेता येणे शक्य होत नाही. यामध्ये लवकरात लवकर सुधारणा करण्यात यावी असे समितीने मत व्यक्त केले असता सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी असा खुलासा केला की, त्यांच्या अध्यक्षतेखाली सचिवांची एक समिती स्थापन केलेली असून या समितीमध्ये शाळेच्या फी चा दर ठरविला जाईल व त्याप्रमाणे फीच्या रक्कमेची प्रतिपूर्ती केली जाणार आहे.

सामाजिक न्याय विभागाकडून अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्तीच्या रक्कमेची १०० टक्के प्रतिपूर्ती शाळांना करावयाची असते. यासंदर्भात सामाजिक न्याय विभागाने जो शासन निर्णय निर्गमित केला आहे, त्याचा चुकीचा अर्थ राज्यातील काही शाळांच्या व्यवस्थापनांनी लावला असून त्यामुळे प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळत नाही. त्याचप्रमाणे शाळांकडून विद्यार्थ्यांना जी फी आकारण्यात येते, त्याची प्रतिपूर्ती देखील शासनाकडून केली जाते. त्यामुळे शाळांनी अशा विद्यार्थ्याना फी आकारु नये असे अपेक्षित असते. तथापि, शाळांकडून फीच्या रक्कमेच्या प्रतिपूर्तीची मागणीही केली जात नाही व विद्यार्थ्याना फीची सवलतही दिली जात नाही, असे अनेक शाळांच्या बाबतीत अनुभव येतात, असे समितीने निदर्शनास आणले असता सचिवांनी साक्षीचे वेळी असा खुलासा केला की, शासनाकडून ज्या रक्कमांची प्रतिपूर्ती

करण्यात येते, ती रक्कम खूपच अल्प असल्यामुळे अनेक शाळा प्रतिपूर्तीची मागणी शासनाकडे करीत नाहीत.

वयाची ६५ वर्षे पूर्ण झालेल्या लाभार्थी व्यक्ति श्रावणबाळ सेवा योजनेमध्ये वर्ग झाल्याने भुमिहीन वृध्द मजुरांना वित्तिय सहाय्य या योजनेतील लाभार्थी कमी झाले, तसेच कागदपत्रांची पूर्तता न करु शकल्यामुळे पात्र लाभार्थी कमी झाले असे स्पष्टीकरण विभागाने स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात दिले आहे. त्याच प्रमाणे लातूर, नांदेड जिल्हयात बरेच बोगस लाभार्थी आढळून आले होते, त्याबाबत न्यायालयाच्या ताशेऱ्यानंतर त्या संदर्भात दुरुस्ती केली गेली. या समितीने उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत खुलासा करताना सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी साक्षीचे वेळी असे नमूद केले की, समितीने दिलेली माहिती अंशत: खरी असून सांगली व नांदेड जिल्हयामध्ये अनेक लाभार्थी अपात्र ठरले आहेत. नांदेड जिल्हयामध्ये एकूण ४० हजार लाभार्थ्यांपैकी १८ हजार लाभार्थी अपात्र ठरलेले आहेत.या योजनेच्या निकषानुसार लाभार्थ्यांच्या मुलांचे वय २१ वर्षे झाल्यानंतर अशा पालकांना या योजनेचा लाभ घेता येत नाही.

लाभार्थी कोणत्या योजनांचा लाभ घेतात, हे अधिकारी बारकाईने पाहत नाहीत. पूर्वी तयार करण्यात आलेल्या याद्याच पुढील योजनांकरिता वापरल्या जातात. त्यामुळे लाभार्थी ठरवताना अधिकाऱ्यांनी अधिक काळजी घेतली पाहिजे. कामात चूक झाली तर आपल्याला कडक शिक्षा होईल अशी भिती अधिकाऱ्यांमध्ये राहिलेली नाही. मुंबई उपनगरात साधारणत: १.५० कोटी लोकसंख्या असून त्यामध्ये लाभार्थ्यांची संख्या ३० हजार एवढीच आहे. या उलट काही ठिकाणी लोकसंख्या २० लाख असून त्यामध्ये लाभार्थ्यांची संख्या २ लाख आहे. लाभार्थी निश्चित करताना अधिकारी बारकाईने लक्ष देत नाहीत, अशी बाब समितीने निदर्शनास आणली असता विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की, ही संपूर्ण योजना विशेष सहाय्य योजनेअंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राबविली जाते. तालुका पातळीवर सदर काम नायब तहसीलदार यांच्याकडे देण्यात आलेले असून, त्याच्यांकडून अर्जांची छाननी होते व नंतर सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविले जातात.

ग्रामसेवक, तलाठी यांच्याकडून अपात्र लाभार्थ्यांना देखील वरीष्ठ नागरिकत्वाचे दाखले देण्यात येतात. काही प्रकरणांमध्ये तर ६५ वर्षे वय पूर्ण झालेले नसले तरी दाखले देण्यात येतात व लाभासाठी प्रकरणे तयार करुन सादर केली जातात. परिणामी पात्र लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहतात व अपात्र लाभार्थ्यांमुळे शासनावर नाहक आर्थिक बोजा पडतो.निराधारांना आधार देण्यासाठी श्रावणबाळ सेवा योजना शासनाने सुरु केली आहे. परंतु दप्तरदिरंगाईमुळे किंवा निधीची पुरेशी तरतूद न केल्यामुळे तसेच शासन यंत्रणेतील उदासीनता यामुळे या योजनेचा उद्देश सफल झालेला नाही असे समितीने मत प्रदर्शित केले असता सचिवांनी असा खुलासा केला की, श्रावणबाळ सेवा योजना ही राज्यातील निराधारांच्या दृष्टीने अतिशय महत्वाची योजना असून ही एक प्रकारे सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाची योजना आहे. ग्रामीण भागातील निराधार, वयोवृध्द व निराश्रीत लोकांचे आर्थिक उत्पन्न अतिशय अल्प असल्यामुळे त्यांना थोडासा

आर्थिक आधार देण्यासाठी ही योजना सुरु केलेली आहे. या योजनेसाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होतो. केंद्र शासनाच्या निधीमध्ये राज्य शासनाचा काही हिस्सा घालून ही एकत्रित योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थ्याला दरमहा ५०० रुपये दिले जातात. यामध्ये केंद्राचा रु.२०० व राज्य शासनाचा रु.३००/- हिस्सा असतो.

राज्यात अनेक वयोवृध्द व्यक्तिना सांभाळणारे कोणीही नाही, ते निराधार असून त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे जीवनदायी योजना, श्रावणबाळ सेवा योजना, अंत्योदय योजना या सर्व योजनांचा लाभ या वयोवृध्दांना झाला पाहिजे. त्यामुळे सामाजिक न्याय विभागातर्फे श्रावणबाळ सेवा योजना, अन्न व नागरी पुरवठा विभागातर्फे अंत्योदय योजना अशाप्रकारे राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविल्या जाणाऱ्या वेगवेगळया योजनांची एकमेकांशी सांगड घालण्याची आवश्यकता आहे. या सर्व योजना संलग्न केल्या तर त्याचा पात्र लाभार्थ्यांना अधिक लाभ मिळू शकेल व या योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होऊ शकेल, अशी समितीने सूचना केली असता त्यावर विभागीय सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, या सर्व योजना विशेष सहाय्य योजने अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या आहेत. राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत निराधार लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या अशा ४-५ योजना आहेत. निराधारांना प्रतिमाह ५०० रुपयांची आर्थिक मदत करण्याची बांधिलकी राज्य शासनाने स्वीकारली आहे. पूर्वी या योजनेमध्ये काही प्रमाणात केंद्र शासनाचा निधी आणि बहुतांशी राज्य शासनाचा निधी वापरण्यात येत होता. त्यानंतर केंद्र शासनाने ६५ वर्षावरील वरिष्ठ नागरिकास अनुदान देण्याची योजना सुरु केली. राज्याची देखील अशाप्रकारची योजना होती. केंद्र शासनाने ही योजना सुरु केल्यामुळे राज्यावरील आर्थिक भार थोडा कमी करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाची व राज्य शासनाची योजना एकत्रित करण्यात आली व आता या योजनेअंतर्गत राज्य शासनाचे २०० रुपये व केंद्र शासनाचे ३०० रुपये असे एकत्रित करुन प्रतिमाह ५०० रुपये निराधार लाभार्थी व्यक्तिस देण्यात येतात.

एखाद्या लाभार्थी व्यक्तिने श्रावणबाळ सेवा योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज केला तर तो व्यक्ती संजय गांधी निराधार अनुदान योजनेचा लाभधारक आहे किंवा नाही, याची विचारणा त्यांच्याकडे केली जाते काय, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी साक्षीचे वेळी असा खुलासा केला की, या योजनांमध्ये मोठयाप्रमाणावर डयुप्लिकेशन नाही. एका योजनेचा लाभ घेतला जातो आणि त्याचवेळी दुसऱ्याही योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या लाभार्थ्यांचे प्रमाण फार कमी आहे. केंद्र शासनामार्फत संपूर्ण प्रक्रियेचे संगणकीकरण करण्यात आले असून १२ लाख निराधार लाभार्थ्यांपैकी जवळ जवळ ७ लाख लाभार्थ्यांची माहिती संगणकात समाविष्ट करण्यात आलेली आहे. संगणकीकृत नोंदणीचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे. लाभार्थ्याची संपूर्ण माहिती संगणकीकृत होणार असल्यामुळे जर एखाद्या लाभार्थ्याच्या मुलाने वय वर्षे २१ पूर्ण केले असेल तर तो लाभार्थी आपोआपच अपात्र ठरणार आहे व हे सगळे काम संगणकामार्फत होणार आहे, अशीही माहिती सचिवांनी समितीला साक्षीच्या वेळी दिली.

औरंगाबाद, नाशिक, नंदुरबार यासारख्या आणखी काही जिल्हयांमध्ये गेल्या दीड वर्षांपासून लाभधारकांना या योजनेअंतर्गत अनुदान मिळालेले नाही अशी विचारणा समितीने केली असता, आता निधी वितरित करण्यात आला आहे, अशी माहिती समितीस देण्यात आली. लाभार्थ्यांच्या माहितीचे संगणकीकरण करण्यात आले असले तरी कोअर बँकिग प्रणालीचा उपयोग करुन थेट लाभार्थ्यांच्या बचत खात्यात अनुदानाची रक्कम जमा करण्याचे धोरण का स्वीकारले जात नाही, अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर सचिवांनी असे प्रतिपादन केले की, अशाप्रकारचा विचार विभागाने केला होता. तथापि यामुळे जिल्हाधिकाऱ्यांचे या योजनेवर कोणतेही नियंत्रण राहणार नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हा विचार चुकीचा आहे. केवळ अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बचत खात्यात जमा होणार आहे. लाभार्थ्याची निवड करणे, अंतिम यादी तयार करणे, अनुदानाची मागणी करणे व अनुदानाची रक्कम लाभार्थ्याच्या बचत खात्यात जमा झाल्यानंतर त्याचा अहवाल प्राप्त करुन घेणे व त्याबाबतची छाननी करणे याबाबतचे काम जिल्हाधिकाऱ्यांकडेच राहणार आहे व त्याअनुषंगाने नियंत्रण सुध्दा राहणार आहे. उलट असे केले तर मधले टप्पे कमी होऊन योजनेच्या अंमलबजावणीत दिरंगाई होणार नाही.याबाबत सचिवांनी अशी माहिती दिली की,सध्या परिस्थिती अशी आहे की, मंत्रालयातून विभागीय आयुक्तांकडे अनुदान वितरित केले जायचे, विभागीय आयुक्तांकडून जिल्हाधिकाऱ्यांना आणि त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडून तहसीलदारांना अनुदान वितरित केले जात होते. यामुळे जो विलंब होतो, तो टाळण्यासाठी मधला एक टप्पा वगळून थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे निधी वितरित करावा, असे विभागाने प्रस्तावित केले आहे. समितीने सूचना केल्याप्रमाणे कोअर बँकिंग प्रणालीचा उपयोग करणे शक्य आहे. परंतु, त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी किती निधी वितरित केला याची माहिती मिळू शकणार नाही. त्यामुळे आता अशा सूचना देण्यात आल्या आहेत की, जोपर्यन्त या योजनांचे अनुदान लाभार्थ्यांना वाटप केले जात नाही, तोपर्यन्त संजय गांधी निराधार योजनेचे काम पहाणारे संबंधित तहसीलदार त्यांचे मासिक वेतन घेऊ शकणार नाहीत. यांसदर्भातील परिपत्रक देखील निर्गमित करण्यात आले आहे.

योजनेच्या अंमलबजावणीत जो विलंब होतो, दिरंगाई होते त्याला कोणी एखादी व्यक्ती जबाबदार नसते. अनेकवेळा मंत्रालयातून निधीचे वितरण उशिराने केले जाते. तर काही वेळा विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयातूनही दिरंगाई होते. त्यामुळे हा होणार विलंब टाळण्यासाठी मधले टप्पे रद्द करुन थेट लाभार्थ्यापर्यन्त अनुदान पोहचावे, अशाप्रकारची भावना समितीने व्यक्त केली असता त्यावर विभागीय सचिवांनी असे प्रतिपादन केले की, समितीने ज्या अडचणी मांडल्या आहेत, ती वस्तुस्थिती खरी आहे, परंतु संगणकीरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर या अडचणी उद्‌भवत नाहीत.

सामाजिक न्याय विभागाकडे स्थानिक वा जिल्हा पातळीवर अंमलबजावणीसाठी यंत्रणा नसल्यामुळे त्यांच्या योजनांची अंमलबजावणी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत केली जाते. या सगळया योजना समाजकल्याण खात्याने राबवावयाच्या म्हटल्या तर स्थानिक पातळीपर्यन्त त्यांना फार मोठा कर्मचारीवर्ग

लागेल. त्यामुळे या योजनांच्या अंमलबजावणीसाठी महसूल विभागाची मदत घेतली जाते. यावर्षी सामाजिक न्याय विभागाने सर्व विशेष सहाय्य योजनांसाठी योजना व योजनेतर तरतूद धरुन जवळपास १००० कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली आहे. अशीही समितीला माहिती देण्यात आली.

या विभागाची मागणी जर १००० कोटी रुपयांची असेल तर वित्त विभागाकडून केवळ ८०० कोटी रुपये निधी मंजूर केला जातो. त्यामुळे काही जिल्हयांना कमी निधी पाठविला जातो. राज्याची जेवढी गरज आहे तेवढा निधी वित्त विभागाकडून या विभागाला मंजूर केला जात नाही, असा समितीने मुद्दा उपस्थित केला असता, त्यावर वित्त सचिवांनी असा खुलासा केला की, सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षातील संपूर्ण तरतूद विभागाला वितरणासाठी उपलब्ध आहे. समाजकल्याण विभागाचे दोन प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेले आहेत. पूर्वीची थकित रक्कम आणि चालू वर्षी लागणारी रक्कम उपलब्ध करुन देण्याची विनंती त्या विभागाला केली आहे. पुढील आठवडयात पुरक मागण्यांसंदर्भात समितीची बैठक होणार आहे. त्यामध्ये हा विषय घेण्यात येणार आहे. पुढील नोव्हेंबर/डिसेंबरपर्यन्त थकबाकीसह या वर्षाचे संपूर्ण अनुदान देण्यात येईल.तसेच ५० टक्के निधी उचलण्याबाबतचे बंधन इतर सर्व विभागांवर घालण्यात आले होते. त्यांना कॅश-फ्लोप्रमाणे निधी वितरित केला आहे. मात्र सामाजिक न्याय विभागाला संपूर्ण वर्षाची तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.त्यावर सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी असे प्रतिपादन केले की, येत्या नोव्हेंबर/ डिसेंबरपर्यन्त प्रलंबित अनुदानासह सर्व निधी वितरित केला जाईल. तसे झाल्यास आता काही अडचण येणार नाही. तसेच विभागाने जादा मागणी सादर करण्याचाही निर्णय घेतला आहे. विशेष घटक योजनेमधून १०० कोटी रुपये निधी देण्याचे प्रस्तावित करीत आहोत. साधारणपणे २६१ कोटी रुपये निधीपैकी १०० कोटी रुपयांचा निधी विशेष घटक योजनेत द्यावा, असे प्रस्तावित करीत आहोत.

लाभार्थी विद्यार्थी महाविद्यालयामध्ये शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी अर्ज करतात, त्यावेळी छाननी करण्या संदर्भात काही निश्चित कालावधी ठरविण्यांत आला आहे का, तसेच शिष्यवृत्तीसाठी शाळेत किती दिवसांत अर्ज करावेत, या संदर्भात काही निकष आहेत का, अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, शिष्यवृत्ती मिळण्यासंदर्भातील महाविद्यालयांचे वेळापत्रक सन २००३ मध्ये ठरविले आहे. विभागाने या संदर्भातील उत्पन्नाची मर्यादा जानेवारीमध्ये पुनर्निश्चित केली आहे. एप्रिलमध्ये मागील वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र द्यायचे असते, मे महिन्यात पुढील वर्षाचे अंदाज द्यायचे असतात व जूनमध्ये अर्ज घेऊन ते पुढे पाठवायचे असतात.

शिष्यवृत्तीसंदर्भात महाविद्यालयांमध्ये सूचना प्रसिध्द केली पाहिजे, या सूचना पत्रकावर अर्ज सादर करण्याचा दिनांक दिला पाहिजे, कोणकोणत्या कागदपत्रांची पूर्तता करायची आहे या संदर्भातील उल्लेख असला पाहिजे, या नियमांची अंमलबजावणी जी महाविद्यालये करत नाहीत, त्यांच्यावर कारवाई करण्या संदर्भात देखरेख ठेवण्यासाठी काही यंत्रणा आपल्याकडे आहे का, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, जिल्हा समाजकल्याण अधिकारी या संदर्भात कार्यवाही

करतात.सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे शिष्यवृत्ती संबंधातील प्रक्रिया निर्गमित केली आहे. या संदर्भात जिल्हा समाज कल्याण अधिकारी महाविद्यालयामधील प्राध्यापक/प्राचार्य यांच्या बैठका घेतात व त्या बैठकांमधून आढावा घेतला जातो.

मागील वर्षी पुणे, मुंबई येथे प्राचार्य व प्राध्यापकांच्या किती बैठका घेतल्या गेल्या, याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, अतिरिक्त संचालक, जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी या संदर्भात बैठका घेतलेल्या आहेत. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, पुणे यांनी समितीला साक्षीचे वेळी अशी माहिती दिली की, सन २००९ मध्ये पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये काही प्राचार्य व प्राध्यापकांच्या बैठका घेण्यात आल्या होत्या.

रुपये १८२.३० लाख ही रक्कम बरीच जास्त वाटते.मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता राबवली जाणारी योजना यशस्वी होण्याकरिता अंमलबजावणी करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी वर्गाचा त्यामध्ये सहभाग वाढला पाहिजे. योजनांचे नियंत्रण योग्य प्रकारे केले गेले तरच या सर्व योजना यशस्वी होऊ शकतात. असे समितीने मत व्यक्त केले असता त्यावर सचिवांनी खुलासा केला की, शिष्यवृत्ती देण्याकरिता संगणकीकरण केले जाणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती हवी आहे, त्यांनी वेबसाईटवरुन तपासल्यास त्यांना किती रक्कम अनुज्ञेय आहे व त्यापैकी किती रक्कम मिळाली आहे, याची माहिती मिळेल. त्याची प्रत काढून त्यांना ती महाविद्यालयास देता येईल व समाज कल्याण अधिकाऱ्यांकडून ती मंजूर करुन घेता येईल. ऑनलाईनचे काम "मिस्टॅक" या कंपनीकडे सोपवले आहे. ही कंपनी शासनाने नियुक्त केली आहे.आता संगणकीकरण झाल्यामुळे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबाबतची माहिती लवकरात लवकर व अधिक चांगल्या प्रकारे मिळू शकेल.

या योजनेचे सचिव स्तरावर एक बैठक घेऊन तिचे नियंत्रण करावे सप्टेंबर- ऑक्टोबर महिन्यापर्यंत म्हणजेच विद्यार्थ्याचे महाविद्यालयामध्ये प्रवेश झाल्यानंतर लगेच त्यांना शिष्यवृत्ती कशी मिळेल या दृष्टीने प्रयत्न केले जावेत तसेच विद्यार्थ्यांना फॉर्म देखील ऑनलाईन मिळण्याची व्यवस्था करावी, अशा समितीने सूचना केल्या असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आता फॉर्म ऑनलाईन उपलब्ध होणार आहेत. सीईटी करिता फॉर्म भरले जातात, त्याप्रमाणे शिष्यवृत्तीचे फॉर्म ऑनलाईन उपलब्ध होणार आहेत. लाभार्थ्यांची संख्या वाढावी याकरिता शासनाकडून कोणते उपक्रम राबविले जातात, अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, शिष्यवृत्तीच्या संदर्भात एक योजना तयार केली होती व त्या नुसार महाविद्यालयांच्या प्राचार्यांची एक बैठक घेतली. तत्कालीन सामाजिक न्याय विभागाचे सचिव श्री. आरमुगम यांच्याकडून एक फॉर्म तयार करण्यात आला. महाविद्यालयामधील विद्यार्थ्याचे मैत्रीसंघ स्थापन करण्याच्या संदर्भात प्रत्येक महाविद्यालयाला सूचना देण्यात आल्या होत्या. प्रत्येक महाविदयालयामधील ३० विद्यार्थी निवडून त्यांच्याशी समन्वय साधण्यात आला. ही योजना राबविण्यापूर्वी सन २००६-०७ मध्ये १३८ कोटी रुपये सन २००७-०८ मध्ये १५७ कोटी ९३ लाख रुपये, व सन २००८-०९ मध्ये २३२ कोटी रुपयांची

शिष्यवृत्ती देण्यात आली. मात्र ही नवीन पध्दत अवलंबविण्यास सुरुवात केल्यानंतर शिष्यवृत्तीच्या रकमेमध्ये भरघोस वाढ झालेली आहे. सन २००९-१० मध्ये ५४७ कोटी ९२ लाख रुपयांची शिष्यवृत्ती वितरीत करण्यात आली आहे. आता नवीन पध्दत राबविल्यामुळे या कामात पारदर्शकता येणार आहे. प्रत्येक महाविद्यालया मध्ये एकूण फीच्या रक्कमेपैकी ९० टक्के रक्कम खर्च झाली असेल, तेवढी रक्कम जुलै महिन्यात त्यांना देण्यात यावी व त्यानंतर प्रस्ताव सादर करण्यात यावा, असा शासन निर्णय निर्गमित करण्यात येणार आहे.तसेच शिष्यवृत्तीची जी रक्कम देण्यात येते, ती रक्कम महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांना मिळाली आहे की नाही, हे तपासण्याकरिता उपयोगिता प्रमाणपत्राची अट घालण्यात आहे. अशीही माहिती समितीला साक्षीचे वेळी देण्यात आली.

सामाजिक न्याय विभागाने ही जी योजना सुरु केली आहे, त्याचा परिणाम निश्चितच चांगला आहे. नवनवीन व लोकाभिमुख योजना राबवणे हेच अधिकाऱ्यांचे काम आहे. या योजनेमध्ये आणखी काही चांगले बदल झाले पाहिजेत असे ही समितीला वाटते समाज कल्याण विभागाकरिता राज्य शासन व केंद्र शासन यांच्याकडे तरतुदीची काही अडचण नाही. अधिकाधिक तरतूद कशी करता येईल या दृष्टीने विभागाने पावले उचलली पाहिजेत अशी समितीने सूचना केली असता विभागीय सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, दूरदर्शन व आकाशवाणीच्या माध्यमातून दरवर्षी शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. दर १५ दिवसांनी शैक्षणिक क्षणचित्राद्वारे यशस्वी कथा दाखवल्या जातात. तसेच शासनाच्या विविध योजनांच्या संदर्भात विभागाने एक सचित्र पुस्तक देखील काढले आहे. याबाबत समितीने असे सूचीत केले की, नवीन पीढी तांत्रिकदृष्टया सुदृढ व प्रगत झाली आहे. सध्या प्रत्येक विद्यार्थ्याकडे मोबाईल असतोच. त्यांचा दूरदर्शनवरील कार्यक्रम पाहण्याचा कल कमी आहे. त्यामुळे एसएमएसद्वारे अथवा इतर नवीन तंत्रज्ञानाद्वारे योजनेची माहिती विद्यार्थ्यापर्यंत पोहचवली गेली पाहिजे. यावर सचिवांनी असा खुलासा केला की, सन २०१० व सन २०११ या वर्षाकरिता महाविद्यालयामधील विद्यार्थ्याचे काही मैत्री संघ निर्माण केले आहेत. या गटा मधील विद्यार्थ्यानी एसएमएसद्वारे माहिती कळविल्यास अधिक चांगल्या प्रकारे योजनेस प्रतिसाद मिळू शकेल. यावर्षी सामाजिक न्याय विभागाने योजनांच्या प्रसिद्धी व प्रचारासाठी २० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मागील वर्षी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेची माहिती देणारे कॅलेंडर्स देखील काढण्यात आले. ही योजना चालू वर्षी देखील राबवली जाणार आहे.सध्या ऑनलाईन फॉर्ममध्ये विद्यार्थ्यांचा भ्रमण दूरध्वनीक्रमांक घेतला जाणार आहे. शिष्यवृत्तीचे पैसे त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा झाल्यावर विद्यार्थ्याना एसएमएसद्वारे तसे कळवले जाणार आहे.

लाभार्थींच्या संख्येत वाढ झाल्यामुळे बँकेत खाते उघडणे, मनीऑर्डरचा खर्च या बाबीकरिता जास्त खर्च येण्याचे कारण काय आहे, अशी विचारणा समितीने केली असता सचिवांनी अशी माहिती दिली की, बँकेला यादी पाठवावी लागते, त्यासाठी टपालाचा खर्च येतो.तसेच मनीऑर्डर, फॅक्स वगैरे प्रशासकीय खर्च आहे. विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट पैसे जमा झाल्यामुळे हा खर्च दाखवित असतांना काही चुक झाली

असावी, असे सचिवांनी नमूद करुन याबाबत तपासून समितीला माहिती सादर करण्याचे आश्वासन दिले. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण या लेखा शिर्षा अंतर्गत जी तरतूद केलेली आहे, ती फार अपुरी आहे. यावर सचिवांनी असे सांगितले की, योजना आणि योजनेतर खर्चामध्ये सध्या ८६१ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मागील थकबाकी आणि चालू वर्षासाठीचे अनुदान अशी २०० कोटी रुपयांची तफावत आहे. त्यामुळे उर्वरित रक्कम साधारण योजनेतुन देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. या सगळया योजनांचा एकत्रित आवाका बघून तरतूद कमी करण्यात आली आहे. विभागाने जो अंदाज सांगितलेला आहे तो बरोबर आहे. परंतु दरवर्षी लाभार्थ्यांची संख्या वाढते आहे. त्यामुळे तरतूद वाढविण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना विभागाने केली आहे किंवा या विभागाला वाढीव तरतूद उपलब्ध व्हावी, यादृष्टीकोनातून काय करण्याची आवश्यकता आहे या समितीने विचारलेल्या प्रश्नांवर माहिती देताना विभागाच्या सचिवांनी असे नमूद केले की, लाभार्थ्यांना जे अनुदान देण्यात येते, त्यामध्ये वाढ करावी किंवा कसे, याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. सध्या शासन प्रत्येकी ५०० रुपयांची मदत करते, ती रक्कम वाढवून ६०० रुपये करावी, असा प्रस्ताव विभागाने शासनाला सादर केला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे. यामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा २०० रुपये व राज्य शासनाचा हिस्सा ४०० रुपये करावा, असा प्रस्ताव आहे. केंद्र शासनाकडून कोणतीही वाढ करण्यात येत नाही. जर वाढ करायची असेल तर ती राज्यशासनालाच करावी लागणार आहे. काही राज्यांनी वाढ केलेली आहे तर काही राज्ये आपल्यापेक्षा कमी अनुदान देतात दिल्लीमध्ये लाभार्थ्यांना प्रत्येकी १००० रुपये देण्यात येतात.

दारिद्रय रेषेखालील व्यक्ती ज्यावेळी दाखला मिळविण्यासाठी जातात, त्यावेळी त्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये १२००० असेल तर उत्पन्नाचा दाखला देत असतांना त्यांना रुपये २४००० वार्षिक उत्पन्नाचा दाखला दिला जातो. त्यामुळे यासंदर्भातील निकषाच्या बाबतीत शासनाने विचार करावा. तसेच जे खरोखरच पात्र लाभार्थी आहेत, त्यांना उत्पन्नाचा दाखला मिळत नाही व जे अपात्र असतात, त्यांना तो सहज मिळतो. समाजकल्याण विभागांस लोकसंख्येच्या प्रमाणात निधी दिला पाहिजे व त्याप्रमाणे अर्थसंकल्पात तरतूद देखील केली गेली पाहिजे. परंतु, नंतरच्या काळात कट लावणे, खर्च न करणे असे प्रकार होतात. त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात त्या खात्यांना निधी मिळत नाही किंवा तेवढा निधी खर्च होत नाही. यादृष्टीनेही विभागाने विचार करावा. कारण अनेक योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळालेला नाही. योजनांची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत नाही. त्यामुळे या योजना राबवित असतांना त्यामध्ये लोकप्रतिनिधींचा सहभाग असणे गरजेचे आहे. अनेक लोकप्रतिनिधी महाविद्यालये चालवितात. त्यांचा लोकांशी सतत संपर्क असतो. परंतु, असे एकही उदाहरण नाही की, अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी त्यांचा सहभाग करुन घेतलेला आहे. कोणीही लोकप्रतिनिधी स्वत:हून यंत्रणेकडे जाणार नाहीत आणि अधिकारी देखील त्यांना बोलावित नाहीत. अधिकारी वेगवेगळया बैठका घेतात परंतु लोकप्रतिनिधींना त्या बैठकींना आमंत्रित केले जात करीत नाही. त्यामुळे काही ठिकाणी लाभार्थी मिळत

नाहीत, असे जे अधिकारी सांगतात ते योग्य वाटत नाही असे समितीने स्पष्ट केले असता त्यावर सचिवांनी समितीचे म्हणणे रास्त असल्याचे मान्य करुन असे नमूद केले की, योजना सुरु करीत असतांना राज्यातील प्रत्येक लाभार्थ्यापर्यन्त ती योजना गेली पाहिजे, त्यांना लाभ झाला पाहिजे, असा शासनाचा उद्देश आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन, त्यांचे मार्गदर्शन घेऊन योजना राबविली जाईल. यावर समितीने असे सुचविले की विविध राजकीय पक्षाचे प्रमुख, लोकप्रतिनिधी आणि महाविद्यालयांचे प्राचार्य, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव आणि त्यांचे अधिकारी यांची एकत्रित बैठक आयोजित करुन विविध योजनांबाबतचा आढावा सदर बैठकीत घेण्यात यावा. त्यावर सचिवांनी असे प्रतिपादन केले की, सामाजिक न्याय विभागातर्फे बैठक आयोजित करण्यात येवून, त्या बैठकीस समितीने सूचीत केल्याप्रमाणे संबंधितांना आमंत्रित करण्यात येईल.

अभिप्राय व शिफारशी :

सन २००३-२००४ या वर्षी २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण व २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण या लेखा शिर्षाअंतर्गत झालेल्या खर्चाची तपासणी केली असता समितीला असे आढळून आले की, काही महाविद्यालयांमध्ये मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम २-२ वर्षे होऊन देखील मिळत नाहीत. तसेच सूचना फलकावर माहिती लावल्यानंतर विद्यार्थी त्या प्रमाणे अर्ज करतात. परंतु जेवढया विद्यार्थ्यांनी अर्ज केला असेल तेवढया विद्यार्थ्यांची फी महाविद्यालये भरत नाही. महाविद्यालय आपल्याकडून फीच्या रक्कमेची प्रतिपूर्ती होते. अनेक महाविद्यालयांमध्ये अशी थकित देयके प्रलंबित आहेत. शिष्यवृत्तीकरिता विद्यार्थी अर्ज करतात, मात्र त्यानंतर प्रत्यक्षात त्यांना ही रक्कम मिळाली आहे की नाही, याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. अनेकदा शाळा, महाविद्यालयांना निधी प्राप्त होऊन देखील तो निधी विद्यार्थ्यांच्या खाती वर्ग केला जात नाही. तसेच काही शाळा, महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांकडून सह्या घेतल्या जातात मात्र प्रत्यक्षात त्यांना पैसे दिले जात नाहीत. अनेक वर्षापासूनची ही वस्तुस्थिती आहे. या वर्षापासून नवीन पध्दत सुरु करण्यात आली असून त्यानुसार विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये फीची रक्कम थेट जमा केली जाणार आहे. त्यासाठी संगणकाचे साफ्टवेअर तयार करण्यात आले असून विद्यार्थ्यांच्या नावाने बँकेत झिरो बॅलन्स खाते उघडता येईल.अशी माहिती समितीला साक्षीचेवेळी देण्यात आली.**महाविद्यालयामध्ये वा शाळांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम दोन-दोन वर्ष होऊनही मिळत नसल्याने शासनाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सुरु केलेली नवीन पध्दती व त्यासाठी तयार केलेली संगणक आज्ञावली लवकरात लवकर कार्यान्वित करावी व महा**विद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती ही दरवर्षी विहित कालावधीत न चुकता कशी मिळेल या **दृष्टीने योग्य ती कार्यवाही सत्वर व्हावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

यापूर्वी शिष्यवृत्ती महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना दिली जात होती, आता नवीन पद्धतीप्रमाणे ती महाविद्यालयामार्फत देण्यात येऊ नये, या संदर्भात शासनाने आदेश काढले आहेत. अनेक उच्च /माध्यमिक शैक्षणिक संस्था व खाजगी विना अनुदानित शाळा यांनी विद्यार्थ्यांची फी भरलीच नाही. अनेक खाजगी शाळांची फी तर ४०००० ते ५०००० रुपयांपर्यंत आहे. त्यामुळे हुशार परंतु गरीब मागासवर्गीय विद्यार्थ्यांना चांगल्या खाजगी शाळेमध्ये शिक्षण घेण्याची इच्छा असून देखील अशा शाळामधून शिक्षण घेता येत नाही. त्यामुळे खाजगी शाळांमधील फी चा दर ठरविण्यासाठी त्यामध्ये, लवकरात लवकर सुधारणा करण्यात यावी. सचिव, सामाजिक न्याय यांनी समितीला माहिती देताना असा खुलासा केला की, त्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय स्तरावर सचिवांची एक समिती स्थापन केलेली आहे. सामाजिक न्याय विभागाने जो शासन निर्णय निर्गमित केला आहे, त्याचा चुकीचा अर्थ राज्यातील काही शाळा व्यवस्थापनांनी लावला आहे. त्यामुळे प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळत नाही. **राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थामधील शाळांचे फी चे दर ठरविण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या सचिवांच्या समितीने तातडीने निर्णय घेवून सर्व शाळांचे फीचे दर निश्चित करावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

वयाची ६५ वर्षे पूर्ण झालेले पात्र लाभार्थी श्रावणबाळ सेवा योजनेमध्ये वर्ग झाल्याने लाभार्थी संख्या कमी झाली तसेच कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे पात्र लाभार्थी कमी झाले आहेत, तसेच मुलांचे वय २१ वर्षे झाल्यानंतर त्यांच्या पालकांना या योजनेचा लाभ घेता येत नाही. ही संपूर्ण योजना विशेष सहाय्य योजनेअंतर्गत म्हणून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राबविली जाते. तालुका पातळीवर सदर काम नायब तहसीलदार यांच्याकडे देण्यात आलेले आहे. नायब तहसीलदार याच्यांकडून अर्जांची छाननी होते व सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविले जातात. ग्रामसेवक, तलाठी यांच्यामार्फत अपात्र लाभार्थ्यांना देखील दाखले देण्यात येतात. वय ६५ वर्षे पूर्ण नसले तरी दाखला देण्यात येतो, अशी बनावट प्रकरणे तयार केली जातात आणि सादर केली जातात. परिणामी पात्र लाभार्थी योजनेपासून वंचित राहतात व अपात्र लाभार्थ्यांमुळे शासनावर नाहक बोजा पडतो. निराधारांना आधार देण्यासाठी श्रावणबाळ योजना शासनाने सुरु केली आहे. परंतु, दप्तर दिरंगाईमुळे किंवा निधीची पुरेशी तरतूद न केल्यामुळे तसेच शासन यंत्रणेतील उदासीनता यामुळे या योजनेचा उद्देश सफल झालेला नाही. राज्यात अनेक वयोवृध्द व्यक्तिना सांभाळणारे कोणीही नाही व ते निराधार असून त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे जीवनदायी योजना, श्रावणबाळ सेवा योजना, अंत्योदय योजना या सर्व योजनांचा लाभ या वयोवृध्द व्यक्तिना मिळाला पाहिजे, त्यामुळे सामाजिक न्याय विभागातर्फे श्रावणबाळ सेवा योजना, अन्न व नागरी पुरवठा विभागातर्फे अंत्योदय योजना या सामाजिकदृष्टया आवश्यक असणाऱ्या परंतु **राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत स्वतंत्ररित्या राबविल्या जाणाऱ्या योजनांचा मेळ घालून त्या योजना एकमेकांशी संलग्न करण्याची आवश्यकता असून त्या दृष्टीने शासनाने योग्य ती कार्यवाही करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

केंद्र शासनामार्फत श्रावणबाळ सेवा योजना व अशा प्रकारच्या इतर योजना राबविल्या जातात, या सर्व योजनांच्या संपूर्ण प्रक्रियेचे संगणकीकरण करण्यात आले आहे. लाभार्थ्यांची संपूर्ण माहिती संगणकीकृत होणार असल्यामुळे जर एखाद्या लाभार्थ्याच्या मुलाने त्याची वयाची २१ वर्षे पूर्ण केली, तर तो लाभार्थी आपोआपच योजनेचा लाभ घेण्यास अपात्र ठरणार आहे व हे सगळे काम संगणकामार्फत होणार आहे. **कोअर बँकिग प्रणालीचा उपयोग करुन थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अनुदान जमा करण्याचे धोरण राबविण्याच्या दृष्टीने विचार विनिमय व्हावा. त्याचप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांचे या योजनेवर नियंत्रण असल्याने लाभार्थ्यांची निवड करणे, पात्र लाभार्थ्यांची अंतिम यादी तयार करणे, अनुदानाची मागणी करणे व अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाल्यानंतर त्याचा अहवाल प्राप्त करुन घेणे व त्याबाबतची छाननी करणे याबाबतचे काम जिल्हाधिकाऱ्यांमार्फत करण्यात यावे अशीही समिती शिफारस करीत आहे.**

राज्याची जेवढी गरज आहे तेवढा निधी वित्त विभागाकडून सामाजिक न्याय विभागाला वितरित केला जात नाही त्यामुळे सामाजिक न्याय विभागाला आर्थिक अडचण भासते. त्या दृष्टीने सामाजिक न्याय विभागाने सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये सरसकट कपात न करता वित्त विभागाने थोडे लवचिकधोरण ठेवून विभागास निधी कमी पडणार नाही या दृष्टीने निधी मंजूर करुन देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी अशी ही समिती शिफारस करीत आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता राबवली जाणारी योजना यशस्वी होण्याकरिता त्यामध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी वर्गाचा सहभाग वाढला पाहिजे. योजनांची देखरेख व नियंत्रण योग्य प्रकारे केले गेले तरच या सर्व योजना यशस्वी होऊ शकतात. याबाबत साक्षीचे वेळी सचिवांनी खुलासा केला की, शिष्यवृत्ती देण्याकरिता संगणकीकरण केले जाणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती हवी आहे, त्यांनी वेबसाईटवरुन माहिती घेतल्यास त्यांना किती रक्कम अनुज्ञेय आहे, त्यापैकी किती रक्कम मिळाली आहे, याची माहिती लागलीच मिळेल. योजनांच्या कामाचे संगणकीकरण झाल्यामुळे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची माहिती लवकरात लवकर व अधिक चांगल्या प्रकारे मिळू शकेल.

विद्यार्थ्याने महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतल्यानंतर लगेच त्याला शिष्यवृत्ती कशी मिळेल या बाबत प्रयत्न करावेत विद्यार्थ्यांना फॉर्म देखील ऑनलाईन उपलब्ध होणार आहेत. सीईटी करिता फॉर्म भरले जातात त्याप्रमाणे शिष्यवृत्तीचे फॉर्म देखील ऑनलाईन उपलब्ध होणार आहेत. लाभार्थ्यांची संख्या वाढावी या दृष्टीने शासनाकडून शिष्यवृत्तीयोजनेच्या संदर्भात एक पध्दत अवलंबिण्यात आली होती. महाविद्यालयामधील विद्यार्थ्याचे मैत्रीसंघ स्थापन करण्याच्या संदर्भात प्रत्येक कॉलेजला सूचना देण्यात आल्या होत्या.प्रत्येक कॉलेजे मधील ३० विद्यार्थी निवडून त्यांच्याशी समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. सामाजिक न्याय विभागाने ही योजना सुरु केली आहे, त्याची प्रचिती निश्चितच चांगली आली आहे. दूरदर्शन व आकाशवाणीच्या माध्यमातून दरवर्षी शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. दर १५ दिवसांनी शैक्षणिक क्षणचित्रां मधून यशस्वी कथा दाखवल्या जातात. तसेच शासनाच्या विविध योजनांच्या संदर्भात विभागाने एक

सचित्र पुस्तक देखील काढले आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेची माहिती देणारे कॅलेंडर्स देखील काढण्यात आले. सध्या ऑनलाईन फॉर्ममध्ये विद्यार्थ्यांचा मोबाईल नंबर घेतला जाणार आहे. शिष्यवृत्तीचे पैसे विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट जमा झाल्यावर विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारे त्याबाबत कळवले जाणार आहे. **सामाजिक न्याय विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता राबवली जाणारी योजना यशस्वी होण्याकरीता तसेच विभागामार्फत दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमासाठी मागासवर्गीयांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी सामाजिक न्याय विभागाला देण्यात यावा अशीही समितीची शिफारस आहे.**

परिशिष्ट एक

परिशिष्ट-एक

मंगळवार, दिनांक ४ मे ,२०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ४ मे, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.००वाजता सुरु होऊन दुपारी २.५५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीष बापट, वि.स.स.,

सदस्य

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.,
३) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.,
४) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर - वि.स.स.,
५) श्रीमती मिनाक्षी पाटील - वि.स.स,
६) श्री.नवाब मलिक - वि.स.स.,
७) श्री.विलास लांडे - वि.स.स.,
८) श्री.संजय सावकारे - वि.स.स.,
९) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.,
१०) श्री.नानाभाऊ पटोले - वि.स.स.,
११) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.,
१२) श्री.एकनाथ शिंदे - वि.स.स.,
१३) श्री. सुरेशदादा देशमुख - वि.प.स.,
१४) श्री. विनोद तावडे - वि.प.स.,
१५) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१ श्री भा. ना. कांबळे, सह सचिव

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

१) श्री. कुरुविला-उप महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :

१) डॉ. प्रदिप व्यास, सचिव

साक्षीदार :

नगरविकास विभाग :

१) श्री. मनुकूमार श्रीवास्तव, सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवाला संदर्भात प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक ५ मे, २०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ५ मे,२०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.३० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीष बापट, वि.स.स.,

सदस्य

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.,
३) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.,
४) श्रीमती मिनाक्षी पाटील - वि.स.स,
५) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.,
६) श्री.नवाब मलिक - वि.स.स.,
७) श्री.संजय सावकारे - वि.स.स.,
८) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.,
९) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.,
१०) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.,
११) श्री.भाई जगताप - वि.प.स.,
१२) श्री. विनोद तावडे - वि.प.स.,
१३) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री भा. ना. कांबळे, सह सचिव
२) श्रीमती मेघना तळेकर, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

श्री. के.सी.कुरुविल्ला, उप महालेखाकार,

वित्त विभाग :

डॉ. प्रदीप व्यास, सचिव

साक्षीदार :

ग्रामविकास विभाग :

१)श्री सुनील पोरवाल, प्रधान सचिव व रोजगार हमी योजना
२)श्री सुधीर ठाकरे, सचिव, ग्राम विकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील परिच्छेद क्र.एल-३"ग्रामीण रोजगार " या सदर्भात समितीने अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक १२ मे ,२०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १२ मे, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.४० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीष बापट, वि.स.स.,

सदस्य

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.,

३) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.,

४) श्री.विलास लांडे - वि.स.स.,

५) श्री.संजय सावकारे - वि.स.स.,

६) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.,

७) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

श्रीमती मेघना तळेकर, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

श्री. कुरुविला-उप महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :

डॉ. प्रदीप व्यास, सचिव

साक्षीदार :

सार्वजनिक आरोग्य विभाग :

१) श्रीमती शर्वरी गोखले, अप्पर मुख्य सचिव

२) श्री.जयंतकुमार बाँठिया, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालसंदर्भात अप्पर मुख्य सचिव व प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

मंगळवार, दिनांक १ जून ,२०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १ जून, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.४५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. विनोद तावडे -वि.प.स.,तथा कार्यकारी प्रमुख समिती

सदस्य

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.,

३) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.,

४) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.,

५) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.,

६) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

श्री भा. ना. कांबळे, सह सचिव

श्रीमती मेघना तळेकर, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :
श्री. कुरुविला-उप महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :
डॉ. प्रदीप व्यास, सचिव

साक्षीदार :
सार्वजनिक बांधकाम विभाग :
१) श्री. धनंजय धवड, सचिव (रस्ते)
२) श्री. गं. म. कंधारे, सचिव (बांधकामे)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालसंदर्भात सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक २ जून ,२०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २ जून २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.४० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीष बापट, वि.स.स.,

सदस्य

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.,

३) श्री.विलास लांडे - वि.स.स.,

४) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.,

५) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.,

६) श्री. विनोद तावडे - वि.प.स.,

७) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्रीमती मेघना तळेकर, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :
श्री. कुरुविला-उप महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :
डॉ. प्रदीप व्यास, सचिव

साक्षीदार :
जलसंपदा विभाग :
श्री. मुरलीधर मुंढे, सचिव(लाक्षेवि)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालसंदर्भात सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

परिशिष्ट -एक
मंगळवार, दिनांक ८ जून,२०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ८ जून, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.००वाजता सुरु होऊन दुपारी २.५५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीष बापट, वि.स.स.,

सदस्य

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.,

३) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.,

४) श्री.अमित देशमुख - वि.स.स.,

५) श्री.संजय सावकारे - वि.स.स.,

६) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.,

७) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.,

८) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.,

९) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्रीमती मेघना तळेकर, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

१) श्री. कुरुविला- उप महालेखाकार, मुंबई
२) श्री.पी.ए. निर्मलकुमार, उप महालेखाकार,नागपूर

वित्त विभाग :

डॉ. प्रदीप व्यास, सचिव

साक्षीदार :

गृह विभाग (परिवहन) (उत्पादन शुल्क)

श्री.पी.एस.संगीतराव, सचिव, (परिवहन) (उत्पादन शुल्क)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालसंदर्भात सचिव, गृह विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक २३ जून, २०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २३ जून,२०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.३० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीष बापट, वि.स.स.,

सदस्य

२) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.,
३) श्री.नवाब मलिक - वि.स.स.,
४) श्री.संजय सावकारे - वि.स.स.,
५) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.,
६) श्री. बाळा नांदगावंकर, वि.स.स.
७) श्री.भाई जगताप - वि.प.स.,
८) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्रीमती मेघना तळेकर, अवर सचिव.
२) श्री. आर.आर.काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

१) श्री. के.सी. कुरुविल्ला, उप महालेखाकार,
२) श्री. प्र.व.मोघे, वरिष्ठ लेखा अधिकारी,मुंबई

वित्त विभाग :

डॉ. प्रदीप व्यास, सचिव

साक्षीदार :

सामाजिक न्याय विभाग :

श्री.सतिश गवई, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील परिच्छेद क्र.एन- ४"अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय यांचे कल्याण " या सदर्भात समितीने प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग यांची साक्ष घेण्यात आली.